म. ग्रं. सं. ठाणें

विषय: कादंबरी

संग्रहालय क्रमांक: [illegible]

लेखक: रामकृष्ण बळवंत नाईक

सन: [illegible]

पुस्तकाचें नांव: [illegible]


29

श्री

# चित्रालाप,

अथवा

## विविध-विषय-विवाद ( नॉवल )

## भाग १ ला.

हें पुस्तक

रामकृष्ण बळवंतराव नाईक

आणि

आत्माराम हरिश्चंद्र घरत

यांनीं रचून तयार केलें

तें

मुंबईमध्यें "न्याशनल" छापखान्यांत छापविलें.

[सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें रजिस्टर केलें आहे.]

डिसेंबर १८७९.

किंमत १२ आणे

( पुस्तकाचे हक्क मालकांनीं आपणांकडे ठेविले आहेत )

# CHITRALAPA

or

## VIVIDHA VISHAYA VIVADA (Novel)

*PART FIRST.*

Composed and published

BY

RAMAKRISHNA BULVANTRAO NAIK

AND

ATMARAM HARISHUNDRA GHARAT

*(Registered under Act 25 of 1867.)*

BOMBAY

*Printed at the "National" Press.*

December 1879.

PRICE 12 ANNAS

( All

# प्रस्तावना.

आपल्या या आर्यावर्ताची पूर्वस्थिति पाहिली असतां ती विशेष वर्णनीय होती. कलाकौशल्यानें तसाच विद्यावृद्धीनेंही तो संपूर्ण असून सर्वत्र शांतता असल्यामुळें अस्मद्देशीयांस ज्ञानामृताचा लाभ करून घेण्यास चांगला काळ सांपडून त्यांनीं नाना विषयांवर एवढा शोध केला कीं, तो नुसता पाहूं ह्मटल्यास कैक तपें लोटलीं पाहिजेत. असे अनेक विद्वन्मणि तसेच शौर्यमंडित पुरुष येथें निपजून जो देश उत्तमावस्थेंत आणिला तोच दीनावस्थेत पडला याचें मुख्य बीज पहातां अज्ञानाचें प्राबल्य वाढून सद्गुणाचा ऱ्हास झाला हेंच आढळेल. त्यामुळें ऐक्य सहजच बुडालें, आणि स्वदेशाभिमानाचा लय झाला. स्वदेशाभिमान आणि ऐक्य जेथें नाहींत तेथें जरी तो देश धनधान्यादिकांनीं समृद्ध व विद्वज्जनसमूहानें पूरित आहे, तरी तेथें लोकहिताचीं कामें होतील असें संभवत नाहीं. तथापि, नानापुस्तकें रचून जनापुढें आणण्यात जसे विख्यात ग्रंथकार येथें होऊन गेले, तसे किंवा किंचित् कमी प्रतीचे आजकाल नाहींतच असें नाहीं, परंतु हीं कामें कांहीं खर्चाचीं व द्रव्यसाहाय्य वस्तुतः व्हावें तसें वरील न्यूनतेने होत नसल्यामुळें अनपेक्षानहित सहन करणें भाग पडतें हें साहाजिक आहे; तरी कांहीं कांहीं निबंध व पुस्तकें स्वबलावर आपल्या डोकीं वर उचलितात हें त्यांचें धारिष्टच समजलें पाहिजे. त्यांतून पद्यात्मक ग्रंथादिकांस थोडा बहुत जनाश्रय मिळत आहे. निदान त्यांस तुच्छ गणून थेट हास्यविनोदांशीं संघट्टण करवून तेथपर्यंत त्यांची मज्जल पोहोंचवीत नाहींत हे जनांचे उपकार होत; परंतु कांहीं गद्यात्मक पुस्तकें कीं, ज्यांत बहुधा बीभत्सरस मुळीं नसून मनुष्याचे अंतःकरणावर विलक्षण ठसा उमटून मन बहकून जाण्याचे वगैरे विषय न येतां स्थलोस्थलीं मनुष्यमात्राची जगतांतील वर्तणूक, व सत्समागमापासून फायदे, असन्मार्गाचे परिणाम, सन्मार्गाचें फळ, सत्यासत्याची निवड वगैरे यांचा बोध आढळत असतां, त्याजविषयींचा झालेला लोकाग्रह पाहून परमावधीचें नवल वाटतें. अ-

शानें, एकादें उपयुक्त पुस्तक जनांसमोर आणून आपले सार्वजनिक सर्वांस विदित व्हावे। किंवा कोणत्याहिप्रकारें देशाची व त्यांतील ज्ञान [illegible] अशा कारणास मोड—आश्रय तो म्हणण्याचीं द्रव्यें व अवश्य लागणारीं खर्ते त्यास नसल्यामुळें उत्पन्न होणें नाहींच, आणि कदाचित् वरील अनुकूलतेनें उद्भवलाच तर त्यास तेवढ्यांतच खुडून टाकणें बरें नव्हे. कायती नुकतीच यांची ( पुस्तकांचीं ) भरभराट-आणि तीही मंद होत आहे तोंच लोकांकडून असें आचरण व्हावें ही दुःखाची गोष्ट आहे ! मग ज्या देशांत प्रतिदिवशीं शेंकडों पुस्तकें बाहेर पडत आहेत तेथें काय प्रकार व्हावा ? पण असें तेथें होत नाहीं तर त्या देशाचें केवढें भाग्य ! इतका थोर दैवशाली आमचा प्रिय देश होईल काय ! अस्तु

वर सांगितलेल्या अभावामुळें आह्मांवर बरींच संकटें ओढवलीं होतीं. तरी तीं ईशदयेनें सारीं विलयास जाऊन जनांपुढें हा अल्पयत्न ठेवण्याचा प्रसंग आला याचा आह्मांस आनंद होतो. या पुस्तकांत बहुशः निराळीच धाटणी असून स्त्रियांस ज्ञान उत्पन्न करविणारें शिक्षण नसल्यानें त्यांच्याकडून होणारें आचरण, आर्यावर्तस्थांची स्थिति, देशबंधुप्रीति अभावाचे परिणाम वगैरे संबंधानें अनेक विषय स्थलपरत्वें वर्णिलेले आहेत. असो; याबद्दल अधिक विस्तार न करतां या ग्रंथांत कोठें लेखनानुसंधान घसरून गुणदोष आढळण्याचें संभवत असेल त्याची-व त्याचप्रमाणें दुसऱ्या अनेक दोषांची विद्वज्जन क्षमा करतील अशी आशा आहे.

वादजनित विषयातें, देतें स्थल हें जरी तरी धरितें ॥
ना वाक्जल्पनातें, वसतें ना परि प्रबोधनाशिरितें ॥ १ ॥

**ग्रंथकर्ते.**

आमचे मित्र रा. रा. भास्कर जगन्नाथ पोरो यानीं या पुस्तकाच्या कांहीं प्रतींस आश्रय दिल्यामुळें आह्मी त्यांचे आभारी आहों.

श्री

# चित्रालाप,

अथवा

## विविधविषयविवरण ( नॉवल )

---

### प्रकरण पहिलें.

गीति– जन्मनुष्यमात्रा, पाळी समदृष्टि ठेवुनी जो तो ॥
दास करद्वय जोडुनि, भव भय दुःखाब्धि हारका नमितों ॥ १ ॥

भवयत्न तत्प्रसादें, हो श्री सत्फलद सज्जनाकरवीं ॥
नेइल नाथ यशातें, इच्छा मातें मनीं अशी वरवी ॥ २ ॥

या विस्तीर्ण ब्रह्मांडांत अविनाशज्ञानतत्त्वानें व्यापक राहून चराचरांकडून नियमित व्यापार यथायोग्यरीत्या घडविणारा, यथाकालीं आकाशपंथानें मेघोदरांतून, धान्य, तृण, कंदादिकांस पुष्टीप्रत आणून तद्वारा इच्छित भाग साधण्यास, भूमंडलालिंगन देणाऱ्या जलधारांचें कार्य तडीस नेणारा, विपत्कालीं कृपाळूपणानें त्यांतून मुक्त करून भयप्रद असें कांहीं न उरवून आनंदपुरींत वास करविणारा जो जगद्वंद्य दयाशील ब्रह्मांडनायक त्यास प्रथमारंभीं नमन अत्यावश्यक असून त्याचे कृतोपकार आठविणें हें मनुष्यमात्राचें कर्तव्य होय.

## साक्या +

सुमन मनातें देतें मोदा, जळ दानिं सोडी कोण ॥
नभोंतरीं जल सांचे कैसें, तो चालक परिन कोण ॥१॥

जगीं अखिल जो व्यापुनि भरला, गती देतसे ज्याला ॥
दीर्घ प्रयत्नें दीक्षी देतो, शरण रिघावें त्याला ॥२॥

सन्मुख व्हावें स्मरुनि शिशुत्वा, दांभिक सारें जावें ॥
धरणीधर मनिं ईश धरावा, रात्रौ दिनीं नमावें ॥३॥

हे जगन्नायक ! तुझ्या सृष्टिसौंदर्याचें किंचित् वर्णन करण्यास जावें म्हटलें, तर तेथें मति कुंठित होऊन तीस सर्वत्र शून्याकार भासून जलाशयांत अकस्मात् पडणाऱ्या प्राण्याप्रमाणें स्थिति प्राप्त होते. तथापि शक्त्यनुरूप त्यास म्हटणें हें इष्ट ; कारण —

### श्लोक

आकाशअंत न कळोनिहि अंतरिक्षीं ॥
आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी ॥
नाम प्रतापहि यथामति याच रीती ॥
सीमा न पावति तथापि मुनींद्र गाती ॥ १ ॥ वामन

परमेशा ! तव कृपेकरून ज्या देशांत अनेक शूर, वीर, पराक्रमी राजर्षि व महर्षि निर्माण होऊन ज्यांनीं स्वसामर्थ्यें ज्यास अलौकिक मनुष्य गुणांत श्रेष्ठ पदास चढविलें, जेथील भूमि सुपीक व रसाळ व जींत अनेक रत्नांचा संचय तो हा आर्यदेश किती ऐश्वर्ययुक्त व सुखोत्पादक असावा बरें? अशा, पूर्वगोलार्धांत आशिआ नामक खंडाच्या दक्षिण दिशेस समशीतोष्ण कटिबंधांत वसलेल्या, ज्याची

---

+ प्रत्येक साकीच्या दोन अर्ध चरणांचीं पहिलीं एकेक अक्षरें वाचून पहावीं.

कीर्ति दिगंतरीं प्रसृत असून त्यावर असंख्य द्रव्यलोभि- ष्ट राजपुरुषांनीं तद्वत् स्वार्थसाधकांनीं स्वाऱ्या करून जेरीस आणलेल्या, व ज्यास प्रयक्ष नंदनवन ह्मणण्यास मुळींच बाध नव्ह- ता; परंतु आज आपुडें झालेल्या आर्यावर्त या नांवानें विख्यात अ- सलेल्या भूमितलावरील अस्मद्देशीय लोकांस परदेश व तेथील ज- नांची अवश्यमेव गरज न लागावी व येथील रहिवाशांचीं मनें किंचित् आसमंतातील प्रदेश विलोकून आनंदभरीत व्हावींत ह्मणून अतोना- त विस्तृत रानें, वनें व गगनस्पर्धा करणारे हिरवेगार वृक्ष नद, न- द्या, ओहोळ, गुहा भुयार, नानाप्रकारचे स्वादिष्ट पदार्थ वगैरे हीं उ- त्पन्न करून ठेविलीं आहेत; असे हे प्रकार स्वतः भिन्नभिन्न प्रकृ- ति, गुण व स्वभावांनीं उत्पन्न कर्ता जो तूं त्या तुझें किती चातुर्य व कौशल्य! अहाहा! एकेक अशीं भयंकर व किर्र अटव्याटवी कीं जींत दिवसास दिनकराचें किरण पडणें कठीण, त्यांत प्रसंगीं उपयोगी अ- शा वनस्पत्यादिक औषधी ठेवून तेथें सदासर्वकाळ आनंदानें काळक्र- मण करणारे हिंस्र पशु व त्याजकरितां असलेले तेथील जलाशय हे पाहून तुझी समदृष्टि, निःपक्षपात, व अलौलिक खेळ व पराक्रम यां- जविषयींचा पूज्यभाव उद्भवून तुझ्या अगाध करणीचा विस्मय होतो. फार कशास हा मनुष्य प्राणीच पहा! किती चित्र विचित्र बनवून किती त्यांत तुझी अपूर्वलीला दृश्यमान होते! त्यास अन्नाच्छादन मिळवितां यावें ह्मणून हस्त आणि पाद हे केवढ्या थोर कुशलतेनें यथायोग्य स्थलीं जडविले आहेस! त्याचे ते नयन असलेल्या स्था- नाहून किंचित् दूर करून कपोलभागीं ठेविल्यानें त्याच्या सुरक्षित- पणास बाध येईल जाणून अच्छादित असे खोल भागीं ठेवण्यांत तुझें केवढें चातुर्य दिसून येतें! सारांश, केवढी चमत्कृतीची त्याची श- रीररचना! आणि त्यावरून प्रत्येकाचें दुसऱ्यास सहाय्य असणें अ- वश्य असा तुझा मनोभाव दिसून येतो, तेव्हां तूं किती दूरदर्शी आणि किती कुशल! अहाहा! मन, बुद्धि, विचार आदिकरून निर्मित शक्तींच्या परस्परांच्या संबंधाची योजना तर आह्मांस विशेष आभि-

नंदनीय होऊन यांत तुझें पूर्ण कौशल्य आढळतें! चौर्यकर्माचरणाकडे मनानें धांव घेतल्यास तत्क्षणीं त्याजवर विचारास्त्र सुटावें आणि आपलें स्वामित्व थोडावेळ तरी कजवावें हा काय चमत्कार! देहपुरींत हा प्राणी तरी तूं कसा ठेविला आहेस! जो, अन्न, प्राण, मनादिक पंचकोशांपलिकडे, अशरीर, परंतु ज्ञानतत्वानें पूर्ण अशांचा नियामक व निर्मिता तूं त्या तुझें स्वरूप ज्ञानचक्षूनें तर समजतेंच; पण ह्या दुबळ्या बाह्यचक्षूनें, जर ज्याचें त्यास ह्मणजे स्वतांस आपलें स्वरूप काय हा बोध होणें दुर्घट तर त्याच्या पलीकडील जो तूं त्या तुला विलोकून तुझे गुणानुवाद तो काय करील? प्रभू! किती विचित्र ही करणी? आणि कोठें हा मनुष्य!! धन्य तूं! आणि धन्य तुझें हें नियंतृत्व!

तसेंच, उत्तरेकडील शेंकडों कोस लांब गेलेला प्रचंड पर्वत-शौर्यशाली शूर सरदाराप्रमाणें ताठ उभा राहून वरील प्रांतांतील लोकांस खालीं या देशांत न येऊं देण्यासाठीं जणूं मार्ग अडवून प्रतिबंधच करीत आहे त्याचा, व प्रमुख अमलदाराप्रमाणें धिप्पाड, भव्य व दिसण्यांत भयंकर असून धवलागिरी या नांवानें जगद्विख्यात असणाऱ्या शिखराचा, आपल्या हाताखालील पर्वतरूप कनिष्ठ सरदारांकडेस ते आपआपल्या स्थळीं खडे पहारे करण्याचे कामांत हुशार आहेत किंवा कसें हें जसें कांहीं अवलोकनच करीत आहे! असा भास होऊन परमाल्हाद होतो, व तुझें अगाध कर्तृत्व पूर्णपणें लक्षांत ठसून अहंपणा ह्मणजे मी मी ह्मणविणारा हा देह तुझें अनुपम्य हें भूमंडळ, तेथील स्वच्छोदकानें झुळझुळ व खळखळ अशा वाहाणाऱ्या शोभिवंत लहान मोठ्या नद्या, त्यांचे तीरावरील अनेक तऱ्हेचीं हिरवीं गार झाडझुडपें तशाच वनस्पति, कोठंकोठें काळेभोर पर्वततुल्य असे असणारे खडक, डोंगरांच्या तुटलेल्या कडा, ठिकठिकाणीं असलेले हिरवेगार फारच दाट, उघडे बोडके वगैरे पर्वतांच्या ओळी, त्यावरील वसलेलीं लहान सहान खेडीं, धनगरांच्या झोपड्या, व त्याचे मेंढवाडे, डोळयास चक्कर आणणाऱ्या अशा ओंड

दरी, खिंडी, तीन असणारी बारीकसारीक खेडींपाडीं, बहुत उंचीवरून अति जोरानें पडणारे धबधबे, सुंदर शहरें, उद्यानें, हिरवींगार शेतें, लहान मोठीं मैदानें, चरत असलेले गाई म्हशींचे कळप, नानाविधपक्ष्यांची स्थलीस्थलीं उडालेली गडबड, खाड्या, समुद्र, त्यांतून चालणारीं जहाजें, वगैरे हे विश्वांतील मनोहर देखावे पाहून चकित व आनंदांत मग्न होऊन जगदीश्वरासमोर किती क्षुल्लक मी हा पामर अशी लीन बुद्धि उपजून त्यास त्या द्वारा होणाऱ्या दिव्यसमाधानवृत्तीचें वर्णन कोण करील? इतर सुखांचा तिजपुढें काय पाड?

अशा हे तोषोत्पादक पृथ्वीरमणा! तुझ्या कृपेनें आमचें संरक्षण होतें व ज्या तुझ्या त्रिवार नामस्मरणानें प्रत्यक्ष काळही लटलटां कांपेल, असा बहु पराक्रमी, दयाळु तसेंच विद्युत् शक्तीस जसें पर्वत चूर्ण करण्याचें सामर्थ्य तद्वत् पर्वतप्राय कोसळलेलीं अशीं अनिवार दुःखांचा विनाशकर्ता जो तूं सर्व व्यापक, त्या तुझा महिमा अतर्क्य, तुझी लीला अगाध व तुझें आम्हांसारख्या अनभिज्ञमानवांक्ष्यानें वर्णन सुद्धां होणें कठीण.

अजः * सर्वेश्वरः सिद्धः सिद्धिः सर्वादिरच्युतः
वृषाकपिरमेयात्मा सर्वयोगविनिःसृतः ॥१॥

विश्वमूर्तिर्महामूर्तिर्दीप्तमूर्तिरमूर्तिमान् ॥
अनेकमूर्ति + रव्यक्तः ‡ शतमूर्तिः शताननः ॥२॥

## शार्दूलविक्रीडित

ज्याचा आदि व मध्यनांत कळुनी ब्रह्मांडगा चालवी ॥

---

* अजन्म ( जन्मरहित ) + सर्वांतर भागीं जो तो ‡ अदृश्य ( शतमूर्तिः ) शंभर मूर्ति व ( शताननः ) शंभर मुखें हा शब्दालंकार आहे, याचा गूढार्थ तो सर्वत्र, सर्वव्यापक असा आहे.

ऐसा थोर गुणान्वित प्रभु आह्मां अर्पी सदाचा रवी ॥
होतें सौख्य सदा मनीं अतुल जें तेणें जगत् तोषवी ॥
दुष्काळीं पडतां अजाण जन त्यां नाना मिषें हारवी ॥१॥

## कामदा

राहुनी जगीं दृश्यना धनी ॥ नित्य काळजी वाहतो मनीं ॥
दृष्टि माजिया न्यून ना घडे ॥ पाहि या परी या दिनाकडे ॥१॥

असा जो जगद्वंद्य परमात्मा, परमेश, त्यानें ह्या भूमंडळामध्यें मनुष्यमात्रांस आनंद होऊन त्यानीं हरघडी त्याचें नामोच्चारण करून आपलीं मनें स्थिर, शांत व सुखी करून घ्यावीं ह्मणून चित्तवृत्तीस आनंदविणारीं जरीं अनेक साधनें केलीं आहेत तरीं महान् महान् पुरुषांच्यानीं करवलीं नाहींत तरी ही नाना वेळीं एका निराळयाच प्रकारची शोभा भासविणारे, एखाद्या पुरीची यात्रा भरावी त्याप्रमाणें स्त्रीपुरुषें लहान मुलीं मुलें बाहिर हिंडत फिरत असल्याकारणानें ही एक यात्राच आहे कीं काय! असे दिसणारे अनेक दिन ऋतुमानुरूप सुखोत्पादक व्हावेत किंवा होतील या समजुतीनें उत्पन्न करून ठेविले, त्यामधलाच शरदृतूंतील कार्तिक महिन्यामधील त्रिपुरी पूर्णिमेचा दिवस होय.

या दिवशीं, प्रातःकाळचे आठ एक वाजण्याचे सुमारास एक सुंदर देखणा तरुण महाबळेश्वर पर्वताचे पायथ्यापासून सुमारें पांच कोस अंतरावरील वसलेल्या तेथील लहानशा पण लोकवस्तीनें दाट अशा टुमदार खेड्यांतून उघडा बोडका फक्त नेसलेल्या एका वस्त्रानिशीं चालला असतां मनांत कांहीं विचार येऊन नेत्रावाटे अकस्मात् बाष्पबिंदु गळण्यास लागून तो जें कांहीं मुखावाटे ह्मणे ते, कंठ दाटून आलेला असल्यामुळें, न समजे अशाप्रकारचें असल्याकारणानें त्याचे सभोंवार गराडा पडलेल्यांची तो शुद्ध वेडा असावा अशी समजूत होऊन वारंवार त्यास खो खो खो हसून व

आधून मधून खट्याळ उनाड पोरें "हुर्यो, हुर्यो" असा एकच किलकिलाट करीत. या दुःखदायक थाटानें तो चालला असतां दुर्दैवानें त्याचें एक पाऊल रस्त्यामधील खांचेंत पडून बिचारा धाडकन् जमिनीवर आदळला ! मग काय ! त्यावेळेस अज्ञान अल्पमति अशा शहाण्यांचे इष्ट हेतु पूर्ण होऊन पोट धरधरून जीव नको नकोसा होई तोंपर्यंत गदगदां हसूं लागले. कित्येकांचें त्यामुळें पोट फुगल्यामुळें आपण आहों कोठें य.चा विचार न सुचून मोठ्या अकडीनें तेथील असलेल्या दुर्गंधयुक्त मृत्तिकेवरच त्यांनीं आसन ठोकिलें. तेव्हां काय विचारितां ! तेथें हास्यरस बराच माजून जे कोणी थोडे बहुत निमुट उभे होते त्यांचे अंगांतही हसण्याचें रें शिरलें ! त्यावेळीं तेथें बरीच गर्दी उडून शिमगाच मातला. कित्येक, त्यानें पुनः वर डोकें उठवूंच नये ह्मणून स्वतः ओढा-ताणही करण्यास लागले. इतकेंच नव्हे तर जमलेल्या विलक्षण. पोरांस त्या दुःखडोहांत बुडालेल्या प्राण्याच्या अंगावर शेण, माती, चिखल आदिकरून घाणेरडे पदार्थ टाकविण्यासही उद्युक्त झाले; कांहीं "गड्या, भली झाली. भली झाली" असें ओरडण्यांतच गर्क होऊन गेले. सारांश, त्या तरुणाचे आगमनानें अद्भूतरस असा पिकला कीं, तो लिहितां येत नाहीं.

कोणीं कोणांस हसूं नये. हें वास्तविक आहे. तथापि क्वचित् स्थळीं हसूं येणें साहजिक आहे, आतां न येण्याविषयीं तजवीज ठेविल्यास तो उत्तम पक्ष. परंतु वेळ आहे. एकाद्याविषयीं हसूं आलेंच तर गदगदां हसतच राहून त्यास ओशाळविणें हें ठीक नव्हे; याहीपेक्षां वरील धांगडधिंगा करून एकाची उगाच शेंडी पकडून थप्पड लगाविणें किंवा असाच कांहीं पोरकटपणा करणें हें मनुष्यांस अगदीं अयोग्य. फार तर काय अशा मनुष्यांशीं, दूर राहून जेवढ्यास तेवढेंच अशा बेतानें राहिल्यास यांतच हित आहे. किंबहुना अशांचे वाऱ्यांसही उभें न राहिलें तरी क्वचित्च अडेल; कारण हे गळ्यांत घोंगडें केव्हां आणतील याचा विश्वास नाहीं.

मनुष्यें एकसारखीं ओरडताहेत, खिदळताहेत, तों इकडे नर उठण्याची संधि मिळतांच तो दुःखित प्राणी हळूच हात टेकून तसाच धडपडत उभा राहून दुःख व लज्जेनें युक्त अशा मुद्रेनें नेत्र द्वारें टप टप आसवें गाळीत एका बोळांत शिरून रस्ता जितक्या त्वरेनें तोडवेल तितक्या त्वरेनें तोंडीत जाऊं लागला.

## दिंडी

अशी कष्टित तो, मार्ग निमुट चाले ॥
नयन अश्रूंतें, पूर लोट आले ॥
वदन उतरोनी, व्यग्र कीं हो झाला ॥
स्फूर्ति पावे तो, तयीं दुःख काला ॥ १ ॥

तेथपर्यंतच काय तीं गालिप्रदानें त्या गरीबास खावीं लागलीं, पुढें नाहींत, हें तरी त्याचें भाग्यच. जर का ह्या थाटास प्रतिबंध होताचना तर तो त्या बोळानें अधिक वैभवानें चालून तरुणाचे पुरे हाल होते यांत बिलकूल संशय नव्हता. परंतु तेथल्या एका सदय अंतःकरणाचे अम्मलदारास, ही धिंड पाहून, कळवळा येऊन खरमरीत रीतीनें त्या लोकांस असें कांहीं चापलें कीं, कसचें काय ? ज्यानें त्यानें पोबारा केला. हा त्याचा त्याजवर मोठा उपकार समजला पाहिजे, आणि त्याप्रमाणें त्या तरुणानें त्याचे आभार प्रदर्शित केले नाहींत असें नाहीं, तत्रापि तो त्याचा व्हावा तसा उतराई झाला नाहीं हें खचीत.

आतां कोणीही आपणासभोंवती नाहीं असें पाहून तो दुःखित स्वतांशीच किंचित् दीर्घस्वरानें बोलूं लागला " वः, काय माझ्या शहाणपणाचा प्रताप ! धिक्कार असो मला ! काय, शोधांतीं अन्य स्थळ गांठोळें ठेवण्यापुरतें मिळेंना ? अगोदर पहा मी किती वेडा ! कोणत्याही दिवशीं, मग महापर्व कां असेना, हा दिनकर जाणारा नसून आज ह्या गांवीं नदीस्नानार्थ मित्रासमवेत येण्याची

१३८

बुद्धि व्हावी [illegible] अनोळखा परघरीं–यांतून परस्त्रीच्या घरीं–बिऱ्हाड कर-
णें हें दूषण [illegible] असें मीच लोकांस शिकवीत असतां तोच प्रकार मजक-
डून कसा घडला!

> अहो नु कष्टःसततं प्रवास । ततोऽतिकष्टः परगेहवासः ॥
> कष्टाधिका नीचजनस्य सेवा । ततोऽतिकष्टा धनहीनता च ॥१॥

खरोखर 'परगेहवास' मला भोंवला! काय बोलूं! माझें धोतर गेलें, उपवस्त्र गेलें, पागोटेंही नेलें आणि इतकेंही होऊन जिवावरचा प्रसंग बेतला! असो बचावलों ही ईश्वरकृपाच होय. आतां मी हें तोंड घेऊन घरीं काय सांगूं? अहा! पहा, एका निमिषांत माझी काय दशा झाली आणि मित्राची ही दाणादाण होऊन गेली! काय तिचें आणि तिच्या साथीदाराचें चातुर्य हें! किती धाडस तें! दुष्टेच्या आत्मघातकरण्याविषयीं अघोर कृत्यास प्रतिबंध व कुवासनेबद्दल उपदेश सिंचन केल्यानें तिनेंच मजवर फिरून मनांत रोष धरून जिवें मारण्याचा यत्न करावाना? अरे समजलों कीं, भाषण मोकळें त्या अर्थीं मनही मोकळें असेल! असो; इजवरून अशिक्षित स्त्रिया बहुशः घातकी, निर्दयी, अविवेकी, मंदमति अशा असतात हें प्रत्यक्ष अनुभविलें हेंही ठीकच झालें. किती आश्चर्य! कीं, तिची मुखचर्या तिच्या स्वभावाची साक्ष देत असतांही तिकडे अलक्ष केलें! कशी गफलत ही होऊन गेली ईश्वर जाणे! काय तिचें आर्जवरून पडवींत क्षणभर बिऱ्हाड केलें हा आमचा महदपराध झाला! निराळ्याच उद्देशानें वास्तव्य होतें तर मात्र विशेष दुःख वाटतें ना. बरें झालें कीं, तिच्या पतीच्या तपाश्यांतून जगन्माउलीनें आपलें रक्षण करून परसांतून पळण्याची सुबुद्धि दिली! नाहींपेक्षां माता, पिता, भ्राता इत्यादिकांस खचीत मुकतों यांत काय संशय? बापरे! किंचित् विश्वासलों नाहीं तोंच काय हा घोरतर प्रसंग! अहाहा! द्रव्यलोभ पहा कसा आहे तो! जी ध्या द्रव्यार्थ नातलगास, परिणामाकडे दुर्लक्ष करून मृत्युमुखीं

पाडण्याची मसलत करिते आहे, तिला आह्मांसारख्यांची काय विशाद ! "लोभमूलानि पापानी" हें वाक्य अक्षरशः सत्य होय. आज अमूल्य जो हा प्राण ह्यास मुकून भूमितल त्यजून परलोकवासी व्हावें लागत होतें; परंतु दयामय जगत्पित्यास तें कसें रुचेल ? झालें तें ठीक झालें ह्याच ठेचेनें मी आज सावध झालों. कांहीं असो; स्त्रिया ह्या अविचारी खऱ्या. (दचकून) अरेरे ! मी ह्मणालों काय ? किती माझा हा कोतेपणा ! मुखावाटे कोणतें दूषणी-य वाक्य काढतों ! छीः काय माझा हा पक्षपात ! आणि केवढा अविचारी मी ! सर्व स्त्रीजातीस दूषण ठेवितों हें माझें मौर्ख्य नव्हे काय ? काय सुशिक्षित स्त्रियांचे हातून असें दुष्कर्म घडण्याचें संभवेल ? गोष्ट काढावयास नको. याच्या थाऱ्यास उभ्या राहणार नाहींत, मग त्या दुराचरणास प्रवृत्त होतील हें बोलणेंच नको. उलट त्या आपल्या प्रियपतीच्या आज्ञेत राहून व गृह-कृत्यांची नीट व्यवस्था ठेवून कुटुंबांत पडणाऱ्या अनेक वितुष्टांचें श-मन करतील. आपल्या बालकांस नीति अनीतीचे परिणाम समजावून सन्मार्गबोध करण्यास पुढें सरसावतील आणि लग्न कार्यांमधील अ-व्यवस्थितपणा व घरगुती विनव्यय इकडेही त्यांचें दाक्षिण्य राहून मुख्य जें अज्ञान व मूर्खांच्या भलभलत्या समजूती यांच्या कचाट्यांतून निभावून पार पडण्यासही त्या समर्थ असतील, असें असतां त्यांस अधम व मूर्ख ठरावतों हें केवळ अजागळपण. जसे आम्ही तशाच त्या. पुरुषच ज्ञानी आणि स्वतंत्र; व त्या अज्ञानी आणि पर-तंत्र; हा सिद्धांत ठरविणें, ह्मणजे एखाद्यानें सत्तेच्या योगें हवें तसें वर-त्ऊन, तथ्य असो नसो, तो करील ती पूर्वदिशा, अशासारिखा होय असें साफ ह्मणतों. पुरुष अज्ञान—भ्रममुक्त होत असें कोणाच्यानें तरी क्षणभर ह्मणवेल काय? तर मग अबलांवर काय हा विशेष कटा-क्ष! जन्मतः अवगुण त्यांस अंगभूत असें समजणें हा केवढा थोर वि-चार! कां अजून आमचीं नयनकपाटें उघडत नाहींत आणि कां आह्मी निःसत्व भारण वरळतों आगें. सर्वतोपरी आह्मीं नाशाप्रत

पोहोंचल्यावर मग जागृत होणार कीं काय नकळे. आज होणाऱ्या कृत्यास उद्यांवर लोटण्यांत किंवा अशक्यात् ईश्वरावर त्याची हवाला टाकण्यांत अर्थ नाहीं.

## कामदा.

श्वास हा दिनीं रात्रि वा निघे ॥ काळ तीतुका व्यर्थ जातसे ॥
नेत्रीं आलि जे लागती त्वरें ॥ त्यापरी वया हानि येतसे ॥ १ ॥

कारण उद्यां उद्यां ह्मणतां काळ निघून जाईल आणि घरीं स्वस्थ बसून कितीही करुणा भाकूं लागलों तरी ती व्यर्थच. चिखलांत रुतलेला गाडा जसा नुसत्या प्रार्थनेनें न सुटतां खांदा दिल्यानें तत्काळ संकटविमोचन झालें तसें "प्रयत्नीं परमेश्वर" ह्मणून शक्यनुसार, जिच्या अभावानें गृहांत हरहमेश नुकसान व अडचणी सहन कराव्या लागतात आणि व्यवहारांत ह्मणजे कोणतेंही जनहिताचें किंवा कांहीं काम हातीं घेऊन तें तडीस नेण्याचा हेतु धारण केलेला असतां किंवा कोठेंही परगांवीं वित्तसंपादनार्थ जाणें होत असतां त्यांत तिलमात्र साह्य न होऊन अनिर्वाच्य खेदोत्पत्ति व्हावी, जिच्या आभ्यासानें गार्गीसारख्या प्राचीन आर्यस्त्रिया ईश्वरविषयक ज्ञानांत निष्णात होऊन धन्य व्हाव्यात, व जिच्या व्यासंगानें पाकनिष्पत्ति, शिवणकामें, लिहिणें, वाचणें व आंतील अर्थ समजणें या विषयांचे ज्ञान व्हावें, त्या पुरातन स्त्रीशिक्षणपद्धतीस द्रव्यसाहाय्य, शक्तिसहाय्य अथवा हरएकप्रकारचें सहाय्य देणें फलदायकच होणार आहे; कारण, शिक्षण नाहीं तर बुद्धिप्रगल्भ होऊन सारासार निवड करण्याची ते थें कोठची शक्ति असावयाची? मुळीं विद्येच्या योगें ज्ञान आणि तिच्या योगें सद्विचारारोपण होऊन नंतर मनुष्य आपलें कर्तव्य कोणतें हे जाणूं लागून सत्कर्मास प्रवृत्त होणार, व यथान्याय तें ग्रहण करणार; परंतु अशाचा जेथें दुष्काळ तेथील दुर्दशा काय पहावयाची? नुकताच जो मजवर प्रसंग येऊन ज्यांतून माझें रक्षण झालें तो या कारणानेंच, यांत संदेह नाहीं. असें नसतें तर तिचा क्रोधाग्नि इतका

संतप्त, होताचना. नुसतें विद्याशिक्षणच नव्हे, व्यवहारिक शिक्षणही जीस शून्य ती अविचारी, चंचल, द्रेष्टी अशी कशी निपजणार नाहीं? ही उणीव देहांतर्भागीं प्रदीप्त असल्यानें शमदमादिकांचें तेथें निराभास राहून उद्दाम अनाचार बराच बनावून ज्ञानोपद्रष्टा उपदेशक व बोधक तिला दिसणें स्वाभाविक आहे. अशा कुसंगगामिनीस सत्कथनीं अप्रीति व विद्वेष ठेवण्याचें धार्ष्ट्य क्षणभर प्रियकर वाटेल; परंतु परिणाम चिरकाल निर्भत्सनेस कारण होऊन ती वडिलोपार्जित संपादित संपत्ति व कीर्तिही लयातें पावेल, हें निःसंशय. आणि यांचें दुराचरणाकडेस जितकें अधिक प्रवर्तन होतें तितकें कमी, ज्ञानाभरणांनीं अलंकृत असलेल्यांचें, होणें कठीण. दृष्टेस सद्विचारोपराग न होतां या दिनकराचें मधुर भाषण विरोधी वाटून त्यांस आरोपित करून काय गळफासांत आणलें अं, परमेश ! तूंच मला संभाळिलेंस ! नाहींपेक्षां कोठचा मी अजून राहून हे जग, हीं झाडें, हा तलाव, ह्या सुंदर विहिरी, हे दूरदूचे गंभीर डोंगर, हे गांव, हीं उद्यानें पाहतों! देवा! ह्या जगत्प्रकाशक तेजोनिधि आड होत होतों ( उच्छ्वास टाकून ) अरे काय सांगू? त्या औदाशीणीच्या पतीची आठवण झाली कीं, काळीज धडधडा उडूं लागतें. त्या वेळेस खरोखरीच तो काळ भासून हा आपणास खास यमपुरीस पाटवितो असें लक्षांत आलें, तेव्हां हे प्रभो! मति गुंग होऊन तुवाच्या झपाट्यांतून निभणें कठीण वाटलें होतें; पण नाहीं, तुझी मजवर कृपा असल्यामुळें तशाही तडाक्यांतून पार पडलों. अहाहा ! त्या दुष्टानें भोंसकून घायाळ केलेंच असतें! पण दैवयोगानें त्याचा रोंख चुकून जवळील कुडावर आदळला आणि यथायोग्य शासन मिळालें म्हणून ठीक झालें. नाहींतर हे दीनदयाळ, दीनवत्सल जगदीश! हा दिनकर कोठून रहावयाचा? हे विश्वचालक! तव कृपेकरूनच हें अखिल ब्रह्मांड सुरक्षित क्रमानें किंचितूही त्यांत अव्यवस्था न होतां किंवा पडतां चाललें आहे, मनुष्यमात्रांची व क्रिमिकीटकादिपासून तो पक्षी पश्वादिकांची पोषणक्रिया बिनचूक नित्य घडत आहे, आणि आम्ही

मानव आकस्मिक संकटांत पतन पावलों असतां, किंवा शारीरिक पीडे-च्या व्यथेनें व्यग्र होऊन त्यांतें तळमळ करण्यास लागून अन्नादि व्यवहार अजीबात बंद पावून क्षीण होत चाललों असतां अकस्मात् पूर्वस्थिति प्राप्त होत आहे, इतके तुझे महदुपकार होत असतां व आमचें तारण करीत असतां तुला जाणून तुझें नाम आह्मीं न घ्यावें, व तुझा थोर उपकार नस्मरतां व तुझें दास्यत्व न करतां पोकळ गर्व-मदानें आणि क्षुल्लक अभिमानानें फुगून कालक्रमणा करावी, हा केवढा आमचा शतमूर्खपणा! हें केवढें आमचें दुष्ट आचरण! मुलांस पित्यानें लहानाचें मोठें करून विद्याविवेकादि गुण दिले असतां पुढें मोठेपणीं त्यांस न विचारणें, त्याची अवज्ञा करणें, हें विचारदृष्ट्या जितकें अयोग्य तितकेंच तुला कीं, जो तूं आमचें मोठ्या ममतेनें संरक्षण करितोस, अनेक कोड अनेकवेळां पुरवितोस व नाना अरिष्टें दूर करितोस त्या तुला जन विसरो; परंतु मी कधीं विसरणार नाहीं. हे विश्वपालक, जोंवर तूं माझा पाठीराखा आहेस तोंवर मला मुळीं भीति नाहीं"

असा तो वाटेनें दुःख, शोक व विचार करीत चालला असतां, त्याचा मित्र दिवाकर, एका भिंतीच्या आड उभाराहून, डोळे पुशीत आहे असें त्याच्या दृष्टोत्पत्तीस आलें. त्यावेळेस त्यानें " आहा-रे माझ्या जिवलगा! " इतकेंच, कंठ दाटून आल्याकारणानें बोलून घट्ट गळ्यास मिठी मारली. कांहीं पळांनीं पोटांतील दुःखाचे उमाळे शमल्यावर दिनकर म्हणाला " या, भिऊं नको, त्या प्रभूच्या दयेनें आपण पार पडलों आहों. आतां नको नको तूं अधिक दुःखी होऊं! तुझें हें म्लान वदन पाहून माझा दुःखपरिहार न होतां उलट तो वळावतो हें लक्षांत आण आणि उगी रहा! "

नंतर त्यांचें दुःख निरसन झाल्यावर लपत छपत आडमार्गानें गांवा बाहेरील एका पुष्करणीवर येऊन तेथें विसावा घेतल्यावर त्या निर्मळ पाण्यांनीं त्यांनीं आपलीं अंगें धुतलीं. आणि जवळील आम्रवृक्षाखालीं येऊन " आतां गांवीं कसें जावें, याच पंचांनीं जावें तर

येथें उडाली ती थोडीच; पण याहीपेक्षां दशगुणित जास्त तेथें फटफजीती उडणार!" वगैरे अशा अनेक कल्पना त्यांच्या मनांत उभ्या राहून ते शुद्ध वेडे असे बनले. "सध्या जवळ फुटकी कवडी नाहीं, अगती तरी अशा वेषानें निर्लज्ज होऊन वस्त्रें आणावयाचीं नाहींत, मिळून एकच. आणि आतां पांच कोसांची तर मज्जल ठोकणें आहे" ह्या विवेचनेनें दिनकरास जितकें कमी वाईट वाटलें नसेल तितकें त्याचा मित्र व्यर्थ कचाट्यांत सांपडून, त्याजसुद्धां त्यास अविचार भोंवला, याविषयींचें फारच दुःख वाटून. मान खालीं घातली आणि डोळे आसवांनीं भरून आणून मित्राकडे टकमक पहात राहिला. दिवाकर हाही जरी त्याच्या सारिखाच दुःखानें पोळत व चिंतेनें झुरत होता तथापि मनांत असें आणलें कीं, त्यानें किंवा त्याच्या मित्रानें तेथल्या पाटलाकडे जाऊन त्यास हा अकस्मात् पडलेला घाला कळवून कांव आणावी व नाहींशा झालेल्या सर्व मालाचा पत्ता लावून, त्या कैकयेसही दरारा बसून पुनः अशा फंदांत न पडण्याची कानचिवळी घेऊन तिच्या करणीची तिलाच लज्जा वाटेल असें करावें. ही युक्ति दिनकरास मानून हुशारी येऊन तो "हा मी जातो पहा" असें ताडकन् ह्मणाला; परंतु तशी कृति न करण्यास दुसराच संशय कारणीभूत होऊन अवसानानें बांधलेली कंबर सुटून गलित होऊन गेला. ह्मातो वरून मुखावर भीतीचीं चिन्हें झळकूं लागलीं. नीं व मुखास तेजी चढून ती तेव्हांच विरघळली, हे असे समयानरूपें झालेले प्रकार पाहण्यांत येतांच दिवाकरानें जाणलें कीं, ह्या गड्यानें मघांशीं ओढून ताणून चंद्रबळ आणलें होतें खरें, परंतु वास्तविक हा काचावला आहे यांत संशय नाहीं. याच्यानें ह्मणून आतां येथली काडी तेथेंही व्हावयाची नाहीं. तेव्हां ज्याअर्थी आपणासच हा विचार सुचला, त्याअर्थीं हें काम आपणच पत्करून शेवटास न्यावें हें बरें. त्याप्रमाणें मित्रास तेथेंच घटिकाभर बसण्यास सांगून आपण तडक ईश्वरावर स्वतःच्या जीवाचा हवाला टाकून पाटलाचे घरीं येण्यास निघाला. पाटील हे, बायकोवर स्वयंपाकाची

भट्टी विघडल्यामुळें रागावून पाय आपटीत बाहेर ओंटीवर येऊन संतरंजी टाकून आचारी ठेवणें आज नाहीं उद्यां भाग पडून पांच दहा रुपयांचे खर्चांत पडतों, अशा फिकीरींत चिलीम ओढीत बसलें असतां, दिवाकर वाटेनें गरीब भिक्षुकाचा वेष घेऊन उघड्या अंगानें मध्यंतरी कोणतेही अडथळे न सोसतां नेमकाच तेथें, येऊन घराची तिसरी पायरी चढून हात जोडून स्तब्ध उभा राहिला. हा कोण व येथें येण्याचें याचें प्रयोजन कोणतें हें, तो निमुट तिष्टत राहून मुखांतून चकारही शब्द न काढल्यानें, बुवास न समजतां प्रथम दर्शनींच त्याचें मौनव्रत पाहून हा कोणी स्वकार्यसाधु आपणास त्याच्या जाळ्यांत पकडूं पहात असावा असें वाटून आश्चर्य झालें. नंतर क्षण एक जातां त्यानें त्यास विचारलें कीं, " तूं कोण आहेस?" असा प्रश्न केला. तो ऐकतांच त्याचे डोळे भरून येऊन त्याजवर ओढवले-ल्या संकटाचा इत्थंभूत वृत्तांत सांगून आतां आह्मांस न्यायदाते आपणच आहां असें लीनपणें ह्मणाला. ह्या विनंतीवर किंचित् विचार करून त्यानें त्यास " सारें खरें, पण यास आपल्या तर्फेचा कोणी साक्ष किंवा तुह्मांवर असा प्रसंग आला तो कोणी नुसता बघितला तरी आहे काय? " असें विचारिलें. हें ऐकतांच त्यानें मनांत जो घाट रचिला होता त्यास धचका बसून तो धाडदिशीं कोसळला. येथें थोडीतरी दाद लागेल अशी जी त्यास कांहीं उमेद होती तीं उडून त्याचें तोंड खरदिशीं फिकें होऊन गेलें; आणि पाटलानें काय विचारलें तें न आठवे अशी क्षणांत स्थिति झाली. पाटील पुनः ह्मणाला ' कां ! गप्पसे ? एकून साक्ष आपला नाहीं असें दिसतें. तर मग आपला हा कज्जा निरर्थक आहे, किंवा आपलें हें बनावट म्हटलेंही नरोलसें कशावरून!" शेवटील हें वाक्य दिवाकरास जागृत करण्यास साधक होऊन तें त्याच्या काळजास चरचरीत झोंबलें. पण करतो काय? " महाराज निरपराधें एखाद्यावर आरोप करून आह्मांस काय मिळणार होतें. असो; फिर्याद सार्थकत्व पावणार नाहीं ह्मणतां तेव्हां नाईलाज आहे. " इतकें बोलून निमुट

पणें आलेल्या मार्गाची वाट धरिली; आणि स्वस्थळीं येऊन अजून आपला मित्र त्याच स्थितींत मग्न राहून वस्त्र पांघरून बसलेला आहे असें पाहून दिवाकरास, पाटील बुवाच्या भाषणानें उद्भवलेल्या दुःखांत अधिक भर पडून तो दुःखित झाला. जेमतेम तो मित्रासन्निध आल्यावर त्यानें आतां खेद मानण्यांत अर्थ नाहीं, झालें तें ठीक झालें, अशाप्रकारचा स्वतःस व त्यास धीर देऊन आपल्या फाडलेल्या धोतराच्या फडक्यानें त्याचें डोकें गुंडाळण्यास सांगून उरलेल्या चिंधीनें आपलें डोकें गुंडाळिलें आणि दीनवदनयुक्त हळहळत आपल्या गांवीं येण्यास निघाले.

कांहींकांस, कोणतीएक उडत आलेली वातमी किंवा गोष्ट कानीं पडतांच तिचें लंबीकरण करून व तीस मीठ मसाला लावून सांगण्याची खोड फार असते. त्यामुळें तिच्या सत्यासत्याची निवड करण्यास अवघड जाऊन कधींकधीं तिच्या विरुद्ध समजण्यानें अनहित होतें हें अज्ञानांस कशानें समजणार? अशाच तऱ्हेची; पण थापेची साम्यता न पावणारी, लांबविलेली खबर महाबळेश्वर मुक्कामीं त्यांच्या वडिलांस लागून प्रथम ते गांगरून असें घडण्याचें कारण व्यक्त झालेलें नसल्यामुळें आतां करावें काय? हें त्यांस सुचेनासें झालें. आपलीं मुलें उद्धत किंवा कोणासही उपमर्दणारीं नसून कुशाग्रबुद्धीचीं असतां असा घोरतर प्रसंग येऊन गुदरला याचें त्यांनां अनुमान बांधवेना. शेवटीं त्यांनीं दोन विश्वासू सेवक खरा वृत्तांत कळण्याकरितां व तसेंच त्यांनांही आणण्याकरितां पाठवून स्वतःचें थोडें बहुत समाधान करून घेतलें. तरी मन विकल्पानें वसतिस्थानच झाल्यामुळें त्यानें त्यांस हैराण करून टाकिलें. एकदां वाटावें की, बाळांस भीति नाहींना? तेव्हांच मनांत यावें कीं कोण जाणें! मोठा गडजुवच उडालेला नाहीं कशावरून? अशी मनाची तारांबळ होऊन ते घोटाळ्यांत पडले असतां थांग ना पत्ता असलेल्या मित्राच्या अवचित भेटीनें जसा परमानंद होतो तसा शोधार्थ पाठविलेल्या चाकरांची पुनरागमनाची वर्दी श्रुत करून आनंद झाला; आणि पूर्ववत् धैर्य

येऊन निस्तेज पडलेल्या मुखांस टवटवी आली. इतक्यांत दिनकर आणि दिवाकर घराचा उंबरठा चढून वडिलांस नमस्कार घालून हात जोडून ह्मणाले " बाबा, धन्य तो ईश कीं, ज्याच्या दयेनें आह्मी संकटसिंधु तरून सुरक्षित आहों " हें ऐकून त्यांच्या नेत्रद्वारा अश्रु आले. ते रुमालानें पुसून टाकिल्यावर भाऊराव ( दिनकराचे वडील ) ह्मणाले " मुलांनों, आपली चिंता त्या जगत्पित्यास आहे. त्यास आपला नाश करणें कसें आवडेल? हे दयानिधे,

## दिंडी

तुझ्या करुणेची असे जगत्ख्याती ॥
ज्ञानथोरादिक तीच सदा गाती ॥
दृश्य नसशी परि अखिलजगद्व्यापी ॥
असशि तुजवीणें कोण शत्रु कापी ॥ १ ॥

असो; गोष्ट फार वाईट झाली! इतक्यानें तरी बरें झालें कीं, तुह्मी बचावून आलां. तुमचीं सर्व वस्त्रेंही गेलींना? वः काय चमत्कार हा! एकून तुह्मांस तें तीर्थ चांगलें प्रसन्नच झालें ह्मटलें पाहिजे. तर मग हा वृत्तांत ऐकण्यासारखा असावा. त्यांचें, झालेला प्रकार जाणण्याचें धोरण पाहून दिनकर ह्मणाला " बाबा, काय सांगूं, आपण, वेळ चांगली नव्हती ह्मणा अथवा तो दिवस शनिवार असल्यामुळें शनि आमचे हितावर होता ह्मणा; परंतु मी वारांतील कोणत्याही दिवसास दूषण न देतां माझा मलाच देतों. दिवस वाईट होता ह्मणावा तर त्यानें सर्वांवर समदृष्टीनें तडाका चालवावयाचा होता कीं नाहीं? मजवरच त्या विंच्यान्यानें कां टवकारावें? हें कांहीं असो; येथून जे आह्मी निघालों ते उजाडल्यावर त्या गांवीं येऊन दाखल झालों. आणि किंचित् बाहेर उभे राहून नंतर गांवांत येऊन गांठोडें ठेवण्यापुरतें लहान बिऱ्हाड करावें ह्मणून त्याबद्दल चौकशी करूं लागलों, तों एक लहानसें चौसोपी घर आढळलें. उतरण्यास

घरधनीणीची आज्ञा मिळतांच पडवींत बोचकें ठेवून लगबगीनें स्नानार्थ चालते झालों. आमचा तेथें जाण्याचा उद्देश हाच कीं, दर वर्षी पूर्णिमेस भरणाऱ्या यात्रेची मजा पहावी, सज्जनांचे सद्गुण पाहून त्यांचें अनुकरण होईल तितकें करावें, आणि रात्रीचे समयीं शुभ्र चांदण्यातून, आनंदानें घरीं यावें. बाबा, तेथें काय विचारतां! मोठी यात्राच जमली होती. गांवोगांवच्या लोकांचे थवे मैदानांत येऊन उतरले होते. कोणी मृदंग, वीणा, टाळ हीं घेऊन नदीतीरावर गात बसले होते. कित्येक नुसत्या टाळ्याच पिटीत होते. असो; सांगण्यासारखी एक गोष्ट आहे. ती कोणती ह्मणाल तर, मी समजत होतों कीं, जसे हे लोक एकेच दिवशीं नेमलेल्या वेळींच नेमलेल्या स्थळीं जमतात तसाच त्यां सर्वांचा एक विचारही असेल; पण नाहीं हो तसें पाहण्यांत आलें! एके ठिकाणीं कांहीं मनुष्यें हातांत टाळ, विणे घेऊन भजन न करतां कावरे बावरे होऊन आसपास पाहत उभीं होतीं. असें होण्यासारखें त्यांच्यावर असें कोणतें परचक्र येऊन त्यानें तेथील सर्वांचीं मनें अस्वस्थ केलीं हें जाणावें असें वाटून त्यांतील एकास हळूच विचारिलें कीं, "बाबा, ही मंडळी अशी कां दिसत आहे?" तेव्हां तो ह्मणाला "तुह्मांला तें नाहीं ठाऊक. त्या मंडळीनें गाण्यांत आह्मांपेक्षां जास्त बहादुरी मिळविली ह्मणून आह्मी चवताळलों आहों." त्याचें ते सांगणें ऐकून आह्मीं कांहीं पाऊलें गेलों नाहीं तों तिकडे माराहाण उडून बरीच धुमाळी माजून गेली. आणखी, तेथें जवळच कोणा वैराग्यानें एका स्त्रियेचें त्याजजवळ ठेवलेलें चिरगुट पांघरूण त्याच्या मित्राच्या साक्षानें लांबविलेलें असल्यामुळें त्या संबंधी बाटाघाट चाललेली आह्मीं पाहिली. ती बाई त्या बुवाची भीड न धरतां चापून अद्वातद्वा बोलू लागली, तेव्हां अन्यायी असतांही मस्तक तापवून तिच्या मुसकटींत त्यानें अशा जोरानें भडकावली कीं, तत्क्षणीं ती बेशुद्ध होऊन पडली. मग काय पहावयाचें! तेथें ही बरीच गडबड उडून जो तो आपला जीव घेऊन पळूं लागला. सारांश अशाच गुणामुळें ह्मणजे

परस्परांत हेवा, मत्सर आणि आपमतलब ह्या रिपूंच्या अमलास सतत मोडकळीस आणण्याचा यत्न होत नसल्यामुळेंच तो जारी चालून आपण असे बनलों आहों. अगोदर हेच, देश विध्वंसक प्रकार माजी पडूं द्या तर खरें; मग पहा आपण किती आनंदसुखांत पडतों ते! पण इतकें भाग्य कोठचें? बाबा तिर्थयात्रा करण्याकरितां जावयाचें तें एवढ्याचकरितां का? सूक्ष्म विचार करतो कोण? कारण.

गतानुगतिका लोका न लोका पारमार्थिकाः ॥
वालुकापिण्डदानेन गतं मे तांब्रभाजनम् ॥

अशी प्रकृत भ्रामक स्थिति असून विवेक भ्रमणचक्रांत सांपडून बुद्धिभ्रंश झाला आहे. एकाद्या गोष्टीचें तिच्या सत्यासत्याबद्दलचें स्वरूप विचाराअंतीं कळून येत असतां, अतिशयोक्तिवरील प्रेम व अद्भुत चमत्काराच्या गारुडाचा विश्वास, कमी न होतां, सर्व साधारण होऊन बसला आहे. हा भ्रम ज्ञान प्रभावाच्या योगें संशयमुक्त न करतां असेंच भेरीप घालूं लागल्यास कोणतां अनिष्ट परिणाम होणार नकळे. तीर्थादिकांस जाणें ह्मणजे त्या स्थलाचें नुसत्या चर्मचक्षिंद्रियानें अवलोकन करून गांठचें वित्त ओतून केवळ धन्य समजून स्वगृहीं येणें एवढेंच नसून, सत्समागम घडवून भ्रांतिपरिहार करविणें व स्वतांस समाधान वृत्तीतें पाववीणें, हाच मुख्य जाण्याचा उद्देश: तो अशाप्रकारें अंधपरंपरेनें चाललेला पाहून अति दुःख झालें.'

वरील स्थलें ह्मटलीं ह्मणजे फार करून प्रकृतीस हितावह अशा ठिकाणींच विशेष वसलेलीं असल्यामुळें साधुसंतादिक शिष्ट जनांचे मेळे, आश्रम, तेथें फार असें पाहतों. अशांशीं यथावकाशें कांहीं दिवस तरी परिचय ठेवून योग्यायोग्य निर्णय व संशयच्छेदन करवून यथार्थ तें स्वीकारण्यास कोणीही न झटतां हिंडणें, फिरणें आणि मौजा मारणें यांतच बहुतेक दिवस निघतात हें अनुचित

होय. या तीर्थाटणापासून अनुकरणीय असें विपुल सांपडत असतां तिकडे अजी अनवधान देणें ही गोष्ट दुःखास्पद नव्हे काय? ज्या विस्तृत देशांत जन्म असून ज्याला कूपमंडूकावस्थेवत् जग काय तें इतकेंच असें भासतें, अशा एकाद्यानें स्वनगराचें उल्लंघन करून तो ईश्वरनिर्मित सृष्टचमत्कार पहात पहात चालला असतां, त्यास तें मार्गक्रमण आनंदोत्पादक होईल इतकेंच नव्हे, तर विश्वकर्त्याची ही प्रचंड कृति, तिजमधील सुखकर रचना व मानवांवरील अनिर्वाच्य प्रेम हीं त्याच मनुष्याच्या नव्हे तर त्याच्या जोडीच्यांसही, विस्मयास व दयामय पित्याच्या पूज्य भावनेस कारण झाल्याविना राहाणार नाहीं. शिवाय तेथील लोकरीतिभाति, आचार विचार, सज्जन, सत्कथन पाहून व ऐकून केल्याकर्त्याची निवड करण्यासही त्यास सुलभ पडणार आहे, आणि असा हा सज्जनसंगलाभ वारंवार त्यास घडत गेल्यास यापेक्षां अधिक मूल्यवान् तें काय आहे? याकरितां:—

## श्लोक

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ॥
उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥ १ ॥

## पद

सज्जन यासाठीं यासाठीं, अवतरले या सृष्टीं ॥धृ०॥
अबोलणें बोलावें । दृष्टि न पडतें दावावें ॥ सज्जन०॥

ते संत कसे! तर—

## पद

संत दयाळ कसे । राजा रंक जया सरिसे । धृ० ।
देउनि भेटि तोडिती माया । नेउनि दाविति निज पद ठाया॥स०
श्रवणीं पाजुनि अमृत वाणी । नेउनि दाविति चिन्मय खाणी॥सं०

ईश्वरसंलग्न झालेले हेच खरे संत, व हींच त्यांचीं कर्तव्यें होत. असा समुदाय काय न करूं शकेल! नाहीं तर लांबलांब सुंदर केश ठेवून एकीकडे क्रोधादिकानें युक्त, अशांच्या गुणावगुणा-विषयीं काय ह्मटलें आहे पहा —

## अभंग

लांब लांब जटा, काय वाढवुनि ॥
पावडे घेऊनि, क्रोधी झाले ॥ १ ॥

खायाचा बोळसा, शिव्यांदे जनाला ॥
ऐशा तापशाला, बोध कैचा ॥ २ ॥

सेवी भांग अफू, तमाखू उदंड ॥
परितो अखंड, भ्रांतिमाजी ॥ ३ ॥ --तुकाराम.

हे साधु संतजन, ज्यांचें जनांस बोध करून देह परोपकारीं लावणें हेंच कर्तव्य, अर्थात् जे गुरु होत त्यांज विषयीं कोणी महान् भक्त ह्मणतो कीं —

## श्लोक ( भुजंग प्रयात )

गुरू पाहतां लक्ष कोट्यानुकोटी ॥ बहुसाल मंत्रावळी शक्ति मोटी ॥
मना कल्पना चेटकें घातपाता॥ जनीं व्यर्थ रे तो नव्हे मुक्तिदाता ॥१॥

नव्हे चेटकू चाळकू द्रव्यभोंदू ॥ नव्हे निंदकू मत्सरू भक्तिमंदू ॥
नव्हे उन्मत् वेसनीं संगबाधू॥ जनीं ज्ञानिया तोचि साधू अगाधू॥२॥

नव्हे वाउगी चावटी काम पोटीं ॥क्रियेवीण वाचाळता तेचि मोटी॥
मुखें बोलिल्या सारिखें चालताहे ॥मना सद्गुरु तोचि शोधूनि पाहे॥३

अशा प्रकारें साधूसंग देशीं विदेशीं जन करूं लागल्यास भज-नप्रसंगीं कलह, अभिमान यांचें क्षणांत निर्मूलन होणारें आहे.

सच्या संत ( शांततेनें पूर्ण ते ) समुदाय तर जबरदस्त पाहत आहों, घेतली तंबोरी कीं, झाला संत. पण नव्हे हो नव्हे अशांस तें सुंदर नाम अर्पिणें योग्य नव्हे:—

## मालिनी

मनसि वचसि काये पुण्यपीयूषपूर्णा
स्त्रिभुवनमुपकारश्रेणिभिः प्रीणयंतः
परगुणपरमाणुः पर्वतीकृत्य नित्यं
निजहृदि विकसंतः संति संतः कियंतः ॥१॥—भर्तृहरि

" मनाच्या, वाचेच्या आणि देहाच्याठायीं पुण्यामृतें करून परिपूर्ण आणि मित्र त्रिभुवनाला उपकाराच्या माळांनीं प्रसन्न करणारे व परगुणाचे परमाणूस पर्वताप्रमाणें करून आपले मनामध्यें हर्ष पावणारे संत थोडे " सत्य आहे. चांगलें तेवढें या जगांत थोडेंच सांपडावयाचें, आणि अशांचा जो लाभ तोच हितावह होय. आतां खरें क्षेत्र कोणतें? तर कृष्ण महात्मा आपल्या प्रियभक्तास सांगत आहे कीं—

## श्लोक

इदं शरीरं कौंतेय, क्षेत्रमित्यभिधीयते ॥
एतद्यो वेत्ति तं प्राहुः क्षेत्रज्ञ इति तद्विदः ॥१॥

" हे पार्था, देह हें क्षेत्र असे, जो नेमानें जाणतो तोच खरा क्षेत्रज्ञ " यास अनुसरूनच:—

## पद

" हमारा तीरथ कोन करे। हमारा तीरथ कोन करे।ध्रु०।
मनमें गंगा मनमें काशी। मनमें स्नान करे। ह०।
मनमें आसन मनमें कडासन। मनमें ध्यान धरे। ह०।

कहत कबीरा सुनो भाई साधु । भटकत कौन फिरे । ह० ।

हें कबीराचें पद आहे. मानपुरी ह्मणून कोणी साधु होते ते ह्मणतातः—

पद

पाणी मो मीनपीयासे, सुनसुन आवत हासे ॥पाणी०॥
तट तर तीरथ थेर विराजे, कहुं मथुरा कहुं कासी ॥पा०॥
ज्ञानमग्यानवीन जो नर भटके, धुंडत फिरत उदासे ॥पा०॥

वगैरे असें हें मर्म असून आमचें इकडे लक्ष नसावें ना? दयाळा, असा केव्हां सुदिन येईल कीं, जेव्हां आह्मीं सर्व परस्परांवर प्रीति करण्यास लागून त्यांचें हित चिंतीत असूं.

हें मुलाचें कळवळ्याचें, रसाळ, बोधपर भाषण ऐकून तें भाऊरावास फारच रंजविणारें झालें. यापूर्वीं आपला मुलगा इतपत चतुर, मर्मज्ञ व शोधक बुद्धीचा निघेल हें त्यांच्या स्वप्नींही आलें नव्हतें, ह्मणून तें प्रौढ व विचारी कथन मनांत घोळत राहून चिंता नाहींशी होऊन मुद्रा आल्हादित झाली, आणि त्या प्रेमलहरींत त्यास कडकडून आलिंगुनः—

वरमेको गुणी पुत्रो नच मूर्खशतैरपि ।
एकश्चंद्रस्तमो हन्ति न च तारागणैरपि ॥

या काव्याची स्मृति होऊन ईश्वराचे अनन्यभावें उपकार मानिले. भाऊरावाची हीं आनंददर्शक चिन्हें पाहून दिनकरास आनंद किंवा दुःख कांहीं झालें नाहीं. तो साध्या वृत्तीनें बसला होता. तो ह्मणाला, "बाबा, पुढें स्नानें केल्यावर देवळें व त्यांतील एकत्र झालेल्या मनुष्यांची नाना संबंधानें उडालेली लटपट पहात पहात विन्हाडीं आलों. बहुतेक देवळांतून तर आमची पुजारी बाबां-च्या हेकटपणामुळें अशी कांहीं धांदल उडून जात असे कीं, ती

मागतां पुरवत नाहीं. एके ठिकाणीं गर्दी असतां कोणा भल्यानें माझ्या कनवटीचा रुपयाच पसार केला! अहो इतकेंच नव्हे. एकाचें माझे मुखावर कोंपर लागून इतका कळवळलों कीं, तें माझा मीच जाणें. तेव्हां कोठचा मी येथें आलों असें मला झालें, आणि तसाच चुरमुरत एकदांचा बाहेर पडलों! दिवाकराची तरी गाळण थोडी थोडकी का उडाली समजतां? सांगावयाचें इतकेंच कीं, अशा ठिकाणीं जाणें आमच्या सारख्यांचीं कामें नव्हेत. धट्टया कट्टयांचीच तेथें दाद लागावयाची. इतकें बरीक झालें कीं, कधीं हा गांव काळा कीं गोरा पाहिला नव्हता तो आज मनःपूत पिंडे घेऊन बघितला. दुसरें तर कांहीं नाहीं विन्हांडीं येऊन क्षणभर विसावा घेत आहों तों तथेंही सुदर्शन आलेलें पाहून अचंबा वाटला. तो हाच कीं, घरधनीण बेधडक खोलींत येऊन आह्मांजवळ सुखदुःखाच्या गोष्टी करूं लागली. बाईच्या बोलण्याचा राग रंग समजतांच तीस सुचविलें कीं, अयोग्य वर्तन करून इह परलोकीं अन्यायाचे वेड भरूं देणें हें आपणासारख्या कुलीन स्त्रियांस उचित नव्हे. इतकें असून आपण गोठ्यांच्या आहां. आपणास कनकादिकांची किंवा कशाचीही उणीव असावी असें वाटत नाहीं. आपलें घर आहे. याशिवाय आपण ह्मणालां कीं, आपली शेतवाडीही बरीच आहे. तर इतक्या आपण सधन असतां व इतकें सुख आपण उपभोगीत असतां आपण नीच कर्म आचरण्यास उद्युक्त झालां, हें पाहून दुःख वाटतें. तों तिनें मोठ्यानें "धांवा हो धांवा, मेले मला छळताहेत. धांवा" अशी किंकाळी फोडिली. त्यासरशी आमची अक्कल गुंग होऊन व धैर्य खचून जाऊन कांपरें भरलें, आणि तेथून पळणें न सुचतां वेड्याप्रमाणें स्थिति झाली इतक्यांत भला मोठा दांड पुरुष, तो तिचा पतीच असावा, हातांत सुरी घेऊन अंगावर धांवत येऊन ती मजवर उगारिली; परंतु न्यायी ईश्वरास निरपराध मारणें कसें रुचेल? त्याच्या दयेनें तिचा रोख चुकून ती कुडावर घपदिशीं बसली त्यासरसा तो भोपळ्यासारखा खालीं धाडकन् आपटला

आणि त्याच सुरीचें पातें त्याच्या जांघ्यास लागून खळखळां रक्त वाहूं लागलें. तितक्यांत आसपास पाहून मीं खिडकींतून खालीं उडी टाकून परसांमधून कांट्याकुट्यांतून नीट रस्त्यावर पडलों. त्यावेळीं "दिवाकर होता कोठें? तो नाहींसा झाला कसा?" हें कांहीं मला स्मरत नाहीं. बरें, रस्त्यावरून विचार करीत चाललों असतां तेथेंही, लोकांनीं पुच्छ सोडलें नाहीं. पुढें एका वेळांत आम्हां दोघांची गांठ पडल्यावर गांवाबाहेर केवळ चोराप्रमाणें पडून "पुरे ही यात्रा" ह्मणून गांवीं येण्यास निघालों. याप्रमाणें बाबा, आज आह्मांवर मोठेंच संकट ओढवलें होतें; परंतु ईशदयेनें तशांतूनही पार पडून आपणाजवळ सादर झालों ही त्याची केवढी कृपा!

हा दुःखदायक वृत्तांत ऐकून महिपतराव (दिवाकराचे वडील) आपल्या पुत्रासह भाऊरावांस विचारून स्वगृहीं आले. इकडे भाऊराव व त्यांच्या पुत्रांनीं भोजन आटोपल्यावर, ते आपल्यास्थळीं निजावयास गेले.

वाचकहो, कांहीं दिवस लोटल्यावर एके दिवशीं भाऊरावांच्या मनांत आपल्या मुलाचें लग्न करून आपल्यावरील तेवढें ओझें कमी करावें, असें आल्यावरून ते पुत्राकडे येऊन विवाहप्रकरणीं कांहीं बोलूं लागले. ते ह्मणाले:—

## आर्या

बाबा विवाह करुनी, बाळा, वाहें मनीं अशी चिंता ॥
होती पूर्वीं सांवी, तरि अजुनी आणितों तुला कांता ॥१॥

विदित असावें तूतें, कीं जन हें कार्य आपुलें करिती ॥
किति उत्साहानेकें, जरि वर तीं अज्ञ बालकें असती ॥२॥

इंगित याचें बघतां, नाहीं दुसरेंचि हें परी दिसतें ॥
ईशाज्ञा सोडाया, जग कैचें तें तरी इथे घडतें ॥३॥

दिनकर हें पित्याचें वाक्य ऐकून गोंधळांत पडला. त्यास अज्ञानी स्त्रिया दुर्गुणयुक्त असतात असें अनुभवास आलेलें असल्यामुळें, तशीच एकादी आपल्या गळ्यांत पडल्यास आपलें हित होणें तरएकीकडे राहून, आपल्या जन्माचें त्यामुळें मातेरें होऊन शिवाय जगांत छी थु होणार आणि तसें झालें ह्मणजे कांहीं भलतेंच करणें अगत्य पडावयाचें, वगैरे अनेक तर्क त्याच्यापुढें येऊन उभे राहिले. पुन त्यास असें वाटलें कीं, वडील जी वधू आपणास पाहतील तिजशीं आपण लग्न ल्याविलें तरच त्यांत त्यांस गोड वाटणार, नाहींपेक्षां आपण इच्छाप्रमाणें वागून त्यांचे मर्जीत नाहीं, असें त्यांस वाटून तिकडूनही चांगलें नव्हे. याकरितां अजच त्यांच्या विचारण्याचा निकाल न करतां तो लांबणीवर टाकावा हीच युक्ति बरी. असें समजून तो येत उघड करणार, तों दुसरा विचार येऊन ह्मणाला "बाबा, उतावळीनें मला आजच रुकार देववत नाहीं; कारण उतावळीचें काम कसें राहून तें अपायकारक होतें, हें आपण जाणतच आहांच. असानें मूर्ख अशिक्षित स्त्रीशीं गांठ पडून पश्चात् तापांत पडणें ठीक नव्हे. त्यापेक्षां मूळारंभीं सावध राहून अविवाहित स्थितीत आयुष्य कठणें पत्करलें. आतां माझ्या सुखदुःखाची व सा या जन्माची निव्वळ भागीदारीण करीन कीं जी मला शहाणी, तुर, सौम्यादिक गुणांनीं भरित अशी दिसेल. पण नको तुवा विलक्षण स्त्रीचा प्रसंग! आपणास माझी ही उक्ति न रुचावीशी वाटेल; परंतु विचार करा ह्मणजे कळेल कीं, मी जें ह्मणालों यांत किंचित नव्यांश आहे. समजूं नका कीं, आपली मी अवज्ञा करितों आपल्या हुकुमांत मी नाहीं व मोठा आलों लागून आपणास तुच्छ असें समजतों. पण तसें आचरण मजकडून होणें नाहीं. मी आपल्या पायांचा सदोदित किंकर असेन "

मुलाच्या वरील प्रगल्भ विचार व त्याचें शेवटचें ... ... ... भाऊसाहेब स्त्रीकडे येऊन ह्मणतात व दिनकराचें मन तोरा सांगितले आणि आपण पाटावर उदास वृत्तीत

वतलें. मुलाचा तो अभिप्राय ऐकून त्याच्या मनोवृत्तींत इतका ज-बरदस्त फेरफार होण्याचें मुख्य कारण तें कोणतें? हें तीस कळेना. त्यामुळें तिचें हृदय व्याकुल होऊन ती कपाळास हात टेकून स्तब्ध बसली. मनांत नाना विचार घोळूं लागले. तीस वाटलें कीं, बाळाचें सांगणें वरकांतीचें असावें; कारण बाळच आहे तो, त्यास हें सां-गवेल तरी कसें! लज्जा नाहीं का वाटावयाची. असे परोपरीचे तरंग मनांत येऊन गेल्यावर ती ह्मणाली " बाळाचें तिडें भापण कांहीं बाई कळत नाहीं. या वेळेस भाऊराव हेही तिजसारख्याच वि-चाराब्धींत गढलेले असल्यामुळें त्यांस तें तिचें भापण ऐकूं आलें नाहीं. याप्रमाणें तीं विचारडोहांत बुचकळ्या खात असल्यामुळें अन्योद्योगाची विस्मृति पडून कैफ घेतलेला मनुष्य जसा आपल्याच गुंगींत गुंग होऊन बसतो, तद्वत् ह्यांची अवस्था होऊन तीं अधि-काधिक विचारसागरांत मग्न होत चाललीं. अशा स्थितींत भाऊ-राव व त्यांची स्त्री कावेरीबाई हीं असतां " कांहीं कारणाकरितां महिपतराव आपणास बाहेर बलावीत आहेत " असें विठ्या चाक-रानें, भाऊरावाजवळ येऊन, मोठ्यानें ऐकूं जाण्या सारखें सांगितलें. विठूचे शब्द कर्णरंध्रीं शिरतांच तीं चपापून सभोंवार कोण आला होता ह्मणून पाहूं लागलीं. आपला विठूच वहुतांशीं आला असा-वा. असें ताडून बाहेर येऊन भाऊरावानें " कायरे विठू? कोण आले आहेत रे? " असें विचारिलें विठूनें " राव साहेब " ह्मणून " महिपतराव भेटीची अपेक्षा करीत आहेत " असें नम्रपणें विदित केलें. दादा आले आहेत हें कळतांच त्यांनीं, चूळ भरून लग-बगीनें ओटीवर येऊन, त्यांचा हात धरून खोलींत नेलें. तेथें लोडा-शीं बसण्यास सांगून आपणही मांडी घालून जवळच टेंकून बस-ले नंतर देण्याघेण्याविषयींचें थोडें बोलणें चालणें झाल्यावर पु-त्राच्या विवाहसंबंधी विषय ओघास आल्यामुळें भाऊरावानें आपल्या मनांतील सर्व कांहीं त्यांस सांगून " यास आतां कोणती युक्ति यो-जावी? " असा हळूच प्रश्न केला ' यास उपाय तर दिसत

महिन्यास आपल्या थोरल्या मुलीचें लग्न करणार आहे, तिकडे पैशाचा व्यय झाल्यास पुनः वर्षभर रखडण्यास लागावयाचें. तेव्हां कसें काय? इतरास पाठविण्याबद्दल तुलाच पाठवावें असें मला वाटतें. त्यांतून तुला धंदा रोजगार असता तर मात्र निराळी गोष्ट होती. तुला काय? नाना देश पाहण्यास मिळाले ह्मणजे झालें ना! बरें, यांत तुझा तोटाही नाहीं. तात्यास पाठवावें, तर घरांत स्वयंपाकाची काय गत होणार? तिच्यानें घरांतलें काम का पाहवणार आहे? कोठचें? दुसरा आचारी ठेवला तर तिकडूनही एक संकट. बरें, महिनाभर त्रास काढला आणि त्याचीच रवानगी केली, परंतु त्याचा तरी विश्वास आहे कोणाला? गड्या कांखेस मारून पोबारा नाहीं कशावरून करणार? मागें नायको ना पोर. ह्मणेल ईश्वर प्रसन्न झाला आतां मारूं या याजवर हात. बाबा, विना खात्रीशिवाय कोणावर विश्वासणें कांहीं कामाचें नाहीं. कसें काय? मी सांगतों त्या पत्त्यावर जाऊन व्याज मुद्दलासुद्धां रुपये घेऊन येशील? तयार असल्यास तर बोल लवकर. कसचा दिवस नी काय आजच पाठवितों, सांग जल्दी. तिला फराळाचें लहानसें गांठोळें करण्यास सांगून विठूस चिरगुट पांघरुणाचें लहानसें बोचकें बांधण्याची आज्ञा केली पाहिजे."

या विचारास दिनकराकडून "ठीक आहे, मी जाण्यास सिद्ध आहे" हीं अक्षरें मिळतांच सांगितल्याप्रमाणें सर्व व्यवस्था लावून भाऊराव महिपतरावाकडेस आले. त्यांच्या भाषणावरून आपल्या मित्र आपणास सोडून एकटाच सफर करण्यास चालला आहे, हें कळतांच दिवाकरानें पित्याची आज्ञा घेऊन वाटेंत अवश्य असे कांहीं लाडू बांधून देण्यास सांगितलें. नंतर घरांतील आबालवृद्धांस भेटून बाहेर पडत आहे तों त्याच्या मामानें "आजचा हा दिवस मंगळवारचा असून तो सातवा आला आहे तेव्हां हा दिन कोठें बाहेर गांवीं जाण्यास अनुकूळ नाहीं नाश-

कारक आहे. याकरितां उद्यां सूर्योदयाचे पूर्वी दोन घटिकेस देशाटनास जाणें हितावह असून मनांतील हेतु फलद्रूप होण्याचा बराच संभव आहे" असें सुचविलें. मामाचें तें सांगणें ऐकून त्याला नवल वाटलें. खगोलशास्त्रांत बुध, मंगळादिक हे भूगोलवत् गोल असून ते निर्जीव पदार्थ होत, असें महान् शोधकांनीं स्वानुभवांतीं ठरविलें असतां व आपल्या ज्योतिषशास्त्रकारांचाही, ते ग्रहगोल मनुष्यमात्रांस गांठून व त्यास नाना पीडा करून द्रव्य किंवा उदरशांत्यर्थ मिष्टान्न भोजनाची याचना करितात, असा लेख आढळत नसतां हें फलज्योतिष यांनीं कोणा पोटभरू ज्योतिष्याजवळून संपादून त्याजवर यांचा विश्वास असल्याकारणानेंच, याप्रसंगीं असें सांगितलें यांत संदेह नाहीं, व यास सत्य समजून आजचा बेत तहकूब करणें मला तर अयोग्य दिसत आहे, व भाऊरावांसही दिसेल यांत आश्चर्य नाहीं." असा स्वतःशींच थोडा विचार करून, व मामाचें बोलणें न ऐकल्यासारखें दाखवून तो मित्राकडेस गडबडीनें येऊन दाखल झाला. त्यास पाहून दिनकरास आनंद होऊन ह्मणाला "मित्रा, कधींही जन्मांत आपली तुटातुट पडली नव्हती ती आज होणार होती! असो; पण हें तुला कळलें ह्मणून बरें झालें. गड्या, वस्त्रप्रावरणांचें गांठोडें घेतलें नाहीं तें? (गालांत हसून) लाडवाचें मात्र घेतलें आहेस."

**दिवाकर.**— (हसून) वहावा ठीक! अरे! तें तर अगोदर पाहिजे. त्याशिवाय फार तर काय एक घटका जावयाची नाहीं हें तुला कोठें माहित आहे? वाटेंत फार वस्त्रें घेऊन त्याचें ओझें वाळगतो कोण?

**दिनकर.**— बरें; पण तुला थंडी वारा सहन होईलना? नाहींतर बसशील आपला कुंथत आणि ह्मणशील कीं, नाहीं आतां येत, माझ्यानें चालवत नाहीं, असें नाहींना होणार?

**दिवाकर.**— व, काय कल्पना शोधून काढली! जरी मी पडशाखोकल्यानें बेजार झालों तरी मला पूर्ण विश्वास आहे कीं,

माझा मित्र मला तशा स्थितींत टाकून पुढें एक पाऊलही जावयाचा नाहीं. कार्य साधत आहे तोंपर्यंत तें साधून नंतर तेथून गवाळें आटोपून पोबारा करणें हें कुमित्राचें लक्षण होय. मित्रानें मित्रास प्रसंगविशेषीं साहाय्य करणें हें त्याचें कर्तव्य खरें; परंतु केव्हां केव्हां असा कांहीं विलक्षण प्रकार दिसून येतो कीं, त्याजपाशीं त्यावेळीं एकादी वस्तु नसतां, किंवा ती देण्यास तो असमर्थ असतां, त्याच्या मित्राचा त्यास ती देवविण्याचा आग्रह पडून परिणाम अनहितकारक होतो. आणि हें खऱ्या मैत्रीचें चिन्हही नव्हे. आठ दिवसांपूर्वीं असाच प्रकार येथें होऊन शेवट कसा काय झाला हें तुला प्रत्यक्ष व त्या वर्तमानदीपिकेवरून माहित असेलच. काय त्या विष्णुपंताचा गंडा घालण्याचा बाणा तरी! एक अर्थीं तेंही ठीक झालें! अरे किती ह्मणून बेश्याला लावण्याचा छंद! कोणतीही लावणी कां असेना ती मुखोद्गत आहेच! आणि तमासगीर ह्मटले कीं, जीव कीं प्राण! एकदां मुंबईस त्या सख्याची स्वारी गेली होती, तेव्हां तेथें त्यानें काय मौज करून सोडली ह्मणून सांग! दौलतजादा करकरून पैसे सरले पाहून गड्यानें, आपल्या होयीचें, शेवटीं पैठणी पागोटेंही उडविलें! यावरून किती शोकी तो पहा! आणि कसा वेडा पीर तो! तमाशेप्रिय जनांचें हेंच कपाळ! अरे मुंबई मुक्कामीं फाल्गून मासांत या तमासगीरांची अशी कांहीं रेलचेल उडून जाते कीं, तें सांगतां पुरवत नाहीं. माझ्या मनांत फार दिवस आहे कीं, एकदां नामांकित मुंबईशहर पहावें. असो; केव्हां तरी तो दिवस येईल आणि त्यावेळेस हे खेळ सहज आपल्या दृष्टीस पडणारच आहेत.

अशाप्रकारें, पूर्ण तयार होऊन ते वाचत बसले असतां, अर्धएक तासानें भाऊराव येऊन त्यांनीं त्यांची रवानगी केली. कित्येक दिवसानें ते खुष्कीनें सुरक्षितपणें जयगडास येऊन पोहोंचले. तेथें लखमीचंद व्यापाऱ्याची भेट घेऊन सांगितल्याप्रमाणें पावती देऊन व्याज मुद्दलासह रुपये घेतल्यावर त्यांना आठवे दिवशीं वि-

जयदुर्गाचा मार्ग धरिला. त्या गांवीं दोन दिवस धर्मशाळेंत वस्ती करून रत्नागिरीहून शिवरात्रीचे दिवशीं उत्तरेस अंजनवेलीपासून पंचवीस कोसांवर वसलेल्या जासवनेर नामें सुंदर बंदर किनाऱ्यावरील टुमदार गांवीं वाचकहो, आपले मित्र दिनकर आणि दिवाकर ये- ऊन ठेपले.

---

## प्रकरण दुसरें.

शिशिरर्तुमधील माघ महिन्यांतील महाशिवरात्रीचा दिवस उद्यां आहे, तो आज, घरोघरीं बहुतेकांची धांदल उडून कांहीं फळें कंदमुळें विकत घेण्याच्या गडबडांत असतात; कित्येकांचा उद्यां उपवास करावा किंवा सोजीवरच रहावें ह्मणून विचार चालला असतो; कित्येक निराहार उपवास करायाचाच, असा निर्धार करून कामकाजास जातात. कारखाने, तशाच कांहीं सावकारी व सरकारी कचेऱ्यांतल्या लोकांस, या दिवसाप्रीत्यर्थ रजा मिळून, थंड सुगंध वायु सुटून त्यायोगें प्रमोदित होऊन, ईश्वर गुण आठविण्यास, चोवीस तासांमधील प्रथम तास ह्मणजे प्रातःकाळ, व द्वादश मास सहन नवें वर्ष लागून संवत्सर बदलविणारा प्रथम दिन—प्रतिपदा—जशी श्रेष्ठ तसाच, या ऋतूंतील थंड हवेच्या स्वरूपांत व दिनमानांत फेर बदल होऊं लागणारा; हा आरंभदिवस श्रेष्ठ; एतदर्थ त्या शिव—(सदा मंगल—पवित्र जो तो)—स्मरणोपवाससूचक दिनानें, कांहीं

संतुष्ट होऊन व कांहीं फलाहार घेऊन संध्याकाळच्या समयीं आनंदानें घरीं येत असतात. त्यांत चमत्कार हाच कीं, अस्त आणि उदय हे नियमितवेळीं यथानुक्रमें एकसारखे होत असतांही, गोरगरीब व विशेषें चौर्यकर्मांत रत, उचले, भामटे, खिसेकातरू, यांस तर उजाडतें केव्हां आणि आपलीं कार्यें तडीस जातात केव्हां याचा निदिध्यास लागून ते तळमळ करीत असतात.

साक्या

शिशिर ऋतूमधिं शीतळ वायू, भासे जरि तो गार ॥
भिता न कांहीं जन हे अंगीं, घेती उदका फार ॥१॥

शिवदिन जाणुनि जाती उदधिस्नानातें करण्याला ॥
अटोपतां तें प्रेक्षक बघती, तिष्ठत तार्यें करणीला ॥२॥

दिनीं अशाया ग्राम विलसतो, शहरच कीं जणुं काय ॥
एकजनातें देतें स्मरणा, ईशा हें परि काय ॥३॥

नंतर प्रभातकाळ झाला कीं, गांव दणाणून गेलेला दिसतो. मनुष्यांची झुंडचीझुंड समुद्रकिनारीं, नदीतीरीं, तळ्यांच्या काठीं वगैरे ठिकाणीं स्नानार्थ जात असते. प्रातःकाळ असल्यामुळें थंडगार वायु वहात असतो. तशांत हे थंडीचे दिवस. मग काय ! तो (वायु) अधिक बळावून मनुष्याजवळ वैर साधण्यासाठीं अंगाला जणुं झोंबतो असें वाटतें. त्यासही ते न जुमानितां व दुखण्याबाण्याची काळजी न वाहतां, कुडकुडत स्नानें करीत असतात; कित्येक स्नान करून थंडी निवारणार्थ अंगावर वस्त्रें घेऊन तेथील बुड्या मारणारांची मजा पहात उभे राहतात. देवळांतून " शंभो हर हर " या शब्दांचा वारंवार गजर होत असतो. एकीकडे पुराणिकांचीं पुराणें सुटलेलीं असतात. नगाऱ्याचे कानठाळीं बसत असे. धों धों ध्वनि ऐकूं येतात आणि त्यांनच तेथील भटजीबावांची पूजा सांगण्याची लट-

पट उडून एकादें गिन्हाईक आपले हातून दुसऱ्याचें हातीं गेलें असतां तडफडत ते इकडे तिकडे पळत असतात. प्रत्येक देवळांत असा थाट असून सांबपिंडीस कोणी सहस्र, कोणी दशसहस्र, कोणी दहा पांच अशीं बिल्वें वाहण्याची गर्दीच गर्दी उडून लालो-ल्या वाहण्याची गडबड, व स्त्रीपुरुषांचा कलकलाट, या योगानें शहरील एकादें देवालय चालतच आहे कीं काय? असा भास होऊन तो हा आश्चर्यभरित खेळ अवलोकन करीत असतां मनीं विस्मय पावून त्या दिवसाची त्यास मोठी मजा वाटते. मधून मधून भिकाऱ्यांच्या "दे दाता रे" याचा अपभ्रंश "धी धाय तारे" या शब्दांनीं कान किटून बधिर होऊं पहातात. भक्तांची शिवदर्शनास येण्याची व नमस्कार करून परत जाण्याची मनोहर लगबग संध्याकाळ होई तों दृष्टिगोचर होत असते. इकडे गांवांत कोणी तो दिवस सुंठसाखरेवरच घालवितात. कोणी जठरशांत्यर्थ साबूदाण्याची पेज पिऊन स्वच्छसा खजूर किंवा कांहीं आवडता पदार्थ घेऊन तो खाऊन असतात; आणि बहुतेक तर फळफळावळ विकणारांस क्षणोक्षणीं बोलावून ती यथेच्छ भक्षण करून उदरशांति करितात. लहान लहान मुलें देखील, त्या दिवशीं न जेवतां मोठ्यां-बरोबर खाण्याच्या आशेनें, उपवाशी अशीं तळमळतात. त्यांची तर या दिवशीं विलक्षण धांदल उडते. कोणीही खाण्याचे पदार्थ विकणारा त्यांचे दृष्टीस पडला कीं, त्या पदार्थाच्या नांवानें त्यास हांक मारून आईबापांजवळून रडून ओरडून पैसा काढून तो जिन्नस नाचत उडत घेऊन संपल्यावर पुनः कोणा एकाद्यास बलावून पुनः कांहीं घ्यावें आणि पूर्ववत् गट्ट करावें असा क्रम सुरू राहुन अर्धा मूर्धा दिवस किंवा मध्यान्ह टळल्यावर "ऊं ऊं, भूक लागली भात दे" असा हट्ट घेऊन कित्येक रडतात, ओरडतात ही ह्या दिवसाची विशेष मौज होय.

साधु, संत, वैरागी लोकांची या शिवदिनीं तर चंगळी उडून बहुतांशीं भांगेवर भांग तयार करून ती लोट्यांत घेऊन झोकण्याचा

एकसारखा सपाटा सुरू असतो; एकीकडे गांजाचा धूरही निघत असतो, "शंभोनाथ गिरजापते" अशीं अक्षरें ही निघत असतात. असा एकच दणदणाट रत्नागिरी जिल्ह्यांतील एका तालुक्यांतील गांवानजीक वरील प्रकरणांत सांगितलेल्या जासवनेर गांवीं उडाला होता.

हें गांव साधारण विस्तीर्ण असून तें मोठें भरभराटीस आलेलें होतें व तें सह्याद्रि पर्वताच्या किंचित् पायथ्याशीं वसलेलें असल्यामुळें तेथील अद्वितीय शोभा पाहून मानवी प्राण्याचें अंतःकरण सुप्रसन्न होऊन मधुप जसा निरज तल्लीन होतो तद्वत् तो होत असे.

वरील गांवीं शिवरामपंत नामें कोणी श्रीमंत, शहाणे; व सुशील गृहस्थ रहात असत. त्यांचें मूळगांव संगमेश्वर. तें सोडण्याचें कारण, प्रकृतीस अस्वास्थ्य झाल्यामुळें वैद्यांच्या सांगण्यावरून आपली सर्व तेथील मालमत्ता सवडीनें विकून टाकून सदर्हु ठिकाणीं येऊन राहिले होते. हवा पालटल्यानें मनास हुशारी येऊन व प्रकृति सशक्त होऊन ते पूर्ववत् दिसूं लागले होते. त्यांचें वय अजमासें चाळीस वर्षांचें असून बांध्यानें सडपातळ व वर्णानें काळसांवळे असे होते. चेहेरा आनंदी असून मुख भव्य दिसे. वित्तादिकांनीं संपन्न असतां, ते फारच साधा पोषाख करीत. कित्येक श्रीमंत गृहस्थांसारखे ते आपल्याच झोकांत डुलत नसत. ते इहलोकींचें कर्तव्याकर्तव्य पूर्णपणें जाणत असून त्याप्रमाणें त्यांचेकडून आचरणही होत असे. त्यांस आल्यागेल्या जवळ मननोकळें करून दोन मऊ गोष्टी करणें फार आवडत असे. या स्वभावामुळें व विद्वत्तेच्या योगानें ते त्या गांवांत लोकप्रिय होऊन त्यांनीं थोड्याच दिवसांत तेथील मामलेदाराचा हुद्दा मिळविला. त्यांच्या स्त्रीचें नांव पार्वतीबाई असें होतें. ती सद्गुणी नायका असून तिचें चित्त संसारिक असे. दोनप्रहरीं घरांतील पुरुष मंडळी आपापल्या उद्योगास गेल्यावर स्त्रियांची, एकत्र जमून विशेष करून दागदागीन्यांच्याच संबंधाच्या गोष्टी निघण्याच्या रीति, काळ

व्यर्थ दवडण्या सारख्या वाटून, थोडें बहुत लिहिणें वाचणें संपादित असल्यामुळें ती तितकावेळ ज्ञानप्राप्तीचे ग्रंथावलोकनांत व त्यांतील सार ध्यानांत धरण्यांत घालवीत असे. तिची बुद्धि तीव्र असल्यामुळें कोणत्याहि ग्रंथांतील वर्म व त्यांतील संभवनीय कथेचें मान बारीक दृष्टीनें शोधून काढून सत्यासत्याचा निर्णय करण्यास तीस केवळ अडचण पडत नसे. तसाच पैशाचा व्यय व्यर्थ न करतां गृहांत भांडींकुंडीं वगैरे उपयुक्त पदार्थसंग्रह करण्याकडे करी. तिला गायी, म्हशी, वांसरें, यांचीहि आवड असल्या मुळें त्यांजवर लोभ ठेवून त्यांच्या जिवांस व खाण्यापिण्यास फार जपत असे. त्यामुळें दूधदुभतें रगड असून घरांत, परसामुळें भाजीपाला फळफळावळ, विपुळ पडलेली असे. उरलें सुरलेलें गोंवरावर न टाकितां तें भिकाऱ्यास किंवा गरीब शेजाऱ्यांस देऊन संतुष्ट करणें तिला मनापासून आवडे. अशी गृहस्थिति असल्या कारणानें शिवरामपंताचे पैसे फारसे बाजारांत जात नसून काय ते फक्त गड्यामाणसांस जात असत. पार्वतीबाईस सोमवारादि दिवस करण्याचें खूळ अगोदर फार असून तें अनेक ग्रंथविलोकनानें नाहींसें झाल्यामुळें द्रव्यप्रवाह प्रतिबंधित होऊन वित्त सांठवास पडूं लागलें पाहून आपल्या स्त्रीस शहाणी समजून नेहेमीं शिवरामपंत तीस आनंदित ठेवीत. ज्ञान आणि द्रव्य, यांचा साठा साहजिक होऊन त्या जगत्पित्याकडे अलक्ष व्हावें तें न होतां ईश्वरस्मरण, भजन, मनन व दास्य हेंच मनुष्य सार्थक करून देणारें होय असें ते जाणत असत; यांत दिवसाच्या चार घटिका घालवून बाकीच्या इतर धंद्यास लावीत. त्यांचे कोठेंही बाहेर जाणें होत असलें कीं ते पूर्वी "जय सच्चिदानंद" हीं सप्ताक्षरें स्मरून नंतर वाड्या बाहेर पडत.

त्यांस विशेष संतति नसुन म्हणण्यास ईश्वरदयेनें कन्यारत्न झालें होतें. लहानपणीं शाळेंत घालून तिजकडून मराठी अभ्यास बराच करविला होता. तिला तोंडचे हिशेब मोडी व बाळबोध लिहिणें वाचणें, शिवणकाम, पाकशास्त्र ह्यांचे व विशेषें करून शेवटल्या ती-

न विषयांचें बरेंच ज्ञान असून उत्तम अशी जी आपली मूळभाषा संस्कृत इचेंही शास्त्र्यांकरवीं थोडें शिक्षण देवविलें होतें. तिचें नांव कृशोदरी होतें. ती सौंदर्यानें देखणी असल्यामुळें, कोणी कोणी तीस "सुंदरी" अशी हाक मारीत. पण पहिलें नांव आबालवृद्धांस विदित असल्यामुळें बहुतेक घरांतील व बाहेरील मनुष्यें तिला त्या नांवानेंच बलावीत. ती, शिवरामपंतानें हौशीनें तिजकरितांच बांधवून दिलेल्या सुंदर हवाशीर वाड्यांत रहात असे. तिच्या सेवेंत गडीमाणसें बरींच असून स्वयंपाकही तेथेंच होत असे. तेथून शंभर एक पावलांवर तिच्या पित्यानें आपणासाठीं रमणीय बगीचा करविला होता. त्याच्या ईशान्येस त्यांचा वाडा होता. तो ह्मणण्यासारखा शोभिवंत नव्हता; तरी त्याच्या मजबुतीकडे फारच लक्ष पुरविलें होतें. कृशोदरीस पोथ्या पुराणें वाचण्याची हौस असल्यामुळें त्यांतील वर्णिलेल्या दैवतांची तिला अति आवड असे, आणि येथेंच काय तो तिचा स्वभाव तिच्या मातापित्याहून किंचित् भिन्न पडे. बाकी तिच्या उत्तम स्वभावानें व एकुलती एक असल्यानें मातापितरांना तिजवर जीव कीं प्राण असून ती जरी प्रिय असे, तथापि तिला स्वच्छंदपणें हिंडण्या फिरण्याची मोठी मनाई होती त्यामुळें वाड्याबाहेर पडणें तिजकडून क्वचितच होत होतें, व हा प्रतिबंध तिच्या मनाला केव्हां केव्हां उद्विग्नता आणवून तिच्या घोर चिंतेंत बसवीत असे. असो

वरील शिवरात्रीचा उपवास हिनें आज केलेला असल्यामुळें तिच्या मनांत आपण देवदर्शनास जावें असें आलें. तितक्यांत मातापितरांच्या शब्दांची आठवण होतांच खिन्न होऊन डोळ्यांत थोडें पाणी आलें. तें पदरानें पुसून खिडकीजवळ आली. तेथें कांहीं वेळ विचारांत असतां अश्रुपात करण्यास लागून आपणाशींच ह्मणू लागली "अहाहा! किती मी हतभागी! पहा जन आनंदवृत्तीनें हिंडत फिरत आहेत, कोणी देवदर्शन घेत आहे, कोणी पायांच पडत आहे आणि मी पहा ह्या वाड्यामध्यें कैदेंत असल्यासारिखी दिवस कंठि-

तें! कुठे ही जाण्याची मला आज्ञा नाहीं! व्यर्थ माझें जन्म! देवा-नें पुष्कळ सुंदर मला अशाचकरितां केलीना? देवा ! काय माझें भाग्य हें!! किती निंद्य मी तुला आळवूं!

## दिंडी

किती परमेशा, सतत तुला ध्यावें ॥
किती निर्मल तव, यशोमृता गावें ॥
पहा पंडितही, श्रमति विभो! गातां ॥
अल्प मममतिही, काय करिल आतां ॥ १ ॥

कोणतें दुष्कृत्य मी केलें कीं, ज्या योगें हे भगवंता!! माझ्या-कपाळीं असें विपरित भोगणें यावें! मेलें! किती दिवस अशा बंदींत कंठूं! देवा मन तडतडां तुटतें; पण काय करूं, उपाय नाहीं येथें चालत. कुठे बाहेर जाणें तर जन्मांत होत नाहीं, मग काय हें सुख घेऊन रडावयाचें! देतें उडी आणि सुटतें दुखांतून!! दयानिधे! सुंदरत्व नसतें तरी तुजवर इतकी रुसतीना; पण स्वातंत्र्य कीं रे ठे-वायाचें होतेंस! काय मी बोलूं!! चुलते किती वेडे! शहाणेसुरते आईबाप, त्यांनीं तरी दूरवर दृष्टि चावयाची होती! काय काय ह्मणून त्यांच्या मनामध्यें नाना कुतर्क येतात! जनाचें ऐकून आई ह्मणते 'मुळीं घराबाहेर पाय मुलींनीं टाकूं नये; कारण अशानें त्या बिघडू-न जावयाच्या, व एकदां ती सवय जडली, ह्मणजे त्यापुढें काय खेळ-कराळीच याचा सुमार नाहीं.' देवा! किती ही तिची वेडी समजूत. आणि बाबांचेंही मत असेंच! बरोबर, ते रुकार न देऊन सांग-तील कोणाला? समजलें माझें कपाळ! दैवांत सुख भोगणें नाहीं येतें खरें! मेलें दैव तरी येथें काय करितें! मुळीं सौंदर्यच मला बां-चीत आहे, त्यांत कोणाचा अपराध! धिक् माझें जिणें!! आईच्या पोटीं आलेंच नसतें किंवा बाळपणींच मृत्युपंथ साधला असता तरी एक अर्थी बरें होतें! आतां नाहीं जिवंत राहून उपयोग! गावांत म-

नुष्यें कां थोडीं मरताहेत, त्यांत मी एक मेलें ह्मणून थोडेंच जग मजसाठीं अडणार. सुटेन बापडी या दुःखांतून! किती असहनीय दुःखें या आत्म्यानें सोशीत असावें तरी! ईश्वरी लीला अगम्य अ काहीं अबला सौंदर्यभावामुळें त्यास दूषण लावीत असतील, क मजसारख्या त्यास दोष देत असतील. तेव्हां त्यानें कोणाचें ह्मणून गाऱ्हाणें ऐकावें! मजकडे त्यानें कृपादृष्टीनें पाहवें किंवा दुसरीकडे वळवें? ईश्वरा, तुझ्या अगाध शक्तीचा कोणास अंत लागणार? घटकेंत तूं राईचा डोंगर व डोंगराची राई बनविशील. त्या तुला माझे इच्छित तडीस नेण्यास काय वेळ? ह्या अनाथानें तुला न विनवावें तर यानें कोणाच्या मुखाकडे पाहवें बरें! देवा तूं कृपेचा पूर्ण सागर आहेस हें मी जाणतें"

असे नाना विचार ती करीत असतां तिची आवडती सखी रमा तेथें आली. ती, ही काय गुणगुणत आहे हें ऐकावेंसें वाटल्यावरून हळूच दाराच्या आड जाऊन निमुट उभी राहिली, आणि डोकावून कान देऊन ऐकूं लागली. परंतु तिजवर कृशोदरीची एकाएकी दृष्टि गेल्यामुळें लडीवाळपणें धांवत येऊन तिला तिच्या जवळ झटकन् येऊन बसणें जरूर पडलें. कांहीं थोडावेळ गेल्यावर कृशोदरीच्या पुनश्च मनांत विचार येऊन मान खालीं करून डोळ्यास टिपें आणिलीं, आणि मोठ्यानें उश्वास टाकून ह्मणाली "खचीत ग, या सौंदर्यानेंच ही स्थिति प्राप्त करवली आहे! देवा! देहान्त होई तों असेंच भोगावें नाहींना लागणार? पुढील कुणीं सांगावें! कपाळीं अजून तर दुःखच आहे! इतकें सुख माझ्या आईबापांच्या घरीं अनुभविलें, मग पतीचेघरीं किती अनुभवीन समजलेंच. एका शितावरून सर्व भाताची परीक्षा. डोहाळ्यावरून सोहाळे समजतात. माझें पूर्व संचीतच अपूर्ते त्यांत कोण काय करणार! असो प्रभु समर्थ आहे तो काय करील तें खरें"

हे दुःखोद्गार ऐकून सखीचें तोंड उतरून गेलें. "ह्या ह्मणत आहेत तें सर्वांशीं खरेंच आहे. यांनीं येथें सुख भोगूं नये तर कोणें

चुलीत? करावें काय एकदां पतिगृहीं ह्या गेल्या कीं, सासूसास-ऱ्यांच्या जाचानें नको नकोसा बाई जीव होऊन जावयाचा ! मेला सासरा टोणगा असला, तरी सासूबाई बरी असली पाहिजेना? नाहीं तर, सारादिवस त्यांच्या नांवानें धोंडे फोडावे, हेंच सुख. दुसरें नाहीं-च. सून ह्मणेल कीं 'काम करणार नाहीं." तर तें न करून सांगते कोणाला? फुकत दोन घांस खाऊन मरे मरे तों खपलेंच पाहिजे. दुसरा उपाय नाहीं. बरें, ते शहाणे असून हाताखालीं चार माणसें-ही असलीं ह्मणून थोडें झाडलोट पाणी नको का पाहायला? स्वस्थ कोण बसू देणार? आणखी ह्मातारचणीं बसल्या बसल्या त्यांना उद्योग हवा-आहेना? तर हा-'अग घरांतलि गोडें पाणी संपलें तें के-व्हांसें आणावयास तरी सांग. कळशीभर तूं ही आणलेंस ह्मणून काय झालें? श्रीमंतांच्या बायका घरांतील बारीक सारीक कामें नस-तात का पहात? तुजसारख्या आळशी का त्या असतात. काय ह्मणून तुला सांगू? सांगून आह्मींच थकतों. पण तुला कोठें आहे अक्कल! एवढ्या वयांत तुह्मांस उठण्या बसण्यास इतकें जड वाटतें मग पुढें उजेडच कराल. आज आह्मांस शक्ति नाहीं हात कांपतात, पाय थरारतात. तरी अझून उगीच बसवत नाहीं. कांहीं तरी करीत अ-सतों पहातेसना?' आणि तुह्मी तरण्या ताठ्या, तुह्मांलाग काय झालें?' त्यांना काय? त्यांचें थोडेंच तोंड दुखतें. पण उंदरांचा जीव जातो हें मांजरांस कोठून समजणार? असे बाई हे मुलींचे प्रकार. मुलां-ची सर्वत्रांस आशा ती या भीतिमुळेंचहो. खरेंच, मुलींचा त्रास मोठा आहे, पण ईश्वरानें त्याच दिल्यास करावयाचें काय? त्यांचें पोषण करून मग हित साधून देणें भागच आहे.'' वगैरे विचार मनांत येऊन गेल्यावर रमी ह्मणाली 'कर्मानुसार फळ मिळावयाचें'' असे मला तर बाई माझ्या समजूतीनें वाटतें. आपण काहीं ह्मणा, दादानें (तिच्या काकाचें) थोडें वेडें मन खरें. त्यांचें बाबा व आ-ईसाहेबांनीं तरी कसें ऐकावें? त्या मागील, वेणूच्या खटल्याची आठ-वण झाल्यामुळेंच दादानें त्यांचें कान फुंकले असावेसें वाटतें दुसरें

कांहीं नाहीं. दादास अजाणते समजावें तर तसें हीं नाहीं. चांगले चारचौघांत उठणारे बसणारे असून विद्वान् आहेत. मोठ्या पुढें काय बरें मी करूं? एकदां दोनदां त्यांनां मी सांगून पाहिलें; पण कांऱ्या आईसाहेब आमचें ऐकतील? श्वानाच्या भुंकण्यास कोण बाई कान देतो? आतां बाबा साहेब शहाणे, चतुर, सत्यमार्गी असून त्यांस थोड्याशा कारणाकरितां वेडे ह्मणून आपणास वाईट वाटूं द्यावें, त्यापेक्षां चुप्प बसावें तें उत्तम कीं नाहीं? परंतु त्यांनीं दादास, विचारदृष्टीनें पाहतां, आपलें अनुरत अशास द्यावयाचें नव्हतें. मग कसें काय झालें असेल तें असो." "गे रमे काकास मूर्ख कोणीं ह्मणावें? त्यांच्या पोरी त्यांच्या वेणूसारख्याच कायग होतात? हें काय त्यांनां समजत-नाहीं ह्मणतेस? बरें, पण हें बाबास तरी कसें आवडलें? ईश्वर जाणें."

अशी कृशोदरी आपलें मानसिक दुःख आपल्या प्रियसखीस सांगत बसली असतां कोणी साधु पुरुष खालीं येऊन तो तीस भेटूं इच्छीत आहे, असें धोंडू चाकरानें वर येऊन कळविलें. साधूचें तिचे घरीं आगमन ऐकतांच तिनें तत्क्षणीं रमीस त्यास वर आणण्यास सांगून आपण तेथें गजामा टाकून बुवाची वाट पहात बसली. एवढ्यांत अंगानें सदृढ, हातीं कमंडलु, काखेंत झोळी, मस्तकीं भस्मलेपन, असे जटाधारीबुवा, वर येतांच त्यांनीं आपले दोन्ही हात वर करून "कल्याण होओ"असा आशीर्वाद दर्शवून नंतर आसनमांडी घालून 'क्यौंबेटा, कुच हमारा हेत पुरन होवेगा?' असें मोठ्या शब्दांनीं ह्मणाला. पुढें तिचे मुखांतून शब्द निघत नाहींत पाहून येथें अजब खेळ दाखविल्याविना आपली कार्यसिद्धि व्हावयाची नाहीं जाणून, त्यानें आपली भव्य जटा क्रोधयुक्त मुद्रा करून जमीनीवर सोडिली, आणि हात आपटून "देख, गंगामाईका तेरेकूं दर्शन देते है." असें, ह्मणून ती अस्ताव्यस्त जटा सांवरून क्षणभर नशीध धरतांच तींतून चरचरां पाणी आणिलें. तें त्यानें कांहीं शब्द गुणगुणून आपल्या सभोंवती शिंपलें. हा चमत्कार पाहून

कृशोदरी विस्मित होऊन हा कोणी महान् पुरुष आपलें सत्त्व पाहण्याकरितां आला आहे असें तीस वाटलें. तेव्हां यास कोणत्याही गोष्टीची उणीव पडूं देतां कामा नये ह्मणून तिनें त्याचे पायांवर डोकें ठेवून मंजूळ भाषणानें "स्वामीराज, काय मागणें आहे?" असें विचारिलें. ती तिची मधुर वाणी ऐकून बोवास आनंद होऊन प्रथम हसून नंतर ह्मणाले 'कौनशंभोका अगाध लीला जानेगा? उनकी करामत अजबहें. अछा! आज शंभुका दिन है, और महा शिवरात्र बी हैं ऐसे दिनोमें धन, दौलत, पैसा आडका तेरा कूच नहीं चाहिये, लेकीन मुझकू फलका भोजन और गुरुकूं वस्तर देवें सो ओ शंभू भोलानाथ परसन होकर आनंदमें नोत रख्येगा, (तोंडाकडे पाहून) बेटा, साधूकी इच्छा कुच सफल होवेगीं?"

अगोदर कृशोदरीचें मन असावें तशाप्रकारचें शिक्षित नसल्यामुळें थोडें भोळेभावांनीं व्याप्त असून, त्यांत त्यांनीं दर्शविलेला लहानसा अपूर्वप्रकार पाहून तीस हा कोणी सिद्ध असावा असें वाटलें होतें, ह्मणुन तिनें ती विनंती अमान्य न करतां तेथ्हांच पुढ्यांत फलाहाराचें ताट आणविलें. मग काय पहातां! बुवा खुश होऊन त्यांनीं यथेच्छ त्याजवर हात मारून जवळ ठेवलेलीं वस्त्रें झोळींत घातलीं, आणि ह्मणाले "कुच फिकीर नहीं करना. बेटा, तेरा कल्याण होगा जात्र. लेकिन आज शांभका दिन है, उस्वास्ते एकवक्त तुम उसके दर्शन लेकर और साधू, संत, गुसांई लोगोनकुं परसन करकर आवेगा सो तेरा कार्य शिवप्रसादसे बन जावेगा. यही हमारा आशीर्वचन है. बेटा अब हम चला जाता. बैठो.' असा आपला आभार दर्शवून बुवा सानंदमुद्रेनें निघून गेले 'गे रमें, माझ्या मनांत तर होतेंच, त्यांत बुवानें सांबदर्शन घेऊन ये सांगतांच मारें काळीज, हा देह प्रतिबंधित असल्यामुळें इतके तडाडूं लागलें कीं, त्यायोगें कंठही सद्गदित होऊन डोळ्यांस पाणीही आलें, तें तुला मी बोलून काय दासवूं! अगे आज सोमवार, सांबाचा दिवस आणखी शिवरात्र, अहाहा! किती आनंददायक दिन

हा! असा योग घडून आला तर कोठें दोन चार वर्षांनीं यावयाचा. इतकें असून उपोषणही केलें आहे. रमे, पोटांत ढवळून येतें, पण काय करूं! मनांत आहे मोठें. वाटतें तुवांच्या सांगण्याप्रमाणें देवदर्शन घ्यावें, दान, धर्म करावा आणि मग सहल करीत स्वस्थ-ळीं यावें; परंतु माझे आईबाप या कामीं अनुमोदन करो देतील? "कांहीं नको जावयास," ह्मणून दरडावयाचे तर नाहींतना? कशावरून नाहीं ह्मणावें? नेम नाहीं बाई एखादवेळीं नकोही जाऊं ह्मणतील. (थोडा वेळ स्तब्ध राहून) रमे, तूं यावेळेस माझे आईकडे जाऊन तिचें कसेंहीकरून मन वळवून एवढें काम करून येशील तर फार बरें होईल. अग विचारल्याशिवाय निमुट जाईन ह्मणतें; पण नाहीं मेला धीर होत. ह्मटलें असतां जाण्यास हरकत नाहीं. कारण ना वाड्यावर कुणाचा पहारा ना कुणी कुत्रा; पण 'बाहेर ज्ञात जाऊं नकोस हो' ही ताकीदच रक्त स्वारांचा पहारा मी समजतें. (विनोदानें) आतां धांवत जा गडे, नाहींतर पहा हो, बसशील जाऊन तूं आपल्या एकाद्या मैत्रीणीकडे, आणि सांगशील कीं, त्या (आईसाहेब) घरांतच नाहींत किंवा केव्हांची उभी राहिलें त्या उठतच नाहींत, झोपल्या आहेत. छेः अशी गप्प मारणारी तूं नव्हेस, अशी मला खात्री आहे. तूं कालत्रयीं मजपाशीं असत्य भाषण करणार नाहींस. हरएक कांहीं तुला सांगितलें, आणि तें तूं सिद्धीस नेलें नाहींस, असें कधींही झाल्याचें मला आठवत नाहीं. रमे, माझ्या मनांतील तुला माहित असेलच नव्हे! ईश्वरदयेनें तें पूर्ण झाल्यास त्या परमेश्वराची आभारी होऊन उपकार फेडण्यासाठीं किनई, नित्य त्याची सेवा करीत जाईन. गडे, मला असें कळलें आहे कीं, आई माझें यंदा लग्न करून देणार; सखे, तुलाच ह्मणून सांगते, ऐकलेंस का? तें ऐकून सांबास असा नवस केला कीं, हे देवा, तूं दीनांचा नाथ आहेस. ज्याला तूं प्रसन्न होशील त्यास सर्वस्वी देऊन त्याचें मनोगत क्षणांत पूर्ण करशील, आणि ज्यावर करडी नजर ठेवशील त्याची पळांत दैना उडवून मृत्युपंथास नेशी-

ल. हे भोलानाथ, हात जोडून तुझ्या चरणाजवळ या कन्येची ही विनंती आहे कीं, इचे मनायोग्य वर मिळूं दे, आणि आईचा लग्न संबंधी झालेला विचार ढळूं दे. मी तुला सहस्त्र बेल वाहून सर्व याचकांस संतुष्ट करीन, शिवाय पतिगृहीं गेल्यावर तुझ्या नांवानें सोमवार करीन. रमे, माझी तूं जीवलग मैत्रीण ह्मणून तुजजवळ हें बोललें; पण इतकें वरीक कर कीं, हें तिसऱ्यास कळूं देऊं नकोस. ( रमीची पाठ थोपटून ) आतां पाहतें आईकडे जाऊन कशी झट-दिशीं येतेस ती ! " आपण मला अशीच मळमळीत समजतां वाट-तें. आई साहेबांचें मन वेधून 'जात असेल तर जाऊं दे हो' असें पहा कशी ह्मणवितें ती ! किंवा मजजवळ त्या न बोलल्यास बाबासाहेबांकडेही जाईन. त्यानां भितें कीं, काय ? वाघोबा नाहींत ते कीं, जवळ जातांच गिळून टाकतील." असें आनंदानें बोलून रमी वाड्याबाहेर पडली.

पार्वतीबाई ही पतीजवळ कांहीं इकडच्या तिकडच्या गोष्टी करीत बसली होती. इतक्यांत रमी आली. तिला पाहून ती बाहेर गच्चीवर येऊन ह्मणाली " रमे, कुठे बरें तुझी स्वारी झुकली आज ही ?

रमी.— ह्मटलें झुकली आपलें दर्शन घेण्याकरितां. रत्र, मेलें बरें आहे, सत्रा वेळां येतें ह्मणून. तसें नसतें तर बाई किती लागून बोलल्या असतां ईश्वर जाणे.

पार्वतीबाई.— बरीच ग बोलकी तूं आहेस. झुकलीस कुठें विचारिलें, त्याचें उत्तर " आलें आहे आपणाकडे " एवढं पुरे होतें. पण नाहीं. "मेलं आपणाकडे येत असतें ह्मणून बरें, नाहीं-पेक्षां आपण बाकी ठेवलीच नसती" इतकें वेडें वांकडें बडबडण्यांत कोणतास अर्थ ?

रमी.— खरेंच आहे. आपणापाशीं चघळपणा नाहीं कामा-चा. कारण, काय ध्या मर्जी खप्पा झाल्यास! आणि तशानें उद्या-चें संकट आजच गरिबावर ओढण्यास कांहीं वेळ नाहीं. ह्मणून

चुप्प रहाणें पत्करलें. मात्र आपण आह्मांसारख्यांस मोठेपण देऊं-न बलाविल्यास चालतें, नाहीं आईसाहेब ?

पार्वतीबाई.— हें कायग रमे तुं आलीस ह्मणजे आपली एकसारखी अगोदर थट्टा चालवितेस, मग ती कोणीका ऐकेना आपली.

रमा.— नडलें आहे कुणाचें ? हवी आहे कुणाला ती मेली.

पार्वतीबाई.— काय ? तुला वेडबीड तर नाहीं लागलें ? बरें असो. बाईसाहेब खुशाल आहेतना ?

रमा.— ( वाईट तोंड करून ) काय सांगू आईसाहेब, एक-ट्या ह्या गांवांत बाईसाहेबांएवढें दुःखी दुसरें कोणीही नसावें. आपण मनांत अधिकउणा विचार न आणतां, काकांचे दोन शब्द ऐकून तत्क्षणीं 'घे सुरी आणि घाल उरीं' असें आचरण केलें, तें पाहून त्या शोकाकुळ होतात; पण करतात काय ? वेणु भकून गेली याचें कारण तिचें हिंडण्या सवरण्याचें स्वातंत्र्य नसून आई-बापाचें तिजवर दुर्लक्ष्य, व त्यांचें अति कौतुक हेंच, असा त्या नेहेमीं मजपाशीं सांगत असतात. हें काय असेल कोण जाणे कीं, एकाचें करणें, मग तें अन्यायी कां असेना, तें पाहून जवळच्यास त्याचप्रकारची वर्तणूक स्वीकारण्याचा हुरूप पणटून, तो तसें करूं पाहतो इतकेंच नव्हे, तर त्याचा अन्यत्र कडी बतवितो; असाच कांहीं अंशीं प्रकार आमच्या बाईसाहेबांवर असल्यामुळें जलावांचून मत्स्य नव्हे त्या तळमळत आहेत. याविषयींची दाद परमेश्वर घेईल तरच त्या दुःखविमुक्त होतील, नाहीं तर धडगत होणें नाहीं असें त्यांचें मुख साक्ष देतें. सारांश, अज्ञान समूहाच्या मानानें सुज्ञ समूह थोडा असल्यामुळें त्यांच्या योग्य, प्रौढ रीतिभाती पसरण्याचा कमी संभव असून तद्विरुद्ध पक्षांचा वाग्जाळ जवळपास सहज फैलावून. मग त्यांचा किता सत्य समजून तो वळविण्याचें कांहींकांच्या मनांत येऊन नंतर ते अविवेकी, चार चौघा जाणत्यांची ह्याजविषयींची संप-

ति घेतल्याविना स्वेच्छेनें तसें वर्तन ठेवितात, पाहून सखेदाश्चर्य होतें. प्रत्येक मनुष्य—आणि त्यांत आमच्या बाबासाहेबांसारखे—सारासार विचार करण्यास समर्थ असतां क्षुल्लक कामांत परक्यांचें अयोग्य अनुमत मान्य करून, त्यायोगें जनांस थट्टेस कारण होणें यास काय ह्मणावें नकळे. अप्रबुद्ध मनुष्य जनाच्या बीभत्स, व असमंजस प्रकार, व चाली स्वीकारील तर ती गोष्ट निराळी, आणि त्याबद्दल वाईट वाटणेंहि नाहीं, परंतु आपणासारख्या शहाण्यांचें तशा वर्तनावर पाऊल पडल्यास अधिक तें काय उरलें! सांगण्याचें कारण इतकेंच कीं, मनुष्यप्राण्यास स्वातंत्र्य हें एका प्रकारचें जीवन आहे असें आपण जाणत असतांही, इतरास नव्हे तर स्वतांच्या पोटच्यां मुलीसच — त्यापासून दूर उभें राहूं देण्याचा आपला निश्चय पाहून वाटच्या वाटसरांस देखील आपलें हें करणें अनुचित वाटल्याशिवाय राहणार नाहीं. समजा, कोणेका पासून कांहीं वर्षे स्वातंत्र्य हिसकावून घेऊन त्याजवर चौकी पहारा किंवा नुसती टेहळणी ठेविली, आणि एके दिवशीं त्या बिच्याऱ्याचे मनांत सृष्टींतील चमत्कार विलोकण्याचें, किंवा आपल्या फार दिवस न पाहिलेल्या, मित्रवर्गास भेटण्याचें आलें ह्मणजे त्यास त्याचा तो प्रतिबंध कोमल हृदयास करा झाल्याप्रमाणें टोंचत असेल! काय अशाचें मग संकट पुसायाचें!! अशाच आमच्या बाईसाहेब सध्यां असून त्यांचें चिंतेनें ग्रस्त दिसणारें वदन पाहून घटके घटकेनें माझी काय दशा होते ती मुखानें काय बोलून दाखवूं! आ- ईसाहेब, हा देह जीवंत आहे तोंवर यानें सुख भोगूं नये तर केव्हां? ज्यास हवें तें मिष्टान्न भोजन मिळत आहे, स्वतंत्रतेविषयीं तर विचारणें नको, ह्मणजे मनास वाटेल तें करण्याची, पाहिजे तेथें जाण्याची व बसण्याची इतकी नव्हे—इतकी असली ह्मणजे मग उजेड! वस्त्रप्रावरणांचीं तशींच डागडागिण्यांचीं कपाटेंचीं कपाटें भरलीं आहेत, ज्यांचे हातीं दाहा पांच माणसें खपत आहेत, शिवाय इष्ट मैत्र मैत्रीणीही यथास्थित असून, ज्यांचीं मनें स्थिर व शांत तेच सु-

खी. नाहीं तर मेल्हें मला सुखी कोण ह्मणेल? स्वतंत्रता धर्मकि आहे. आईसाहेब कीटकादिक क्षुद्र जीवांसहीं स्वातंत्र्याची भूक, मग आपल्या प्रिय कन्येस नसावी असें आपणास कसें वाटत असेल तें वाटो"

पार्व०ति०–रमे, शाबास तुझी, काय तुझे हे प्रौढ विचार कीं ज्यांच्या योगानें माझे बधिर झालेले कर्ण त्वां उघडीलेस, कसें आमचें शहाणपण नष्ट झालें, कुठे आमची विचारशक्ति वाहवली! हितानहिताचा तिळभर ही विचार न करितां, लोकसांगण्याप्रमाणें चालणें, हा खरोखरी वेडेपणा, असें आतां लक्षांत येऊन वेणूसारखी माझी लाडकी न होण्याकरितां ह्मणून जो व्यूह रचिला होता, तो बिलकूल सद्विचाराचा नसून त्याऐवजीं अन्य सत्परिणामाचे उपाय योजून तीस अधिक शहाणी करावयाचें तरीं न करतां कुतर्कसमावेश हृदयीं करून तिचा अमूल्य काळ व्यर्थ जाऊं देऊन अज्ञानंवस्थेंत बतूं दिलें याचा ताप होतो, परंतु झाल्या गोष्टीचा ताप करण्यांत हांसल नाहीं. रमे, कशी त्यावेळीं आमची चूक घडून, खडतर प्रतिज्ञा साधारणही अडथळे तीस न आगतां अमलांत आणीली. कर्तव्याकर्तव्य व योग्यायोग्याची निवड करण्याची शक्ति आह्मांत असतां कसें भ्रमलों! परवांचे दिवशीं तूं ह्मटलेंस तें खरें आहे कीं, 'मनुष्याचा कल चांगल्या टिकाणीं जाण्यापेक्षां वाईटाकडे जाण्याचा संभव फार असतो. त्यास विवेक शक्तिच कायती हटवील; बाकी सर्व यत्न त्यास घालविण्यास केल्यास ते त्यापुढें तुच्छ होत.' हें तुझें ह्मणणें खोटें नव्हे. अरेरे; लाडकीस मीं व्यर्थ छळिलें. खरी मी चांडाळीण. कन्येस जें कांहीं ह्मणून सुख मिळावयाचें तें इथेंच. पुढें आपल्या पतिगृहीं गेली ह्मणजे काय कुठचें नी काय कुठचें इकडे सासूचा जाच आणि तिकडे सासऱ्याचा किंग असावयाचा. निरर्थक मी तीस कोंडून ठेवून सुजनांत हास्यास कारणीभूत झालें. माझ्या वेणेचे गुण कसे आहेत ह्मणून सांगूं! साखरेहून गोड, मधुर. मजवर सोनी रुष्ट झाली असेल नव्हे? बस हो इथें रमे, जाऊन येतें

मी आंतून.

पार्वती बाईचा तर विकल्प असा मुळापासून अजीं उडून गेला. ती आनंदित मुद्रेने पतीकडे आली, आणि म्हणाली, "मला बाई वाटतें, आपली लाडकी फार गुणी आहे. इतकें असून माझ्या वयेला कोंडून ठेवितां हें शोभतें तरी का आपणांस? आपलें करणें स्वतांस ठीक दिसतें, तसेंच जनांसही दिसण्यास हवें आहे. सो यरे धायरे काय ह्मणत असतील 'पहा हो, नखभर, ह्मणून, आई बाप विच्याऱ्या मुलीस बाहेर पडूं तरी देत आहेत का? कोणही हो- तऱ्हा! तरी कांहीं दोन चार नाहींत. बरी एकच आहे, ह्मणून तिजवर एवढी ममता! मग दहा पांचावर किती पाघळणार होती हें आहे माहित! जगास चांगलें जें दिसेल तेंच आचरीत असावें. नाहीं तर, करतों आपण आपल्या मतें नीट; पण तेंच जगांत थुः थुः क- रवितें! लाडकीस तिच्या मैत्रिणीकडे सुद्धां आपण ढुंकूं देत नाहीं, हा केवढा आपला अविचार, हें करणें ज्याचें त्यालाच शोभूं जाणें- यमुनी ही तिची जिवलग मैत्रीणना? तिकडेही तिला जाण्याचा बंध. जाने कशी? तिला दटावल्यापासून तर दोघीजणी आज कित्ये- क दिवस एकमेकींवर रुसल्या आहेत. कृशोदरीचे मनांत यमनीकडे जा- ऊन तिजबराबर हसावें, खेळावें असें पुष्कळ येतें; पण आपण आ- हांत ना? यमनी आपल्याच सांगण्यावरून येत नाहीं असें नव्हे. प्रत्य- क्ष तिनें ह्मटलें "तूं बाई मजकडे येत जाऊं नकोस. आई रागें भरते." कालचे दिवशीं आपली सहज तिकडे गेलें होतें. तेव्हां कशाच्याशा बोलण्यावरून,—नाहीं आतां मला तें आठवत,—ह्मणाली, "आपण बाई मोठ्यांच्या घरीं कशास जावें. आह्मी बाई उनाड पोरी. आ- पल्या लेकीच्या घरीं आह्मी जात येत असलों ह्मणजे तीही आम- च्या सारखी व्हायची. उगाच आपण मला बोललां असतां का? खरी माझीच बाई चुकी" मेलें हें तिचें भाषण ऐकून वाईट वाटलें, आणि आज तुह्मांस सांगितलें बरें! ह्मटलें विनाकारण भांडण नको. आपला स्वभाव आहे मुळीं निराळा. यमनी माझ्या कृशोदरीसार-

स्त्रीच गुणाची आहे; पण कांहीं ह्मणा माझी सोनी, गुंजभर अधिक; किती आज्ञाधारक ती! तिनें एक दिवस ह्मणून माझी अवज्ञा केली नाहीं. माझीच नव्हे आपलीही. (आपल्याशीं) इतकी शहाणी माझी सुंदरी अं! तिला मी दुःख देतें! मग आई कशाची मी, काय माझ्या लाडकीचें नशीब."

स्त्रीचें वरील भाषण ऐकून शिवरामपंत किंचित् रागावून ह्मणाले, "बरें, मग काय सांगणें आहे तुझ्या मनांतून? थोडें वाचावयास बसलों तिकडेही तुझी पीडा." "या वेळेस बोलून उपयोगाचें नाहीं. ग्रंथबिंथ फेंकून दिला ह्मणजे काय ध्या यांचें. रागच मोठ्या कडाक्याचा बाई, अगोदर कधीं यायचा नाहीं, आणि आला तर अशा प्रकारचा" असें जाणून पार्वतीबाई कांहीं एक नबोलतां गच्चीवर आली. त्या खुर्चीवर बसल्यावर रमी ह्मणाली, "आईसाहेब, काय हा ईश्वरी चमत्कार! त्या अस्मानी रंगाच्या आकाशावर दृष्टि गेली ह्मणजे कनई मोठी मौज वाटते.

पार्वती—बाईग, त्या परमेश्वराचे खेळ कोण जाणील? त्यानें या सृष्टीवर लहान मोठे जे पदार्थ निर्माण करून ठेविले आहेत, त्यांच्या शरीररचनेकडे सूक्ष्मदृष्टीनें पाहिलें असतां त्याचें अगाध कर्तृत्व लक्षांत येऊन मन अधिकाधिक उचंबळून पूर्णानंदीं निमग्न होतें!

रमी—खरेंच ह्या ईश्वरानें पूर्ण कृपाळू होऊन आपणांस विवेकशक्ति हा अमोलिक नजराणा अर्पण केला, त्या योगें आपण हरएक कृत्य सद्विचारानें मागें पुढें पाहून करण्यास झटतों; ह्या त्याच्या परम थोर देणगीचीही आठवण झाली असतां आपण किती सुखी होतों.

पार्वती—खरें आहे; त्या शक्तीच्या योगें आपणांस बरें वाईट समजून तसें आचरण ठेवणें हें आपलें कर्तव्य होय, असें वाटतें इतकेंच नव्हे, तर जनांत बरें ह्मणून घेण्याकरितां यत्न करित असतों; परंतु सुशिक्षण व सत्संगति अभावानें बुद्धि प्रकाशित नसल्यास आपण आपल्या कर्तव्यास विसरून अयोग्य वृत्ति धारण करितों, हा

स्वतांचा अपराध होय. असेंच वर्तन आह्मांपासून झालें याचें कारण कांहीं अंशीं हेंच. असो; कृशोदरीस तिच्या सोवतीणीकडे जाण्यास आजपासून मध्यें आडकाठी आणीन तर तिच्याच गळ्याची शपथ.

रमी–आज मी आपणाकडे यावें आणि आपण कृपावंत होऊन ज्या दुःखानळानें बाईसाहेब पोळत होत्या, त्याचें निरसन व्हावें यांत ईश्वरहस्त असल्याविना हें महत्कृत्य घडून येणें कठीण. हें एक नवलच ह्मटलें पाहिजे कीं, श्रीमंतास संतानाचे बहुधा वांदे असायाचे, आणि दारोदार फिरून तुकडे जमविणाऱ्या भिकाऱ्याकडेस पहावें तर तो विचारा त्या पोरांच्या त्रासानें अगदीं बेजार झालेला दिसतो. मिळून दोहोंकडून ह्मणजे एकास मुलाची व दुसऱ्यास पैशाची टंचाई असायाची. अशांपैकीं कोणतीही न्यूनता देवाच्या दयेनें; नसून एकीकडून आमचीं मनें उदास दिसत होतीं तें औदासिन्य हरविलें ही आपल्या कन्येवर कृपा होय.

पार्व०– बाईगे, आमचे हातून मुलीचें जितकें कल्याण करवेल तितकें केलें पाहिजे. मुली सुजाण, शहाण्या, कोमळ अंतःकरणांच्या अशा झाल्या तरच त्या आपल्या पतीस आनंद देणाऱ्या व संसारांत वाकब होण्याची आशा. आणि असें झाल्यानें गृहस्थिति शांत असून सर्व व्यवस्थित राहाणार, ह्मणून अगोदर त्यांस आह्मी सुशिक्षण देणें हें रास्त आहे. अहाहा! सुंदरीचे सुगुण पाहून समाधान होतें. कन्या असावी तर अशी! नाहीं तर सांगितलें एक कीं तिनें करावें भलतेंच. सांगितलें कीं तूं बाई तिकडे जाऊं नकोस, ह्मणजे तिकडे ती उडून गेलीच. ह्मटलें बस की उभें राहवें. अशा बाई मुली होऊन न झाल्या सारख्या. रमे, मनाला कसेंसेंच वाटतें.

इतकें बोलून ती गडबडीनें पतीजवळ आली. शिवरामपंत यावेळेस पुस्तक चौरंगावर ठेवून कोचेवर पुढील विचार करीत पडले होते 'कायहो, किती हे लोक वस्ताद होत चालले आहेत! ठकवाजीची तर सीमाच झाली, आतां देतों ह्मणून एकादी वस्तु नेतील आणि लावतील देण्यास चार महिने. उद्यां या हो आपला कार्य-

भाग खचीत करतों असें आश्वासन देऊनही दुसरे दिवशीं भलतेंच एकादें निमित्त दाखवतील, इतकेंच नव्हे तर पुनः असें गोंजरून घेतील कीं त्या बिचाऱ्याची आशा दृढतर होऊन त्यास आपलें काम फत्ते होतें असें वाटावें; इकडे त्यांच्या मनांतील उद्देश पाहवा तर तो कांहीं निराळाच. ह्मणजे एकदोन मनुष्यें नित्य जोडे फाडीत असलीं कीं त्यांत त्यांनां मोठी मजा वाटते. परंतु उंदरांची स्थिति काय होते हें बोक्यांस कशावरून समजणार? लफंग्या मनुष्याचें स्वरूपवर्णन भाटाच्यानेंही करवणार नाहीं. कायहो, मनुष्यें दिसतात वरून मोठीं सौम्य आणि आंतून त्यांचे विचार मोठ्या कावे बाजीचे अं:. पहा तो नाना. किती भोळा मी त्याला समजत होतों. तसाच तो दिसतो आहे तरी किती गरीब; बुवाकडे किंचित् कोणी बघितलें कीं मान खालीं घातलीच. कोणीही जवळ गेला कीं, तो दूर झालाच. भाषण जितक्यास तितकेंच. अहो असे जे अतिनम्र ते आत्मीय कार्यसाधु होत. खरोखर त्र्यंबकरावा सारखीं मनुष्यें आढळणें विरळाच. कोणी एकानें एकाची चोरी केली तर तो त्यास पकडल्याशिवाय सोडील? छे: कोठचें, तेव्हांच मुसक्या तंग करील नाहीं माहित? पण त्या त्र्यंबकरावानें नानाला झाली असेल चूक न जाणून असें समजून सोडून दिलें हें आश्चर्य! माझा स्वभाव बुवा तापट आहे. चोरी, मारामारी, जुगारी, आणि विश्वासघात ह्मटला ह्मणजे माझें पित्त उसळतें. प्रत्यक्ष पोटच्या पोरास दंड केल्याशिवाय जाऊं दिलें नसतें मग ह्या नानास सोडिलें असतें? कोठचें हो, राहूं द्या तें एकीकडे. बरे झालें, नानास आज ओळखलें ह्मणून. मी त्यास भला समजून मोठा हुद्दा देणार होतों. किती लुच्चा आणि हिकमती! अरे नान्या, बडा वस्तादरे तूं! त्र्यंबकरावानें तुला सोडून दिलें हें तूं आपलें मोठें भाग्य समज. ( दचकून ) अरे! मी कां उठलों. हा काय चमत्कार! काय बरें झालें! अंगसें थरारण्यास लागलें. काय असेल तें कोण जाणें. दुखणें बाणें तर नसेलना येत, नेम नाहीं. इतकें

हे शब्द बडबडून ते दुसऱ्या कुशीस झाले, आणि चाकरास हांक मारण्याचें मनांत आणून दरवाज्या कडेस पहातात, तों आपली स्त्री आपणाजवळ तिष्ठत उभी राहिली आहे, असें दिसून आलें. तेव्हां मनांतील आलेले सर्व तरंग एकदम नाहींतसे होऊन ते ह्मणाले "आहे काय ? धांदल उडाली आहे तरी कशाची ?

पार्व०— कां झाला का जप पुरा. नशीब त्याचें. झटलें एवढ्यांत संपणें कठीण; केव्हांची उभी राहिल्यें आहे, तिकडे लक्ष असतें कशाल्य? उलटें आपणच विचारतां " धांदल कशाची आहे" ह्मणून. ठीक आहे.

शिव०— व. काय बोलते आहे पण. कशी मारते आहे टोले नवऱ्याला. बसलों होतो किंचित् विचारांत, तेथें तुला काय करावयाचें होतें ? बरें मीं विचारिलें तें सांगतेस. (हसून) सांगितलें ह्मणून ह्मण तूं आपली.

पार्व०— धांदल ना, नाहीं कशाची नाहीं. वेडी ह्मणून मात्र धांवतें. अहो काय सांगूं मला भरलें आहे वेड, त्यामुळें कांहीं न सुचतां कोचेवर डोळे मिटून समाधिस्थ व्हावेंसें वाटतें नी दुसरें काय. जळलें नीट तरी विचारायाचें होतें.

शिव०— ओहोहो ! खूपच उडाविलीस. आहे शहाणी आहेस. आतां तुला गोडीनें विचारतों समजलीस, सांग पाहूं तर मग मघांचें कारण ?

पार्व०— होय, कपाळ ठणकत होतें म्हणून धांवत पळत होतें. आलें लक्षांत मेलें बोलावें म्हणून बोलतां दुसरें कांहीं नाहीं.

शिव०—काय! तूं ह्मणतेस काय! तें मी समजत नाहीं? तुझ्या मर्जीनुरूप विचारिलें, तरी तिकडूनही तुझें आहेच. (हसत) शाबास तुझी.

पार्वती—ह्मणूं काय! मुळीं आपलें लक्ष आहे कोठें! आपली बडबडत सुटूं का ? तेथूनही कांहीं ह्मणाल.

शिव०—(अंग मोडून जांभई देऊन) अग कोणाचें! (डो-

ऊं चोळण्यास लागतात.)

पार्व०—आतां हद्द झाली ! जातें बाई मी आपली. आपली झोंप तरी कशास मोडूं? निजा आपण आपले खुशाल. कांहीं बोलावें ह्मटलें तेथें आपल्या प्रिय निद्राबाई आहेतच.

शिव.—अग नाहीं झोप, नाहीं आली, इतके भिण्याचें कारण नाहीं. डोळ्यांस पाणी आलें ह्मणून सहज ते चोळले; पण आज तू संतापल्यासशी दिसतेस. बरोबर, समजलें, शिवरात्र आहे. तेव्हां तुझें चित्त स्थिर असणार कोठून? तुझेंच नव्हे जनांचीही अशीच तऱ्हा. मग उपवास कां करावयाचा. इंद्रियदमन होऊन मन एकचित्त व्हावें ह्मणून ना? परंतु अशानें उलटें ते अस्थिर होऊन जातें यांत संशय नाहीं. तुमचें जबर बुवा अज्ञान! केव्हां नाहींसें होईल तें होवो. बरें, पण आपली मुद्रा रागीट कां?

पार्व०—उगाच आपली. कांहीं झालें नाहीं. मलाच समजत नाहीं म्हणून कोडग्यासारखी पुन: पुन: येतें.

शिव०—आहे माहित, पुस्तक वाचीत होतों तेव्हां आपली स्वारी आली होती ती!

पार्व०—आपलें लक्ष असेल कशाला! मेलें दहादां आलें म्हणजे एकादां केव्हां सरकारास दाद लागायाची. कोण बाई विलक्षण चाल ही! जळली मेली ती.

शिव०— ( हसून ) आतां काय ह्मणावें ! हसावें की रडावें. अग तूं एकदांच आलीस ना ?

पार्व०— होय मेलें एकदांच आलें होतें. ह्मटलेंना, आपलें लक्ष असेल कशाला ?

शिव०—अग निट बोल म्हणजे तूं काय म्हणतेस तें समजेन. अशानें तुझा भावार्थ कसा जाणवेल !

पार्व०—नीटच बोलतें. वांकडें बोलून काय करूं ? ग्रंथ पहात असतांना आलें, या वेळेस तर बाई प्रतिसाधुच बनून साधुत्व घेतलें होतें; पण कुठवर टिकलें असतें तें होतें मी जाणत फुकटचं

नाहीं तें. आणि आपण कशच्याशा विचारांत एकदां होतां. नव्हतां का? तेव्हां नव्हेत का मी आले ?

शिव०— कोण जाणे, आली असशील. माझें लक्ष नव्हतें. असो; मुलीकडचा कांहीं समाचार तुला माहित आहे ?

पार्व०—हं हं, समजलें. मघांशीं ऐकून आपण ज्या विचारांत इतके बेफाम झालां होतां तो तिच्या लग्नसंबंधाचाच • तर मग ?

शिव०—तुझ्या मनीं सदां हेंच ती आणि तिचें. लग्न. दुसरें कांहीं आहे ? पुरुषास दोहोंकडचें पाहिलें पाहिजे. घरही सांभाळलें पाहिजे आणि उद्योगही चवितला पाहिजे.

पार्व०— मी अज्ञानी नव्हे बरें! मी जाणतें, आपणा मागें सत्रा लचांडें असतात तीं. पण मुलगी मोठी होत चालली ह्मणून ह्मटलें. कारण तें एक मोठेंचें कार्य उरकणें राहिलें आहे.

शिव०— होय मला आहे माहित. तुलाच तिची सर्व चिंता, आणि मला नाहीं असें नाहीं. एकपट तुला असेल; पण त्याच्या चौपट मला आहे. सध्या तुझी पिरपीर ठेव एकीकडेस, आणि आली आहेस कशाला तेवढें फक्त सांग ? मला गेलें पाहिजे बाहेर.

पार्व०— मला तर बाई तिची स्थिति पाहून आणि ऐकून फार वाईट वाटतें. तसेंच आपणासही वाटत नसेलसें ह्मणवत नाहीं.

शिव०— काय? काय बोललीस? कोणाचें तुला वाईट वाटतें? आणि मलाही वाटत असेल असें तूं काय ह्मणतेस? तें मी समजलों नाहीं, पुनः ऐकूं दे. तूंच पहा, कारणाशिवाय एखाद्यास दुःख वाटेल तरी कसें ?

पार्व०— असें कसें ? एवढें मी जाणतें; पण मुलीरा एखाद्या बंदिवानाप्रमाणें, तिचें कोणत्याही रीतीचें वांकडें पाऊल पडलें नसतांही ठेविली आहे त्याविषयीं नाहीं का वाईट वाटावयाचें ? माझा तर तिजकरवां तिळतिळ जीव तुटतो.

**शिव०**— (विचारकरून) खरी गोष्ट. हें माझ्या ध्यानीं मनींही नव्हतें. पोंटच्या पोरीस अशा प्रकारें वागविणें हा आपला मूर्खपणा होय. गोविंदराव तुला आहेतना माहित? त्यांनीं मला परवांचेच दिवशीं ह्मटलें, "कायहो शिवरामपंत, आपण नीतीनें वागत आहां खरें; पण थोडी अनीति आचरीत आहां, हें कसें असेल? तें तुमचें तुह्मांसच माहित." तेव्हां मी विचारिलें "कायहो कोणती हो अनीति दाखवा पाहूं?" "दाखवूंच का?" असें ह्मणून, बोलले, "शिवरामपंत, मुलीस हिंडू फिरूं न देतां वाड्यांतच कोंडून ठेवणें हें आपल्या मतें ठीक दिसत असेल, पण आह्मांस नाहीं बुवा दिसत. बोलतों याचा राग येईल हो!" इतकेंच सुचवून ते निघून गेले. असो; माझी तर अशी इच्छा आहे कीं, तीस हिंडण्या फिरण्याचा प्रतिबंध मुळीं नसावा. अगोदर तुझेंच हें करणें. आणि आतां त्याबद्दल कां वाईट वाटावें? या साठीं जें बोलावें अथवा आचरावें तें मोठ्या खोल विचाराचें असलें पाहिजे. तुजकडून हा अविचार झालाच, तसाच सर्वांकडून होतो हा थोर चमत्कार! बरोबर आहे. जेथें अज्ञानाचें वास्तव्य तेथें शहाणपणाची कमतरता असावयाचीच. याकरितां स्त्रियांस शिक्षण हें असलेंच पाहिजे. तूंच थोडी लिहिणारी वाचणारी होतीस आणि आहेस, ह्मणून आपल्या मुलीसही तें यावें ह्मणून थोडा बहुत यत्न केलास. त्याचप्रमाणें तूं तुझ्याकडून होईल तितकें तीस सद्गुणांकडे वळविलेंस. हे लाभ नव्हेत काय? आतां विद्यारहित स्त्रीकडून इतकें हें होण्याची आशा नकोच होती. मूढल तीच वेडी. तेव्हां मुलांस शिक्षण मिळणें नाहीं हें उघडच आहे. उलट्या अशा त्या ह्मणतील कीं, आमच्या कुळांत मुलींनीं कधींही विद्याभ्यास केला नव्हता तो आज ह्या कोठल्या फिरंग्यांच्या राज्यांत, हवा आहे कशाला? आणखी थोडाच त्यांनां पुरुषासारखा धंदाउद्योग पहावयाचा आहे? तेव्हां हा विचार त्या मनांत आणीत नाहींत कीं, पूर्वीं आह्मी अशीं छानछुकीचीं वस्त्रें परिधान करीत नव्हतों तीं आज करीत आहों, आमचे आजेपणजे फाटक्या

रगाड्यांवर आयुष्य कंठीत असून फांके मारीत असत. आज आपणा-स मऊ मऊ गिर्द्या, गाद्या, बिछाने मिळाले आहेत व अधिकाधिक श्रीमंत होण्याची आशा बाळगीत आहों. कांहीं दिवसांपूर्वीचे आपण खोपड्यांत राहणारे, आज एकेक दोन दोन मजली घरांत, हवेल्यांत राहतों, ही पूर्वापार रीत चालत आली नसून आतांची आहे, तथापि तिचा स्वीकार करितों, हें कसें? आतां स्त्रियांस शिक्षण देण्याची पद्धत ही नूतन असें त्यांस वाटतें ही त्यांची समजूत यथायोग्य आहे. कारण त्याचा शोधच अल्प आणि शोध लागणार तरी कोठून? परंतु असें नव्हे, ही शिक्षण देण्याची पद्धत प्राचीन असून अनेक स्त्रिया पंडित झालेल्या आपण ऐकतों आणि हे खरें आहे. बरें विद्या शिकून कोठें उद्योग करावयाचा आहे हेंही त्यांचें ह्मणणें विचारानें पाहिलें असतां अगदीं मूर्खत्वाचें आहे, असें दिसून येतें. अझून तुझ्या कृशोदरीस तरी काय येते! थोडें लिहिणें वाचणें आलें ह्मणजे झालें? तिच्यांतही तुजसारखें अज्ञान बरेंच आहे. असो; पण तू दिवसानुदिवस खऱ्या खोट्याचा विचार करतेस याचा मला आनंद होतो, आणि अशीच तुझी शोधक बुद्धि राहिल्यास जें कांहीं थोडें बहुत अज्ञान बारें अजून वसत आहे त्यासें लौकरच पळावें लागेल. सारांश अजाणतेपणामुळें काय नुकसान आणि किती दुःख होतें याचा तुला थोडा अनुभव आलाच. पहा, तुझ्या नादीं लागलों ह्मणून मलाही लोकांनीं नांवें ठेविलीं असो; झालें तें झालें आजपासून तरी सावध ऐस.

पार्व०—आपण ह्मणतां तें खरें आहे. ज्या मनुष्यापाशीं सद्विवेकशक्तीचा अभाव तो आपला ठोंब्याच समजला पाहिजे. (स्वतांस अनुलक्षुन) मजजवळून चूक घडली खरी!

पार्वतीबाई नंतर हरात हरात गच्चीवर आली, आणि मन मोकळें करून रमीशीं दोन गोष्टी बोलल्यावर कृशोदरीविषयीं जें जें कांहीं ह्मणून सांगावयाचें होतें तें तें सर्व खुल्या अंतःकरणानें तीस सांगितलें. तें आईसाहेबाचें गोड गोड भाषण कर्णीं पडतांच र-

मीस, आपणास सांगितलेलें कृत्य आपण शेवटास नेलें, ह्मणून अत्या-नंद झाला आणि अत्युल्हासानें ती परत वाड्यांत येण्यास निघाली.

# प्रकरण तिसरें.

शरदृतूनें आपली कारकीर्द आटोपल्यामुळें गार व रम्य अशा हवेच्या झुळका एकामागून एक येत होत्या. आकाश अभ्ररहित असून दिनकरानें आपलें कोमल किरण नुकतेंच जगतावर फेंकलें होतें. प्रभातकाळ असल्यामुळें अंतरावरील वृक्ष, नद्या, नाले, पर्वत धुक्यानें आच्छादित असल्याकारणानें जणुंकाय प्रेमभावानें परस्परांस दृढालिंगन देत आहेतसे दिसत होते. तृणांकुरांवर दंवाचे बिंदु पडून सूर्यकिरणामुळें त्यांची चकाकी आधून मधून दृष्टिगोचर होत होती. तशांत शिवरात्रीचा दिन असल्यामुळें नगरवासी जनांची स्नानें व देवदर्शनें आणि याचकांची याचना करण्याची एकच गर्दी उडालेली होती

वरील विश्वकर्त्याचे मनोहर देखावे व स्त्रीपुरुषांची तारांबळ पाहून कृशोदरीच्या मनांत आनंदलहरी मागून लहरी उठताहेत, किंचित् इकडे तिकडे फिरत आहे. आंतून आंतून "रमी येते केव्हां ? आपलें कार्य शेवटास जाईल किंवा कसें," असे तर्कधांव घेत आहेत, तों रमीचा शब्द तळघरांत होत आहे असें तीस

वाटलें न वाटलें, आणि ती जिन्यावरून डोकावून कानोसा घेत आहे, तों धडधडत रमी वर आली. तिला पाहतांच तिचा आनंद काय पहावयाचा आहे ! तिच्या चेहेऱ्यावरूनच आपलें मनोगत तिनें पूर्ण केलें ह्मणून इनें तत्क्षणीं ताडिलें. तरी काय संशय तरंग आल्याविना रहातात! तिनें बारीक स्वरानें "रमे, येऊन गपचुपशीग बसली आहेस?" असें विचारलें. आतां उडवाउडव करण्यांत मुळीं हांसल नाहीं, जाणून तिनें तिकडची साद्यंत हकीकत निवेदन केली. तें आनंदप्रद वृत्त कानीं पडतांच लहान मुलास खाऊ मिळाला असतां जसें तें प्रमोदित होतें त्याचप्रमाणें तीं होऊन तो तिचा परमाल्हाद मावेना मुद्धां. नंतर रमीसतिनें वैतरणीस व क्षिप्रेस बलाण्यास सांगितलें, व आपण शृंगारखोलींत येऊन तेथील कपाट उघाडिलें. त्यांतील सर्व दागदागिनें बाहेर काढून ठेवल्यावर हिरव्या जरीकांठी शालूनें नटून अंगात कांचोळी, गळ्यांत कांहीं दागिनें व मोत्याचा कंठा घातला. पायांत तोडे होतेच. नंतर आरशाजवळ येऊन मुख पहाते तों कुंकुमतिलक रेखीलेला नाहीं आढळून तिनें तोही लगबगीनें पण सुरेख असा लाविला. अशाप्रकारें सिद्ध होऊन ती आनंदित मुद्रेनें खिडकीशीं टेकून रमीची वाट पहात राहिली. अर्ध एक तासांत रमीही त्या दोघीस वर घेऊन येऊन त्यांनींही आपापलीं वस्त्रें परिधान केल्यावर कृशोदरी आपल्या तिघी सख्यांसह मोठ्या हौशीनें सभोंवार्ति पहात पहात वाड्याच्या दरवाज्याशीं येतांच हजर असलेल्या रथांत बसून ती सख्यांनिशीं कांहीं वेळानें जवळील सांबाच्या देवालयाजवळ येऊन पोहोंचली.

तें देवालय काळ्या पाषाणाचें असून वर नकशीकामही बरेंच सोडविलेलें होतें; आंतील गाभारा विस्तीर्ण असून किंचित् अंधार असल्यामुळें भयानक दिसे. समोर मोठें पटांगण होतें. व मध्यभागीं पुराणिक बावांचें पुराण सांगण्याचें व्यासपीठ होतें. भिंती शुभ्र असून वर अत्युत्तम प्रकारचीं चित्रें रेखिलेलीं होतीं. कित्येक ठिकाणीं वालशिटें असून मध्यभागीं मोठा झुम्मर टांगलेला होता.

चवथरा बराच उंचीचा होता, व त्याच्या पायऱ्या वरून दोहों बाजूं-र्नी शोभेसाठीं सुवासिक फुलझाडें कुंड्यांत ठेवलेलीं होतीं. असो;

महोत्सव असल्यामुळें देवालयांत दण दणाट उडालेला होता. नगाऱ्यांचे ध्वनि, हरहर महादेव या नांवाचा गजर, मुलांचा व भिकाऱ्यांचा गलबला. येणें करून तर तें स्थळ विशेष दणाणून एकमेकांस एकमेकांचें भाषण क्वचित्च ऐकूं येत असे.

हा वेळ ह्मटला ह्मणजे भामटे, चोर, खिसेकातरू या लोकांसच हितावह असून त्यांस या दिवशीं उत्पन्नही बरेंच होत असतें. (याचा अनुभव शहरोंशहरीं बहुतेकांस बराच येतो.) आणि अशांची संख्या बरीशी असून त्यांनीं चोऱ्या, मारामारी, दगलबाजी वगैरे खटले करून आपले गजबे भरून जावेत ह्मणून शिपाई लोक हे एका पायांवर खडे पहारे करीत असतात. तितक्यांत त्यांपैकीं कोणी असामी तावडीस मिळाल्यास मग त्याचें दुर्दैव काय पुसावयाचें ! त्यानें तेवढ्यांत डोळे उघडून त्यांशीं समेट केल्यास ठीक; नाहींपेक्षां तेथल्या वरिष्ठ अमलदारापर्यंत त्यास नेत तों बुवाचे पंचप्राण व्याकुळ होऊन जावयाचे.

कृशोदरी तेथें पोहोंचतांच तिनें आणलेल्या शिपायाकरवीं, विशेषतः आंधळ्या पांगळ्यास संतुष्ट करवून, आपण तिघी सख्यांसह, देवळांत शिरली. तीस पाहून, जणुं एकाद्या गर्भश्रीमंतास किंवा वड्या सावकारास विलोकून पाठीं सरून त्यास मार्ग द्यावा, त्याप्रमाणें तेथील मनुष्यें एकीकडेस होऊन तिच्या शरीरकांतीकडेस, जरी ती रूपानें प्रत्यक्ष रंभाच नव्हती तरी, वर्णानें गौर, बांध्यानें सडपातळ, सहाजिक हास्यवदन, जरतारी नेसलेला हिरवा गार शालू व विशेषत्वें यौवनदशेचा आरंभ यानें विशेष सौंदर्य आणलेलें असल्यामुळें सर्वांनीं, तिचे मुखकमलावर काळेभोर असे पडलेले कुरळ केश, ज्यांस ती क्षणोक्षणीं मागें सारीत आहे, सुकुमार कोमळ हस्त, गुलाबाच्या उफळलेल्या पुष्पाप्रमाणें प्रफुल्लित चंद्रवदन, ज्यावर दोहों गालांची अप्रतिम शोभा पडून ज्यास सतेजता विशेष आली आहे,

गरगर फिरणारे पाणीदार नयन, सिंहकटी, व ठुमकत ठुमकत हंसगतीप्रमाणें चालणें, यांकडे दृष्टि फेंकून तीस रोखून अवलोकनामृत पान करूं लागलीं. त्यांत अव्वल प्रतीचे थट्टेबाज जे होते ते तर निर्लज्ज होऊन तोंड सोडून असे कांहीं बरळूं लागले कीं, त्यांचें त्यानांच देहभान नाहींसें होऊन जाण्याचीच वेळ येऊन ठेपली. कित्येक एकमेकांचे कानांत कुजबुजण्यास लागून हास्यरस ही माजूं लागले. तेव्हां तर तेथें सीमाच झाली! हा लज्जित करणारा तशांत धडधडीत देवळांत होणारा प्रकार पाहून कृशोदरीस पराकाष्ठेचें वाईट वाटलें! परंतु इलाज काय? मनांत आणलेला हेतु पूर्ण करावयाचा होता ह्मणूनच तिनें तशा चवाठ्यांतून जाण्याचें पत्करिलें. जेमतेम ती मान खालीं घालून आपल्या पायांकडे पहात नंदीहून दहा पंधरा पावलें पुढें आली. तों हातांत, कांहीं वेलाचीं फाटकीं तुटकीं पानें, एकीकडे गंध व अक्षता अशा पूजेच्या साहित्यानें भरलेल्या परड्या घेतलेले दहा पांच असामी " यां आव, यां आव, " अशा कलकलाटानें तिला बेजार करून सोडलें, त्यांतच ते हें आलेलें कूळ आपणासच मिळावें ह्मणून एकमेकांवर दांत ओठ खाण्यास लागून प्रत्येक दुसऱ्यास दुष्ट असें रोखूं लागला. त्यामुळें तर तेथें मोठाच आकांत उडाला.

ही तेथील तऱ्हा पाहून कृशोदरीस हे मेले एखादेवेळीं धक्की ही देतील ह्मणून फार भीति वाटूं लागली. तीस वारंवार अंग सांभाळून घेतां घेतां पुरे पुरेसें झालें. आपण बायको मनुष्य आणि हे धष्टपुष्ट बोके सन्याशी पडले दहा बारा, तेव्हां येथें काय सांगावें, हेंही तिला सुचेना. रमी हा गोंधळ पहातच होती. बाईसाहेब तर येथें या मेल्यांच्या धांगडधिंग्यानें घाबरून गेल्या आहेत पाहून ती किंचित् पुढें होऊन त्या सर्वांस " काय मेले हे लट्ठभारती, एकेकाहून एकेक गबदुल, मेले खाऊन खाऊन माजले आहेत नुसे. लट्ठ सुमार तरी कोठें ठेवितात! मेल्या एकानें मघाशीं भी बाजूस सरलें असतांही बळेंच जवळ येऊन धक्की दिली तेव्हां हा काय गोंधळ! आणि

काय ह्या स्थानाचें महात्म्य!! पवित्र स्थान समजून यावें, तेथें तर हा अमंगळ कारखाना! एकून हें आपलें एक रस्त्यावरील दुकानच नव्हे! चला निघा येथून. जमले मेले कावळ्यासारखे. आह्मांस कोणाची गरज नाहीं आणि आह्मांस पूजाही कर्तव्य नाहीं. बायकामनुष्यें सुद्धां टोणगे पहावयाचे नाहींत हें काय जळलें! याचवेळीं तुम्हांस चापलं असतें परंतु गई करितें. आतां दूर होतां कीं नाहीं येथून?" असें कडकडीत अनुलक्षून बोलतांच ते थोडेसे दूर झाले. आणि जशा त्या थोड्या पुढें सरल्या, तसे पुनः ते एकत्र जमून पूर्ववत् पाणचटपणा आरंभला. यावेळीं खरोखरीं रमीचें मस्तक तापून गेलें. व ती होती ह्मणूनच फार बरें झालें. तिनें त्या तडाक्यांत एकेकाचें हवेंतसें यथेच्छ पूजन केलें. तिला जरी या रीतीनें आपण वरतलों असतां तें फलदायक होईल असें वाटलें नव्हतें. तथापि तोच मार्ग श्रेयस्कर झाला यांत संशय नाहीं; कारण ती सतंप्त होऊन बडबडत असतांच जो तो ओशाळून निमुट एकेका वाटेस लागला. जर का ने अगोदरच हुशार होऊन आपापल्या उद्योगास किंवा दुसरीकडे जाण्याचें मनांत आणते तर निरर्थक एवढी भेंबरी त्यांची कां उडती? परंतु नाहीं. सवाई मनुष्य मिळून त्याच्याकडून त्यांची फटफजीती व्हावी असें ते इच्छीत होते हेंच यावरून खरें. तर अशी मार्गप्रतीक्षा शेरानें सव्वा शेराची करून त्याचे तोंडानें आपली संशयनिवृति करून घेऊन आपली रग मोडविणें यापेक्षां बरोबरीच्याशीं समजूत करून घेणें आणि त्याप्रमाणें उमजणें हें फार उत्तम. शेवटीं गाभाऱ्यांतून थोरले पुजारीबावा आपलें पूजन आटपून बाहेर येऊन पहात असतां हें बडेजावी कूळ त्यांच्या अवचित नजरेस आलें. त्यानें बाईच्या मुखाकडे क्षणभर पाहून ताडलें कीं, येथें खचीत आपणास मिळकत बरीच होणार यांत संशय नको. शिवाय कूळही भोळेंसें दिसतें. त्यास शेंगटाऱ्या झाडावर चढवून आपलें कार्य साधण्यास फारशी अडचणही काढावयास नलगे. आमचें काय! यजमानाचे तोंडावरून गोड गोड हात फिरविला कीं अहो, मिळालेच चार साहा आ

ण्यांचे पैसे. निदान थोडकीशी लटपट उडवून आणे दोन मिळण्यास तर कोणतीच हरकत नाहीं. खरोखर ईश्वर मोठा दयाळू आहे. पहा आमचें पोट चालावें ह्मणून त्यास अशा अशा थोरांच्या मनीं प्रेरणा करून किती आयास घ्यावे लागतात बरें? असो; आतां खबर घ्यावी ह्मणून त्यानें कृशोदरीस " कां बाई, आंत यावयाचें आहेना? चला तर मग विलंब कां? एथला मुख्य पुजारी मीच आहें." असें ह्मटलें.

कृशो०— होय का? मग हे हो कोण येथून तेथून एकसारखे नाचणारे! (तिरस्कारानें) मेल्यांचीं तोंडें पहा कशीं तीं?

भटजी बो०— (थोडेसे वरील शब्द ऐकून, घोटाळ्यांत पडून) ते आपले उगाच बाई. ते आणि आह्मी अगदीं निराळे. त्यांचा आमचा संबंध कशाचाही नाहीं. बरें, बेल एक सहस्र आणूं का?

तिनें " होय, आणा " असें ह्मणतांच ते थोरले द्रोणील घेऊन धांवत धांवत देवळापाठीमागें जाऊन तेथून टोपलींतून तो आणून पिंडीजवळ ओतविला. नंतर ती गाभाऱ्यांत शिरल्यावर रमीस तिनें आपाणाकडे पाहण्याची खूण करून वैतरणीस व क्षिप्रेस वाटेंत उभ्या न राहतां एकेबाजूस सोईवार पडे अशा भितीशीं राहण्याचें सुचविलें. त्याप्रमाणें तिनें योजना केल्यावर बावांस आरंभ करण्यास खुणावून आपण तेथें मर्यादेनें सांबपिंडीवर बिल्व टाकीत बसली.

## आर्या गीति

लौकिक मिळण्या करितां, ढोंगें जन जगीं बहूत हो करिती ॥
सन्मार्ग सुदर्शक ते, जे हीं सोंगें कदापि ना धरिती ॥ १ ॥

हितउपदेश कराया, अक्कड नलगेचि हें तुह्मी जाणा ॥
त्यातें अवश्य ती हो, चिंता होण्या असे मनीं राणा ॥ २ ॥

या स्वार्थ साधकांनीं, आपुल्या फंदा जना न लावावें ॥

चेष्टा ना तरि होते, पडतें त्यां भाग मूखे मोजावें ॥ ३ ॥

बाहेरून साधुपणाचें ढोंग मिरवून आंतून कुकर्म आचरणारे असे भोंदू अनेक. हातीं टाळविणा घेतला कीं बनला साधु. घेतलीं हाताखालीं दहापांच माणसें आणि मग तीं चाललीं गल्लीकुचींतून मृदंग, टाळ, विण्याच्या नादांत मोठमोठ्यानें सुर ओढीत. परंतु मागें पुढें असलेल्या मंडळीकडे नजर फेंकिली असतां प्रथम दर्शनींच विस्मय वाटतो! त्यांच्या त्या झोंकदार रंगीबेरंगी व कल्लाबतूच्या टोप्या! ते एकाच कानावर लपटलेले फेटे! यांतच ते गर्क. तेव्हां गाणें सुचणार तें कोठून? यांतून कित्येक तर हरातच चाललेले असतात. बरें इतक्यांतूनही कांहीं अक्षरें मुखांतून काढावयावयाचीं तीं 'आ' किंवा 'ओ' असा स्वर काढल्यानें झालें काम. मुद्दा असा आहे कीं, राजा शहाणा असेल तर प्रजाही शहाणी व नीतिवंत असावयाची. तोच विचारशून्य मंदमति जर आहे तर त्याची प्रजा शतमूर्ख कां न व्हावी? तसेंच जो कोणी साधु किंवा संत, पदें ठुंबऱ्या वगैरे गात जातो तोच अगोदर ज्ञानी, चतुर, सन्मार्गोपदेशक व त्यास सत्समागम घडलेला असा असला तरच त्याचे चेले त्याजसारखे निपजावयाचे. परंतु गांजा, भांग इत्यादिक मादक पदार्थांचें गुरूसच व्यसन असल्यास चेले धड कसे निघतील? आपापलीं कर्तव्य जाणणारे खरे साधुसंत थोडे. असल्यास तेच धन्य! तेच तारक व जगदुद्धारक होत! ढोंग धतुरे करून व दाखवून नांदण्यास शाल फाराकून लोकांस तारक उपाय सांगण्याचे ऐवजीं मारक सांगण्यांत व वनोवनीं हिंडवण्यांत भूषण असेलसें वाटत नाहीं. असो; ख या साधूसंतास—कीं जे आपलें सर्व आयुष्य व्यर्थ न दवडितां जनांच्या हितार्थ खर्चिताहेत, जे तन, मन, धनें करून आपली काया परोपकारासाठीं झिजविताहेत—त्यांस एकाच दोषास पात्र करणें हें विवेकाअंतीं वेडेपण होय. परंतु वरील रीतीच्या मालिकेंतलेच किंचित जनास भिऊन चालणारे असे ज्ञानप्रकाश मंद असल्यामुळें मन आकलन न होणारे सदहू पुजारी बावा हे होते हें खचीत. त्यांनीं एक लहानसा पण

पांढरा शुभ्र जाडा भरडा पंचा नेसलेला होता. उजवे बाजूस पळी पंचपात्री ठेवलेली होती. वर्णानें सांवळे असून गंधलेपनानें तोंड भव्य दिसत होतें. अंगानें पुष्ट व दोंदही बरेंच पुढें सरकलेलें होतें. हे बावा पूजन सांगण्याचें विसरून तिच्या मुखाकडे पाहण्यास लागत व पुन: स्मरण होऊन शुद्धीवर येत. असा क्रम चालला असतां ते मनांत विस्मय व दुःख पावून आपणाशींच ह्मणूं लागले "वा! काय आश्चर्य हे! अशीं कार्ये आचरतेवेळीं मनें ईश्वराकडे न वळवितां मनांत कुविचार व कुवासना आणवून देह भ्रष्टवून घेतों, इतकेंच नव्हे, तर भोळ्या बिचाऱ्या स्त्रियांस दान करा, धर्म करा आणि शेवटीं आमची धन करा ह्मणजे स्वर्गप्राप्ती होऊन अनंत काळ जसें द्यावें त्याप्रमाणें सुख मिळेल अशा थापा देऊन द्रव्य लुबाडून उलटी पापराशि ठेवितों. हें आचरण आह्मां बावासारख्या ब्राह्मणांस शोभतें काय? हाही मोठा चमत्कार कीं, त्यांचा आम्हावरचा विश्वास न ढळतां व मनांत विकल्प न येतां, उलटें घरांतून सासुबाई जवळून किंवा पतीपासून खाण्याच्या किंवा दुसऱ्या भलत्या निमित्तानें पैसे काढून आम्हास वेडगळपणें अधिक प्राप्ति करवितात! खरोखरी त्यांचें अज्ञान त्यांस नडतें यांत संशय नाहीं. आतां आम्हांस यांत किफायत दिसून येणार, तेव्हां अर्थात् आह्मी ती बुडवून पायांवर धोंड कशी ओढूं! चाललें आहे तें उत्तम आहे आणि असेंच सुरळीत चालो म्हणजे झालें." असे विचार यावेत पुन: मावळावेत अशी लटपट उडाली असतां ते बावा पूजा आटोपण्याच्या समयास तिच्या सौंदर्याचीच भाटाप्रमाणें वाखाणणी करूं लागले! हें तीस, संस्कृत भाषा किंचित् अवगत असल्यामुळें थोडें समजे, असें होतें; म्हणून त्यामुळें तिला विलक्षण दुःख झालें. तरी तें तिच्यानें बोलून दाखवेना. कारण तशानें आपलीच लज्जा जाणार हें जाणून चुप बसावें लागे. शेवटीं मनाचा धडा होऊन कोप येऊन "भटजीबावा संभाळा हं. ही बसलेली कोण याचा थोडा विचार करा" असें म्हणतांच त्यांनीं तें तत्क्षणीं जुळवून घे-

ऊन म्हटलें "बाई इतका राग कशाचा? जगन्माता जी देवी (पार्वती) हिचा स्तव करतों आहें. आज्ञा नसेल तर आराधना आटपतों." इतकें म्हणून त्यांनीं आपला पूजनक्रम चालू केला.

सांबपिंडीसमोर कृशोदरी बसली आहे, किंचित् लांबसे भटजीबावा आहेत, अशा संधीस, वाचकहो, आपले दिनकर आणि दिवाकर हे अचूक देवालयें पहात पहात त्या देवालयांत, येऊन धडकले. किंचित् आंत जाऊन सांब विलोकून वळताहेत तों, सुंदर तरुण कुमारिका पूर्ण शृंगार करून प्रफुल्लित वदनानें सांबपिंडीवर मनोभावें त्रिल्वपानें सोडीत आहे असें अवलोकिलें. इतक्यांत कांहीं पूर्वस्मृति होऊन आनंदलहरींत निमग्न असा विचारसागरांत दिनकर क्षणएक तरंगूं लागला. मग काय!

## साकया.

कृशोदरीतें पाहुनि दंगाचि, झाला आनंदानें ॥  
मनीं येउनी तरंग त्याचे, बधिर जाहला कानें ॥ १ ॥

सागरसान्निध उभा ठाकुनि, वक हा जैसा राही ॥  
त्याचपरी मनमोहन तेथें, सुंदर रूपडें पाही ॥ २ ॥

त्यावेळीं तो मनांतील झालेला निश्चय विसरून चकित व मोहित होतसाता मित्राच्या कानांत ह्मणाला, " गड्या, ही सुंदरी कोण बरें असावी? महाबळेश्वर मुक्कामीं आलेल्या शिवरामपंताची ती विनयसंपन्न कन्या तर नसेलना? (किंचित् स्तब्ध राहून) गड्या! तीच! जीचेशीं माझा विवाह करून देण्याचा वडिलांचा मनोदय होता ती हीच. तेव्हांच्या आणि आतांच्या रूपांत केवढें हें स्थित्यंतर! अहाहा!! बसणें कसें आहे म्हणून सांगूं! पहा तिचे ते पाणीदार नयन मला जणुं खुणाविताहेतसेच भासतात! अहाहा! मुखचंद्रमा पहा कसा नीरजाप्रमाणें कोमल व मृदु दिसत आहे तो! तिचें वदन पाहून या दिनकरास वाटतें कीं, ही सुंदरी मला विलोकतांच आल्हा-

दित झाली आहे. पहा ती नथ ! तिच्या गुलाबी मुखास कशी विशेष शोभा आणीत आहे ! गड्या ! शुभांगीस विलोकून लुब्ध झालों यांत नवल नाहीं. सव्य हस्त पहा पिंडीवर बिल्व टाकण्याचे व्यवसायीं चुर झालेला असून त्याचा मित्र ( अपसव्य हस्त ) बिनघोर मजा पहात बसला आहेना ? अरेरे ! ! तर मग किती निष्ठुर तो! किती दुष्ट ! नव्हे, नव्हे, सुंदरी, हा तुझा पक्षपात. हें तुझें कौतुक ! अहा ! चंद्रप्रभेनें, या दिनकरास, कीं जो अन्य पदार्थास न भुलतां भुलविणारा (प्रकाशमान करणारा) त्यासच मोहून टाकिलें तें यथार्थतच आहे; कारण ज्या प्रभेस तेजोनिधीनें पलमात्र देखील दूर केलें नाहीं अशा सुखकराशीं तिच्यानें त्याच्याविरुद्ध आचरण कसें करवेल ? तेव्हां दिनकरानेंही संकोचवृत्ति परित्यागून सखीस (प्रभेस) अंगीकारावें हें उचित. मग—

## दिंडी

उभयपक्षीं अनुराग समचि जेथें ॥
प्रेमभावाशीं, वाण काय तेथें ? ॥
सुखानंदानें, वास तयीं केला ॥
सद्विचारें पाहिजे म्हणीजेला ॥ १ ॥

सुंदरी गे, धन्य तूं ! तुजकडे लक्ष वेधून तुझी कींव येते; पण काय करूं ? तुझ्या सुकुमार गोंडस हस्तास किती श्रम पडताहेत हे ? कोण जाणे पाठही ठणकत असेल! कमरेस तिडका लागल्या असतील ! सारांश सवय नसल्याकारणानें शरीरास आयास पडतआहेत ! मुखचर्येवरून तूं भिडस्त व लाजाळू आहेस हें मी जाणतों, कारण तुझे अनुपमेय गाल पहा कसे तांबूस वर्णी दिसताहेत, तथापि सुचविशील तर फार काय सांगूं तुला सहाय्य करण्यास हा मी सिद्ध आहें. ( बोलण्याचा ताळच सोडला असें वाटून सर्व उद्गार आटोपून ) धन्य इची मातापितरें कीं ज्यांच्या कुशीं या मनमोहिनीनें (मनमोहून टाक-

णारी) जन्म घेतलें! (मनांत संशय येऊन) असो; ईश्वरेच्छा! "दिनकरा, तरुण, समवयस्क एकाद्या स्त्रीपुरुषांचा जोडा जसा रंग रूपानें पाहणारास आल्हादकारक दिसतो तसाच ह्रिच्या विवाहानें, ईश्वरकृपेनें जोडा बनल्यास तूं शोभणार आहेस" इतकें सुचवून ही कोण व कोठील वगैरे त्यांचा विश्वनाथ नामें एका गृहस्थापासून चांगला खुलासा काढून दिवाकर मित्रास म्हणाला, "तूं म्हटल्याप्रमाणें ही पद्मलोचना येथील, विद्या, विनय व नीतिसंपन्न लोकप्रिय अशा, मागें एकदां उन्हाळ्यांत आपले गांवीं आलेल्या शिवरामपंत मामलेदाराचीच कन्या होय; यांत मुळींच संशय नाहीं, व तूं नुकतेच उच्चारलिले तरंगही समयोचित असून, तसेंच घडो एवढेंच सध्यां इच्छितों; परंतु एकदां घडघडलेलें हरएक कृत्य—मग तें सोपें किंवा कठीण असो पूर्व ताक्यास येण्यास प्रयास पडतात हें तूं खचीत समज. तेव्हांच तुझा विवाह होता तर आज किती आनंदांत असतास बरें! शिवरामपंतास हें एकच रत्न असून त्यांतून गुणी, चतुर व ज्ञानी असल्यामुळें सर्वांस प्रियकर झालें आहे व मातापितरादिक तर हीस गळ्यांतील ताईत लेखिताहेत म्हणतात. कांहीं असो; ह्या चारुगात्रेशीं विवाह होणें म्हणजे सुकृतसंचय असलाच पाहिजे त्याविण ही अपेक्षा दारिद्र्यानें अतिशय पिडलेला कंगाल, ज्यास एक दिनसुद्धां कंठण्याचें मुष्कील, अशा असमर्थ याचकास जसा राज्यपदाभिलाष किंवा धनिक होण्याची स्वच्छ इच्छा, त्याप्रमाणें होय." अशा प्रकारें एकमेकांस आपलें गूज विदित करीत आहेत तों त्या सुकुमारीची दृष्टि दिनकरावर गेली

## साकया.

समयीं एकाचि प्रेमपूर हा, विलोकितां त्या दाटे ॥
होतें सार्थक या जन्माचें, कैसें ऐसें वाटे ॥ १ ॥

आयां जातां ना तरि मग हें, व्यर्थ किहो मत्प्राणा ॥

देऊं पूर्वी ज्यातें केली, तोची मम प्रियराणा ॥ २ ॥

धांव विभो तूं तव कन्येचा, मानस पूर्ण करीं तूं ॥
जेवीं शुंडा माझी पळव, दे करित फळानें तूं ॥ ३ ॥

मित्रहो, तीन वर्षांपूर्वी चैत्र वैशाखाचे सुमारास शिवरामपंत व त्यांचे मित्र आपल्या परिवारासह महाबळेश्वर मुक्कामीं कांहीं दिवस राहण्यास गेले असतां तेथें दिनकर आणि दिवाकर यांचे पूर्व ओळखीनें त्यांच्या घरीं बसण्या उठण्यानें त्यांच्याशीं बरेंच संघट्टण पडलें. त्यामुळें, घरीं बसून चैन पडेनासें झालें ह्मणजे दोनप्रहरीं ते तिकडे जात असत. तेव्हां कृशोदरी व तिची मैत्रीण यमनी यांस प्रत्यहन् अवलोकन करून व त्यांचें मर्यादशीळ रसाळ बोलणें चालणें, धैर्य, बळ, चातुर्य व विद्येंतप्रवीणता तशीच सुंदर कांति पाहून तर एकदां त्यांचे मनीं यांच्याशीं आपला विवाह व्हावा असेंही आलें होतें; परंतु लोकलज्जेस्तव तसें सांगतां येईना ह्मणून त्यांनीं आपला तो हेतु कोणासही प्रगट केला नव्हता. पुढें शिवरामपंत व गणेशपंत खोत यांनींही आपल्या आवडत्या मुली त्यांसच देण्याविषयींचें थोडें बहुत कांहीं त्यांच्या पित्यांस सुचविलें होतें; परंतु त्यांचें तेथून नाइलाजानें सरकारी कामाकरितां तातडतोब निघणें आय पडून त्याविषयींची अधिक वाटाघाट न होतां तें कार्य तसेंच कुजत पडलें. हेंच शेवटीं दुर्धर यातायातीस कारणीभूत झालें.

कृशोदरीनें दिनकररावांस मध्यें तीन वर्षांचा मोठा काळ लोटला होता तरी पण ओळखून यांच्याविषयींच आपणास पित्यानें विचारिलें होतें हें आठवतांच आनंदभरतें आलें. हस्तांचा व्यापार स्थिरावला. मनांत विचारतरंग एकामागून एक असे उठूं लागले, आणि ह्मणूं लागली, "हे दयाघन! येथें येण्याची बुद्धि होऊन एथल्या गायगारियांस संतुष्ट केलें ह्मणून तूं मजवर प्रसन्न तर नसाशील ना झालास? काय या तरुणाचें रूप! त्यावरून माझें सौंदर्य ओवाळून टाकावें. मुख तेजःपुंज! कांति मनोहर!! व गुणही तसेच

आहेत हें मी जाणतें. दयानिधे! तुला नाक घाशियें, यावेळेस मज दीनाची तुला करुणा येऊं दे! कोण जाणे कदाचित् तुला माझें भाषण ऐकूं जात नसेल असाही संशय येतो; कारण मजसारखे अन्य दुःखित प्राणी तुझा धांवा करीत असतील आणि तिकडे तुझे कर्ण असतील किंवा तिकडे गेल्यानें मज दीनाची विनवणी निष्कामी होणार. पण असेंही ह्मणतां येत नाहीं; कारण तूं ब्रह्मांडनायक असून या बृहत् (मोठें) जगडंबामध्यें सर्वव्यापकत्व रूपानें पूर्ण आनंद स्वरूपीं भरलेला आहेस; तेव्हां विश्वांतील क्षुल्लक प्राण्यापासून तों थोर विवेकशक्तीनें भरलेल्या मानवापर्यंत तुझी दृष्टि पोहोंचत नसेल असें कसें ह्मणावें?

तर हे प्रभो! या लीन झालेल्या प्राण्याकडे लक्ष देऊन मनोवासनारूपी आड, जो मनेच्छित हेतु सफल न होऊन त्या निराशेनें संतप्त झालेल्या या शरीराच्या तापानें शुष्क पडून आंतील जलचरें तळमळताहेत त्यांस आपल्या करुणारूपी वर्षावानें तुडुंब भरून देह सुखी व शांत करशील अशी तुझ्या पायांजवळ विनंती आहे, ती तूं अमान्य करून अनिष्टानर्थ लोटशील असें हे करुणासिंधो! मला वाटत नाहीं! पुढें तुझी इच्छा!! परमेश्वरा, तूं न्यायी व कृपाळू असल्या कारणानें कोणत्याही गोष्टीची मला वाण नाहीं, आणि सारें माझ्या मनोदयानुरूप आहे; पण एक होणें राहिलें आहे तें कोणचें ह्मणशील तर माझें अनुरूप असणार मला हा पति मिळूं दे! यांत अकटोविकट श्रम घेण्याचाही तुला नलगे. कारण तुझें इतकें साहाजिक सामर्थ्य आहे कीं, तूं घटकेंत रंकाचा राणा, राण्यास रंक, धनिकास निर्धन, व निर्धनाचा धनिक करशील!

रंकं करोसि राजानं, राजानं रंकमेव च।
धनिनं निर्धनं चैव, निर्धनं धनिनं तथा॥

विभो! महान् महान् तपस्वी, घोरारण्यांत तप करीत असता-

त, पण त्यांस तूं त्वरीत न पावतां अंत पाहतोस त्याप्रमाणें मला कसोटीस न लावितां झटूदिशीं अंतरलेला योग्य वर भेटविलास हा तुझा मजवर केवढा उपकार !! यावरून तुझी कृपा मज अनाथावर पूर्ण आहे ! व हा वर मिळेल किंवा कसें असा संदेहच उरला नाहीं. (सांबपिंडीस उद्देशून) हे भोलानाथ ! मनीं एक संशय उद्भवला आहे ! याचें लग्न झालें तर नसेलना? तसें असल्यास मग मी कितीही सुंदर असलें अथवा त्याच्या मनीं बिंबलें तरी काय फळ? देवा, माझें हें आयुष्य झुरणींत घालवूं नकोस ! (आनंदित होऊन आपणास लागून) ग कृशोदरी, तुझ्या हेतुरूपी वृक्षास कोमेजूं देऊं नकोस. कांहीं काळानें त्यास फळें येऊन तुझे मनोदय पूर्ण होतील. सर्व चिन्हांवरून याचें लग्न झालेलें नाहीं हें खास आहे. व हा त्याच खटपटींत आहे हें तूं ध्यानांत ठेव. मना ! भलभलते कुतर्क कां बरें घेतोस? स्थिर ऐस. (मनोवृत्ति बदलून) हे गिरिजारमणा ! यास प्रियकर म्हटल्यास दोष नाहींना? हे प्रियकरा ! आपला विवाह होणें आहे; पण आधींच तुला "प्रियकर" हें नांव दिलेंच. तें आतां माझ्यानें कालत्रयीं बदलवणार नाहीं. दुर्दैवें कांहीं विपरित घडल्यास अशाच स्थितींत आजन्म वास करीन; परंतु अन्यपुरुषाशीं जीव गेला तरी पाणिग्रहण करणार नाहीं, हा कृतसंकल्प ढळूं देणार नाहीं ! आईबापांनीं मारून कुटून त्या योजून ठेवलेल्या वराशीं लग्न करण्यासाठीं मंडपांत उभी राहविलें तरी तेथें भलतेंच एकादें विघ्न उपस्थित करून प्राणांस मुकेन; पण नको नको तो दुष्ट ! जे मुलीच्या योग्य इच्छेनुरूप वर्ततात तेच खरे मातापितर व त्याच खऱ्या मुली कीं, ज्या त्यांच्या योग्य आज्ञावलंबन करितात. बाकी सारें व्यर्थ ! ईश्वरा! पुनः मी कर जोडून विनवितें, ही तव कन्या तुजजवळ हट्ट घेत आहे, इचें कोड पुरविणार तूंच! (मुखाकडे न्याहाळून पाहून व आपण या प्रियकरापुढें तुच्छ आहों असें समजून) सूर्यतेजापुढें जसा, चंद्रप्रकाश फिका पडून तो दिपावतो तसें या मनोहराच्या तेजापुढें माझेंसौंदर्यरूपतेज लाजून

नाहींसें झालें आहे, किंवा खद्योतप्रकाश, रात्र असली तरच पडा-वयाचा, आणि जसें सूर्यनारायणानें एकदां आपलें मुख किंचित् बाहेर काढिलें किंवा काढीत आहे अशा अरुणोदयाचे समयीं त्याचीच प्रभा पडून सर्व जगत् प्रकाशित होतें त्याप्रमाणें मी केवळ खद्योत असून ह्या मनमोहनरूपीदिनकराच्या प्रभेपुढें माझी प्रभा दिपून, पशूंचा पति जो सिंह यास जशीं इतर जनावरें पाहून भयभीत होत्सातीं पळून जावींत अशी ती कंपीत होऊन तिनें पलायमान केलें ह्मटल्यासही शोभेल. अशा ह्या सुंदर कोमल सद्गुणी पुरुषा तुझें आगमन येथें कोणतें कारण योजून झालें असावें बरें! हे जगन्नि-यंत्या विश्वंभरा ! अन्य पुरुष, मग तो या माझ्या प्रियकरापेक्षां दश-गुणित कां सुंदर किंवा ज्ञानी असेना, तो अतःपर वरणार नाहीं हा निश्चय केला आहे, येवढ्याचें मात्र विस्मरण न होऊं देतां ह्या करद्वय जोडून केलेल्या प्रार्थनेकडे अवधान देऊन प्रियकराच्या म-नांत मजविषयीं सुविचार येतील असें कर,''

याप्रकारच्या विचारांत पिंडीवर बेलाचीं पानें टाकीत खालीं मान करून वक्रदृष्टीनें ती दिनकराकडे आधून मधून अवलोकन करीत बसली आहे, दिनकर हा हलन चलन न करतां व डोळ्याचीं पानेंही जसें कांहीं तितका वेळ व्यर्थच जाईल समजून तिचें सौंदर्य टक लावून पान करीत आहे इतक्यांत अनेशा पोटीं बराच वेळ पावे-तों अनवाणीं उन्हांत हिंडून तेथलें तें तप्त किरण पुनः मस्तकावर घेतल्यामळें अकस्मात चक्कर येऊन खालीं पडणार तों एका सदय-ह्रदयाच्या मनुष्यानें त्यास सांवरून भिंतीशीं उभा केला आहे, पित्त खवळून त्याचें डोकें भणाणून चक्कर आलेली असल्यामुळें डोळे मि-टलेलेच आहेत, मित्राची विलक्षणस्थिति पाहून दिवाकराच्या मनांत विचारा मागून विचार येताहेत, विश्वनाथराव नावाचे गृहस्थ दिनकर-रावाच्या डाव्याबाजूस किंचित् नंदीजवळ उभे आहेत, मनुष्यांची ठि-कठिकाणीं गर्दी जमली आहे, अशा समयीं, तेथील रस्त्यानें जोडी-नें जाणाऱ्या एका पारशी गृहस्थाची व ख्रिस्तिअनाची नेमकीच

दिनकराकडे दृष्टि जाऊन पारशानें “ ताया ए क्या छे !” असें ह्मणतांच ख्रिस्तीयनास येथें आपण कांहीं टोल करून मजा उडवावी असें वाटून त्यानें आपली हातभर उंच असलेली टोपी डोईवर नीट बसवून कमरेवर डावा हात टेकिला, रुमालानें तोंड पुसलें आणि मिशा व दाढीवर हात फिरवून ह्मणाला “होय, खरोखरीच हे बुवा डोळे मिटून ध्यानस्थ होऊन आराधना करीत आहेत: पहा हे किती अज्ञानी ते! कीं, यांचे स्वप्नीं खरें, निर्मल ज्ञान सुद्धां असूं नये! ज्या ईश्वरानें, आपणास या शोभिवंत जगतावर निर्माण करून, पशुपक्षी आपल्या सेवेस लाविले, वनस्पतिजन्य औषधी आपल्या पोषणार्थ उद्भविल्या, जो आपलें सदोदित संरक्षण करितो, ज्याचें राज्य सदा सुखाचें व शांतीचें, व जो सर्वांहून थोर व नित्य, त्या कनवाळू पित्यास विसरून अशा ध्यानधारणेंत .दिवस लोटणें, अशांस कसें रुचकर वाटत असेल तें वाटो. यावरून मला तर असें वाटतें कीं, या लोकांस तारणोपाय तो काय याचा मोठा भ्रम आहे.

हें बुद्ध्या काढलेलें खुसपट पाहून त्या पारशास गम्मत वाटली, आणि लोक तटस्थ उभे राहिलेले विलोकून त्याच्या मित्राशीं बोलण्याची तेथल्या कोणाचीही प्राज्ञा.लागत नाहीं समजून त्यानें टाळ्या ठोकल्या. त्यांतच “टाम्चा, पला टुमी, पला आटां” या शब्दांची एकच कुई करून तेथें हसेंच माजविलें, आणि त्या हशांत घमेंडीनें “मुरख लोकना शाहाल थाय छे, तेनो पाको अने पुरो अनुभव ए पाद्री साहेबोने मळ्यो छे; तमे मोज, शोख अने उडालुपणमा मात्र पेहेले नंबरे पोहोंचे छे. तेवुंज तमारा लोकमां पाद्रीओने साथे लडवानी हिंमत छेज नहीं. जमवाने वखते तमे धीर बतावशो अने ते परमाणे बने छे पण खरूं. शरम छे के, बे शब्द बोलिने, जे ए (ख्रिस्तीयनाकडेस बोट दाखवून) गल्लीमां तमारी रेवडो करे छे, एटलुज नहीं, तो हसे छे, तेओने जरजर करशो ए कोइओ दाडे थवानुं मुस्कील, माटे गधडों तमारा करता वधारूं एमा शक नथी. अने ए बधुं फळ शानुं? तो अज्ञाननुं कहेवाय.” वगैरे

तऱ्हेनें मनास वाटेल तसें अद्वातद्वा भकून जवळील एका गृहस्थाकडेस धिःकारयुक्त हस्तचिन्ह करून त्यास "खी खी खी" असें हसूं लागला.

ही याची कुचेष्टा व ख्रिस्तीयनाच्या मुखांतील मित्रास उद्देशून आलेलीं मौक्तिकवाक्यें ऐकून आपण ज्ञानाभरणांनीं कितपत अलंकृत आहों याची प्रत्यक्ष खात्री करून देऊन यांचे दांत यांचेच घशांत घालून यांस पिटळवावें असें विश्वनाथरावांचे मनांत आलें. त्याप्रमाणें ते, कोपाग्नीनें संतप्त झालेले असल्यामुळें, दांत ओठ चावून ह्मणाले "अरे कोठवर तुझ्या या वाक्चातुर्यांत तथ्यांश आहे हें मीं जाणिलें. शिवाय तुझें या स्थलीं कांहीं बोलण्याचें प्रयोजन नसतां थोरवी मिळविण्याच्या उद्योगास व्यर्थ प्रवृत्त होऊन उलट आपलें अज्ञान मात्र दाखविलेंस.. अरे,

## श्लोक

काकस्य गात्रं यदि कांचनस्य । माणिक्यरत्नं यदि चंचुदेशे ॥
एकैकपक्षे ग्रथितं मणीनां । तथापि काको न तु राजहंसः॥ १ ॥

## आर्या गीति

काधीं या काकखगाचें, झालें त्या साम्य हंसरायाशीं ॥
क्षुल्लक मर्कट याची, नोहे तुलना कदापि सिंहाशीं ॥ १ ॥
ज्ञान अमोघ जयिं वसे, तेथें ना साम्य कवण पावेल ॥
विशाल तरूच्या मस्तकिं, लतिकाजाया न कधिहि साधेल ॥ २ ॥
ऐसें असतां त्रारे, करण्या वटवट उगाच तूं बघशी ॥
योगें या देहातें, निंदक ह्मणुनी त्वळेच वदवीशी ॥ ३ ॥
असदनुरोधक रोपण भाषण थोरा कळोनिया आलें ॥
ज्ञानी त्यास गणावें, मीपण ज्याचें विरोनियां गेलें ॥ ४ ॥

ते पाश्चिमात्य बुधही, अनुभव घेउनि स्वतांस हो वदती ॥
कीं, वैदिकरीती ह्या, अत्युत्तम पद धरावया जाती ॥५॥
विस्मय प्रगट करीति, ह्मणती आणि धन्य धन्य ही भूमी ॥
जीच्या उदरीं गवसे, ज्ञान पहातां अतीव हें नामी ॥ ६ ॥

या विश्वनाथरावाच्या भाषणाकडे त्या ख्रिस्तीयनानें बिलकूल लक्ष दिलें नाहीं. उलटा त्यास अधिक चेत येऊन तो भाषेची अशुद्धता न होण्याकडे वाकबगारी ठेवून ह्मणाला पंत, बडबड करण्यांत अर्थ नाहीं, व आह्मास आपण कितीही शब्दांनीं हाणलें; तथापि साताचे सत्तरपट अनुपकाऱ्यावर क्षमा करावी असें आमच्या शास्त्रांत आहे. त्याबद्दल सांगावयाचें कांहीं नसून आपल्या भक्तांचेच आपणास दोन चुटके बोलून दाखवितों ते ऐकून घ्याल अशी आशा करितों, त्यावरून त्यांचा उपदेश आह्मा सारखाच असून त्यांच्या आणि तुमच्या समजांत किती जमीनअस्मानाचें अंतर आहे तें साहजिक कळून येईल. तुमचे तुकारामबोवा ह्मणतातः—

## अभंग.

शक्ति ह्याची देवा ॥ नाहीं पार्थीवाची सेवा ॥
मुख्य आहे ऐसा धर्म ॥ जाणते हो, जाणा वर्म ॥ १ ॥

---

कोरे नाटवीशी कृपाळू देवाशीं ॥ पोशितो जगाशीं एकलाचि ॥ १ ॥
फुटे तरूवर उष्णकाळमासीं ॥ जीवन तयाशीं कोण घाली ॥ २ ॥
कोणीं केली बाळा दुग्धाची उत्पत्ती॥ वाढवी श्रीपती सवें दोन्हीं॥३॥
तुका ह्मणे त्याचें नांव विश्वंभर ॥ करा निरंतर ध्यान त्याचें ॥ ४ ॥

कबीर सांगतात——

दोहरा— साहेबका घर दूर है, जैसी पेंड खजूर ॥
चडे सो प्रेमरस चाखे, गिरेसोहो चकनाचूर ॥ १ ॥

असे तुमचे कवि तुह्मांस उपदेशीत असतां त्यांच्या बोलण्या-

कडे आणि आमच्या उपदेशांकडे चित्त न देतां, वेड्यासारखे तळ-मळतां हें फार वाईट.

दिवाकर हा आपल्या मित्राच्या गडबडींत असल्यामुळें याचें ह्या संवादाकडे मुळीं कान नव्हते तो, दिनकर पूर्वस्थितीप्रत येऊन आपणास केव्हां या हशापासून दूर करितो, याची मार्ग-प्रतीक्षा करीत होता; परंतु जेव्हां याचे कानीं त्या पात्रानें गाइलेल्या कविता आल्या, तेव्हां चटकन् मागें वळून पाहीलें, तों पांच पन्नास लोकांची गर्दी जमून थट्टा मस्करीची रेलचेल उडाली आहे, असें नजरेस आलें. तेव्हां विश्वनाथरावापाशीं तिचें कारण वगैरे सर्व विचारून घेऊन ह्मणाला "काय ह्या लोकांनीं आरंभ केला आहे तरी ! थट्टेखोराचे नादीं लागून सर्वांनीं थट्टेबाज होऊन लोकलज्जा गुंडाळून जाहिररीत्या कुचेष्टेस प्रवर्तावें हा केवढा मूर्खपणा ! त्यांत या बुवानें काढलेल्या कुरापतीचें आह्मांस नवल वाटतें. ना ओळख ना संघट्टण, अशा परकीय स्थळीं कांहीं तरी बोलूं लागून लोकांस विनाकारण त्रास देणें हें मौर्ख्य नव्हे काय ? न्यायदृष्टीनें पाहतां याचें हें करणें शोचनीय आहे. यास वाटत असेल कीं, आमचें शास्त्र ह्मटलें ह्मणजे असंभवनीय कथांचेंच स्थान असून आंत निर्मळ लेखांचा वानवाच असेल; पण असें यानें समजूं नये, आमचा वेदो-क्तधर्म अति मधुर, प्रिय व ज्ञानप्रकाशक असून याच्या वक्तृत्वास भुलून, सत्य मार्ग सोडून असन्मार्गास जाऊं हो अशाच नको; व त्या तेजोन्वित सत्यप्रकाशांत ईश्वर अगम्य; पण ज्ञानचक्षूनीं लक्षांत येणारा, निरंजन, निर्विकार, निरवयव, जगत्चालक व---

भूजलतेजसमीरख रविशशिकाष्टादिकीं असे भरला ॥
स्थिरचर व्यापुनि अवघें जगदात्मा तो दशांगुलें उरला॥१॥ धुंडिराज

असा ऋषिमुनीनीं वर्णिलेला असून कृष्णादिकांस तद्वत् कां मानितो याचा अर्थ निराळा आहे, आणि ह्मणूनच याचें (हात पुढें करून) तुला आश्चर्य वाटून खुसपट काढून वादास तयार झालास

हें मी जाणून, तो गूढार्थ तुला समजावितों त्याचा खोल विचार करून बडबड करणें सोडशील, तर त्यांत तुझेंच हित होईल हें पक्कें समज. अरे, प्राचीनकाळीं या भरतखंडांत महान् पराक्रमी, थोर, दैवशाली, अगाधज्ञानी, परमेश्वरज्ञ असे अनेक पुरुष विख्यात होऊन गेले. त्यांचें जनांवरील प्रेम, त्यांचें सदय अंतःकरण, त्यांचा निराभिमान, त्यांची सत्यनिष्ठ वागणूक आदिकांची पुढील होणाऱ्या संततीस स्मृति राहून त्यांचे अमूल्य, अतुल, नरदेह धन्य करविणारे गुण उचलण्याची व तसें सुवर्तन ठेवण्याची आकांक्षा उत्पन्न व्हावी म्हणून चतुर, तर्कज्ञ पुरुषांनीं मोठ्या प्रयासानें अकटो विकट ग्रंथ समुदाय लिहून ठेविल्यानें जन त्यापासून आपला अर्थ साधिताहेत, आणि अज्ञान मंदमतीस तो समजणें अशक्य, तेंव्हां "ईश" ही वस्तु काय आहे याचा बोध होणें दूर म्हणूनच प्रत्यक्षरीत्या त्या त्या थोर पुरुषांस विलोकून त्यांच्या सुवर्तनाचें निदर्शन करविणाऱ्या व त्यायोगें सद्गुणांचें स्मरण हरघडी त्यांच्या हृदयांवर उमटविणाऱ्या ह्या प्रतिमा करविण्याचा प्रघात पडून यथामति ते सद्वर्तनास उद्युक्त होतात ह्या तशांस अल्प लाभ कां होईना, तुझ्या लक्षांत कसा आला नाहीं याचें मला आश्चर्य वाटतें. आतां जड किंवा शून्यमति नसून, कांहीं उपदेशद्वारा किंवा सत्संग या योगें, मन सुप्रकाशित होत व झालेलें असतांही शून्यमतिनाम, अज्ञानाचार विलोकनानें किंवा श्रेष्ठांस तुच्छ व पराङ्मुख झालेल्या त्या नाशकारक गर्वोक्तीनें, प्रिय समजून तें पदवळचें पण आनंदानें स्वतांस जोडून त्या ज्ञानविमुक्त निर्बुद्ध प्राण्याच्या रितीभातीसच चाहणें व तसें स्वाचरण ठेवणें हें मनुष्यपणास योग्य नव्हे हें आह्मीहि जाणत आहों. परंतु -

पूजाकोटिसमं स्तोत्रं स्तोत्रकोटिसमो जपः
जपकोटिसमं ध्यानं ध्यानकोटिसमो लयः ॥ १ ॥

अशी ध्यानवृत्ति उत्तम गणलेली असतां तीस नुकतेंच दूषित

केलेस हें तुला उचित नव्हतें. बाबारे, तुझ्या सारख्यांनीं या सम जुतीबद्दल आह्मांस शिकवावें त्यापेक्षां हा प्रयत्न येथल्याच साधुवृंदांनीं केल्यास तोच शोभला जाणार आहे; कारण त्यांस त्यांच्या देशाच्या आचार विचाराचें जितकें विशेष ज्ञान असावयाचें तितकें कमीही तुह्मांस नसणार हें उघड आहे, याकरितां ज्यांत आपण अपक्व तसल्या फंदांत त्यानें पडूं नये हें फार चांगलें. येवढ्यावरून सुजाणत्यांचें वर्म निराळेंच आहे हें तुझ्या लक्षांत येऊन चुकलेंच असेल.

अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यंते माम बुद्धयः ॥
परंभावमजानंतो ममाऽव्ययमनुत्तमम् ॥ १ ॥

भावार्थ– "माझा उत्कृष्ट मनोभाव न उमजतां जन, अव्यक्त जें तें व्यक्त झालें कसें असें ह्मणून मला ओळखत नाहींत" ही गीतेंत उक्ति आहे. येथें थोडा विचार करशील तर खरोखर ह्या मार्मिक भाषणाचें तुला महादाश्चर्य वाटेल. पुढें असें आहे कीं,–

नाहं प्रकाशःसर्वस्य योगमाया समावृतः ॥
मूढोऽयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम् ॥ १ ॥

भावार्थ– "योग मायेचें वेष्टन असल्या कारणानें मी सर्वांस प्रगट नाहीं व मी अज ह्मणजे जन्म घेत नसून व माझा कधींही नाश होत नसतां मला मूढ ओळखत नाहींत" हें गंभीर व खोल कथन आपण न जाणतां त्याचा भलतेच ठिकाणीं आरोप करून चिचका करून सोडतां आणि तशानें तुह्मी चकतां हें अक्षरशः सत्य आहे. आणखी.—

अहमात्मागुडाकेश सर्व भूताशयस्थितः ॥
अहमादिश्चमध्यंच भूतानामंतएवच ॥ १ ॥

भावार्थ- "मी जो गूढ आत्मा, तो सर्वांचे शरीरीं असून मजपासूनच त्यांचा आदि, मध्य व अंतही आहे। ह्मणजे मीच त्यांस

निर्माण कर्ता तारता व लयकर्ता " तेव्हां किती सोज्वळ व अनुभवशीर ज्ञान हें !

असे जे सन्मार्गोपदेशक, सच्चिदानंदपदीं रममाण, जे सभोंवतालच्या जनसमूहास त्याच स्थलीं नेण्यास झटणारे, ज्ञानदर्शक, तारक, ज्यांची परोपकारबुद्धि थोर, ज्यांचा पराक्रम अचाट, ज्यांचें ज्ञान अगाध अशा सत्पुरुषांस ज्ञात्यांनीं ईश्वर ही फक्त उपमाच दिली आहे असें समज. बाकी अज्ञानजनांस हा मार्ग श्रेयस्कर असून स्वबलानें जस जसे ते ज्ञानप्रकाशांत सरकतात तसतसे उत्तरोत्तर ज्ञानमार्ग हा त्यांस हितावह व शांतिकारक होतो यांत संशय नाहीं. ज्ञानी मात्र ह्मणवितां परंतु इतका बारीक विचार करून तुह्मी अर्थ शोधितां कोठें ? वाक्पांडित्य करणाऱ्याच्या जिव्हेवर सरस्वतीच अवतीर्ण झाली आहे ह्मटल्यानें तीच मूर्तिमंत उभी ठाकलेली असते असें नव्हे. त्याचप्रमाणें अतोनात द्रव्यभांडार असलेल्या पुरुषास कुबेर, दुष्टास राक्षस, उदार मनुष्यास कर्ण अशी त्या त्या व्यक्तीस नामें दिल्यानें प्रत्यक्ष त्या नामधारणकर्त्याचाच बोध होतो असें होत नाहीं. याच रीतीनें अशा थोर व्यक्तीस ईश्वर समजण्यानें ते—

## शार्दूलविक्रीडित.

जो या भूमितलावरी वसतसे तैसाच चोंहीकडे ॥
आकाशीं गगनीं वया जगतलीं सर्वत्रही तो दडे ॥
तैसें हें सगळें जगद्भुवन गा दृष्टीस ज्याच्या पडे ॥
ऐसा हा परमेश सूक्ष्म तरि जो ना लिप्त कार्यांपुढें ॥ १ ॥

हा व ज्याची करणी विचित्र, जो सदा ऐश्वर्यवान् व अखिल जगताचा नायक, चालक व पालक जगत्प्रभु होत नाहींत. हें वर्म तुला कथिलें खरें; परंतु तुमचाही भोळसरपणा, आमची चमत्कृत स्थिति पाहून जितकें तुह्मांस आश्चर्य वाटावें त्याजपेक्षां अधिक आमच्या नवलास कारणीभूत होतो, कारण तुझ्या शास्त्रांतच कित्येक

ठिकाणीं असा विसंगतपणा अढळांत येतो कीं, त्या योगें त्या ग्रंथांत खरें ज्ञान आहे असें माझ्यानें तर ह्मणवत नाहीं. हें तुला तें लक्षपूर्वक विलोकनांतीं समजून उमजावें एवढ्याच हेतूनें कळविलें. तूं ह्मणशील असा गोंधळ तुमच्या ग्रंथांतरींहि आढळत असतां तुमची तरी मग एवढी शेखी काय ह्मणून? तर असें जर पूर्वींच तुला तुझ्या समजाप्रमाणें माहीत होतें तर व्यर्थ कारणाशिवाय आपलेंच घोडें पुढें ढकलून आह्मांस दांत कां वेरें दाखविलेत! तर मग हा तुझा खरोखरीच मूर्खपणा ह्मटला पाहिजे. आतां तुझ्या अल्प समजुतीप्रमाणें तूं आमच्या सर्व ग्रंथास एकसारखी ' अज्ञानमूलक ' ही संज्ञा देत असशील; परंतु ती विशोभित असून उलटें तुझें अज्ञान मात्र अधिक परिस्फुट होतें. कारण आमच्या सोज्वल व अज्ञानतिमिरनाशक ग्रंथभांडारविलोकनानें मानव जगाचें विस्मरण पावून व त्याचें अंतःकरण आल्हादित होऊन जगत्पित्याचें प्रेम व अलोट कृत्य पूर्णपणें कळून येतें! ही केवढी थोरवी!! काय हें सामर्थ्य!!! असो; एवढें पुरे ( थांबून ) अहाहा! शाबास आमच्या बादशाहीण सरकारची! कीं जीनें अठराशें अठ्ठावन्न सालच्या बस्ताद नानाच्या वेळीं असें उघड प्रदर्शित केलें कीं आह्मांस पर राज्याची भूक नसून आह्मी कोणाही धर्मांत हात घालणार नाहीं व आडही येणार नाहीं. अरे " यथा राजा तथा प्रजा " असें असतें तर तुझें हें आरंभलेलें कृत्य उचित होतें. पण स्थिति तशी नसतां मूर्खत्वानें परधर्मांत दूषणीय शब्द काढण्यास कां बरें धजतोस? पहा! व्हिक्टोरिया महाराणी किती नीतिवंत, सुविचारी व दयाळू त्या! सुविचार असल्याविना परधर्मांत हात घालूं नये हें त्यांस कोठचें सुचतें? असो; आमच्या राणी साहेबांचें अंतःकरण असेंच निष्कपटी राहून सदासर्वकाळ ईश्वर कल्याण करो.

( ख्रिस्तीयन आणखी कांहीं बडबड करीत आहे पाहून किंचित् क्लेश आल्यासारखें करून ) आतां, अरे, मूढा, गाईनें दयार्द्रता येण्यासाठीं जरी आपली मान व्याघ्रापुढें दिली तथापि तो तें

कांहीं न समजतां व मनांत विषादही वाटूं न देतां तिजवर अविचार क्रूरतेनें स्वैर साधण्यासाठीं झडप घालून तत्काल तिचा कंठ फोडून रक्त घटघटां प्राशन करील, तद्वत तूं अविचारी शार्दूल होय. तुजजवळ मी कितीही नीतीनें वागलों, तरी हे बुद्धिभ्रष्टा, तुझी नष्ट बुद्धि नाहींशी न होतां गव्हारासारखाच अनीतीनें पुनः वर्तशील. मूर्खा ! तूं मूर्खत्वाचा ध्वज उभारून 'शहाणा, शहाणा' अशी द्वाही फिरवून आत्मीय कार्य साधण्यासाठीं डौल मिरवितोस, परंतु त्या शहाणपणाचा केव्हां नाश होऊन विधाता तुझा विध्वंस करून या जगतांतून प्रयाण करवील याचा क्षणभरही विश्वास नाहीं. हे मनुष्या. तूं सद्धर्मास आपल्या वक्रोक्तीनें विटंबना करूं पाहतोस याचें कारण तुझ्या अंगीं ज्ञानदीप्ति नाहीं हें होय, आणि त्या योगें मतिमंदरूपीअज्ञानमयकोठडींत दैनवाणा पडला आहेस. तेथून मुक्त होण्याकरितां तुझ्याकडून होईल तितका यत्न करीत आहेस; परंतु कुमार्गवर्ती वाटाड्या असल्याकारणानें, उदधीस जशी मृत्तिकाबंधन असमर्थ, तसे ते व्यर्थ होत. एकंदरीत तूं जरी हालाहल संपादित मानवदेहधारी विषारी सर्प आहेस आणि तुझें संरक्षण करूं नये हें जरी रास्त, तथापि जो ज्ञानी, त्यास विष व अमृत दोन्ही समान. याकरितां तुजसारख्या प्राण्यास ज्ञानमार्गास वळविणें हें त्यास उचित, ह्मणून तुला मी द्वैतभावानें न सांगतां रासभाचे जे रस्त्यामधील सूर काढण्याचे गुण ते मी वर्जण्यास सांगतों; कारण त्यायोगें विनाकारण मात्र त्रास होतो. आतां, ते कोणते ह्मणशील तर, ज्ञानी लोकांकडे अवधान न देतां व आपलें वर्म न समजतां उगाच उद्धट भाषण करणें हें अभिमानहीनतेचें कर्म आहे तें तुझ्या भव्यशा मुखास शोभत नाहीं. अरे अविचारसागरांत बुडणाऱ्या प्राण्या, आजपासून तरी भ्रांतिरहित होऊन माझ्या विचाररूपी नौकेंत बसून तडीस येऊन नीट वर्तनक्रम ठेव, आणि गध्या प्रमाणें, तारतम्यरहीत, ज्यांत हशील पाहूं गेलें असतां काडीचें सुद्धां नाहीं, मात्र उदासीनता प्राप्त करविणारा असा तुझा वाद इतःपर

वर्ज करून कोठेंही उपस्थित करूं नकोस.

याप्रमाणें नानाप्रकारें काळीज विदारणाऱ्या अशा हृदयभेदक मार्मिक शब्दांनीं ताडण होऊन त्याचें मुख म्लान व काळें ठिक्कर पडून आपल्या मानाची आज भरलोकांत हानि झाली व व्यर्थ आपण या शततूर्ख परशाच्या नादीं लागून येथपर्यंत आलों, हा विचार मनांत येऊन तो आपला तिरस्कार करूं लागला.

याचे जोडीदार पारशी गृहस्थ अजून पावेतों निमूट राहून वरील भाषण ऐकत होते; परंतु जेव्हां मित्राचें मुख फिकट झालेलें त्याच्या आढळांत आलें, तेव्हां त्यानें हळूच त्यास येथें अधिक वेळ न राहतां थोडें दूर जाऊन तेथें उभें राहण्याची इशारत केली. त्याप्रमाणें ते तेथून निघून जवळच पण एका आडोशाचे जागीं जाऊन उभे राहिले. तें स्थलांतर पाहून तेथील लोकांस, यांची कांहीं वेगळीच मसलत असेल असें वाटून, आश्चर्य व भीतीनें गांठिलें. त्यामुळें जरा कांहीं खुस्स होतांच टुणकन उडी मारणाऱ्या भित्र्याचें तोंडचें पाणी पळून त्यांनीं तर तेथून पळ काढिला. कित्येक इतके कांहीं गलितदेह झाले कीं, कोणत्या रस्त्यानें पळावें हें कांहीं केल्या त्यांस उमजेना. ही विलक्षण मौज विश्वनाथपंत दिनकर रावाच्या डावे बाजूस नदीजवळ उभे राहून पहातच होते. त्यानां लोकांच्या या भित्रेपणाचें मोठें आश्चर्य वाटलें. त्यानीं त्या पाद्र्याचें त्याच्या मित्रासह उभें राहण्याचें कारण केव्हांच जाणिलें होतें ह्मणून व दिवाकर हे एके ठिकाणीं प्रतिपादनांत किंचित् घसरल्यामुळें तोच ग्रह श्रोतृमंडळीचा होतो कीं काय याची तळमळ लागून चैन पडेना ह्मणून त्यांचे मनांत त्यास सांवरून घ्यावें असें आलें, आणि तत्क्षणीं गडबडींत चुकीनें राहिलेली ती दोषव्याप्ति व्यक्त करून येथें आपण संशयवेष्टित झालां हें गौणत्वास कारण झालें असें बोलून हिरमुसलें तोंड केलें. तरी आनंदवृत्ति समूळ नाहींशी होऊं न देतां ह्मणाले " आह्मी अज्ञ आहों असें नव्हे, आह्मी जाणत आहों कीं, ' यद्दृष्टंतन्नष्टं ' या न्यायानें पाहतां जेवढें दृश्य तेवढें नष्ट व्हावयाचें.

च; परंतु ईश सदा ऐश्वर्यानें युक्त व अविनाशी असून रामदास ह्मणतात—

## अभंग

अंत नाहीं तो अनंत, त्यास दोरी करी भ्रांत ॥ १ ॥
ऐसें जनाचें करणें, कैसा संसार तरणें ॥ २ ॥
देव व्यापक सर्वांसी, त्यासी ह्मणती एकदेशी ॥ ३ ॥
रामदासीं देवपूर्ण, त्यासी ह्मणती अपूर्ण ॥ ४ ॥

कबीर ह्मणून कोणी भक्त होऊन गेला आहे. (पारशाकडेस बोट करून) या बुवाच्या त्या मित्रानें ह्मटलेला दोहरा तो याचाच. तो ईश्वरास आळविस असतां त्यास उद्देशून असें ह्मणतो कीं. पद—

मैगुलाम मै गुलाम तेरा ॥ तुम साहेब मेरा ॥ ध्रु ॥
रूप नहीं रंग नहीं नहीं बरनछाया, निराकार
निर्गुन तुम रघुराया ॥ मैगुलाम ०
मेहरबान मेहरबान मेहरककरो मेरी ॥ दास
कबीर खडानजर देखतेरी ॥ मैगुलाम०

## श्लोक ( भुजंगप्रयात )

फुटेना तुटेना कदा देवराणा ॥ चळेना ढळेना कदा दैन्यवाणा ॥
कळेना वळेना कदा लोचनासीं ॥ असेना दिसेना जना मीपणासीं ॥
जया मानला देव तो पूजिताहे ॥ परी देव शोधून कोणी न पाहे ॥
जगीं पाहतां देव कोट्यानु कोटी॥जया मानली भक्ति जे तेचि मोठी॥
तिन्ही लोक जेथून निर्माण झाले ॥ तया देवरायास कोणी न बोले ॥
जगीं थोरला देव तो चोरलासे ॥ गुरूवीण तो सर्वथा हीन दीसे ॥ २

ह्मणून कोणी केशवसंत दयाघनापाशीं असें मागतात कीं, हे हरे,

इतुकें दे मजला दे मजला ॥ मागतसें हरि तुजला ॥ध्रु० ॥
संतसमागम अर्चा ॥ सारासारज्ञानचर्चा ॥ १ ॥ इ०

तसेंच अमृतराय ह्मणतातः— पद

संतपदाची जोड ॥ दे हरि संत पदाची जोड ॥ ध्रु०

संतसमागमें आत्मत्वाचा ॥ सुंदर उगवे मोड ॥ दे० ॥

खरें आहे कीं, संतसमागम घडल्याविना आपल्या असत् कल्पना कधींही उडून जावयाच्या नाहींत, व हा मार्ग ईश्वरसान्निध्य पावविण्यास सवळ साधन असून सर्वांनीं इकडे व अशा दुसऱ्या सन्मार्गाकडेस दुर्लक्ष करणें प्रशस्त नव्हे, आणि या हयगयीमुळेंच आह्मी परद्वीपस्थांच्या थट्टेस व हास्यास कारणीभूत होऊन गेलों आहोंत; तथापि आमचे सत्पुरूष इतके दूरदर्शी व तत्वज्ञाते होऊन गेले आहेत कीं, त्यांचे आज आह्मांसच नव्हे, पण जगतांतील उच्च स्थितीप्रत पावलेल्या राष्ट्रांमधील विद्वानांस देखिल नवल व भूषण वाटत आहे.

मयाततमिदं सर्वं जगदव्यक्त मूर्तिना ॥
मत्स्थानि सर्व भूतानि नचाहंते ष्वास्थितः ॥ १ ॥
यथा काशास्थितो नित्यं वायुः सर्वत्र गोमहान ॥
तथा सर्वाणि भूतानिमत्स्थानित्युपधारय ॥ २ ॥

हेंच पहा आमच्या महान पुरूषाचें अंतर्गर्भित वचन अनिर्वाच्य अर्थगांभीर्यानें युक्त असून किती ज्ञानबोधक आहे तें! अशांचा आह्मांस अभिमान कां असूं नये! आणखी पहा—

सर्वतःपाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरो मुखम् ॥
सर्वतःश्रुतिमल्लोके सर्वमावृत्यतिष्ठति ॥ १ ॥

---

नित्यं ब्रह्म निराभासं निर्गुणं बोधयेत्परं ॥
शिष्यं पूर्णं निराकारं दीपो दीपांतरं यथा ॥ १ ॥

## शालिनी

एको देवःसर्वभूतेषु गूढः । सर्वव्यापी सर्वभूतांतरात्मा ॥
सर्वाध्यक्षः सर्वभूताधिवास । साक्षीचेता केवलो निर्गुणश्च ॥१॥

मंदाक्रांता— ब्रह्मानंदं परमसुखदं केवलंज्ञानमूर्तिं ॥
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यं ॥
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतं ॥
भवातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥ १ ॥

तेव्हां एकंदरींत श्रेष्ठ हेंच कीं—

वरिष्टं सर्व धर्मेभ्यो ज्ञानं मोक्षैकसाधनं ॥
नास्तिज्ञानात्परो धर्म इति वेदार्थनिर्णयः ॥ १ ॥

हें व एतद्विषयींचें आणखी कथनामृत पानकरून पाद्री साहेबास य अमूल्य ज्ञानाचें आश्चर्य वाटून त्यानें तोंडांत बोटच घातलें. त्यास पूर्वी, आपण येथें खेरच विजयी होऊं असें वाटलें होतें. ती घमेंडी आतां सर्व नाहींशी होऊन या पंतापुढें आपली डाळ शिजावयाची नाहीं हेंही पूर्णपणें जाणिलें, आणि ह्मणून तेथें ते अधिक वेळ उभे न राहतां त्यांनीं दुःखानें मोठ्या सडकेची वाट पकडली.

ती पाद्री साहेबांची जातेसमयींची दुःखित मुद्रा व त्यांचें पलायन पाहून दिवाकरास संतोष झाला. त्यास विश्वनाथपंत हे इतपत ज्ञाते असतील असें वाटलें नव्हतें. मुखस्तंभ राहून सहजावृत्त्या ज्ञानाज्ञान करून यावयाचें नाहींच. परंतु अवचित त्यांचीं तीं, ज्ञान भाण्डारांतील बोधक वाक्यें ऐकून एक स्थलशिवाय करून आपलें सारें भाषण यांस ग्राह्य झालें ह्मणून फार आनंद वाटला. ते ह्मणाले "शास्त्रीबोवा, आपण जाणते आहां, तेव्हां जाणत असालच कीं. मनास अस्वास्थ्य असलें ह्मणजे असें कधीं कधीं होतें; तथापि तेंही एकपक्षीं थोडें ठीक झालें असें आमच्या अनुमतानें, आह्मांस वाटतें. आणि एकपक्षीं जरी आंत गोम ठेविली, तरी अशानें धरसोडपणाचा दोष येऊं पहातो हें खरें आहे, आणि तसें करूंही नये हें योग्य". "समजलों आपण मानवाचें इहलोकींचें कर्तव्य चांगलें जाणत असून विचारी आहां. याकरितां याविषयीं अधिक परिस्फुटता करण्याचे भरीस न पडतां आपण 'आमचें तें आमचें ह्मणून सत्य, आणि अन्याचें असत्य' अशा हट्टास न पेटून आमचें यथार्थ सूचविणें मान्य

केलें हें पाहून अत्यानंद होतो, व असेंच आपण व आपल्या सभोंत,लचे हे लोक,

पद

'नरतनु हें नव्हे साच भ्रमतां कशाला ॥ ध्रु० ॥
नूतन संपत्तिविकार ॥ धरुनि फार अहंकार ॥
करुनी कनकअलंकार ॥ वोढिती दुशाला ॥ नर०
नाथ भुजंग ह्मणे उपाय ॥ धरारे सद्गुरुचे पाय ॥
सकळ साधती उपाय ॥ भेटा जगदीशाला ॥ नर०

हें भुजंगनाथाचें व

अभंग

' सद्गुरुवांचोनी सांपडेना सोय ॥ धरावे तेपाय आधीं आधीं ॥ १ ॥
आपणासारिखे करिती तत्काळ॥ नाहीं काळवेळ मग त्यांसी' ॥ २

हें तुकोबाचें कवन लक्षांत धरून तसे या जगीं रहाण्याची सबळ इच्छा धरोत इतकेंच सध्यां इच्छितों " असें ह्मणून तेथेंच उभे राहिले

इकडे पाव एक घटिकेनें सांबपूजन आटोपल्यावर भटजीबोवाचे हातावर दक्षणा टेवून कृशोदरी पुढील मंडपांत येऊन प्रिय सखीशीं जणुं कांहीं बोलणार, अशा भावानें उभी आहे, इतक्यांत दिनकररावास आलेली चक्कर नाहींशी होऊन साफ डोळे उघडून तो आपण आहों कोठें ह्मणून जवळपास पाहूं लागला. तेव्हां ती कृशोदरी लज्जित होत्साती किंचित् हास्यमुद्रेनें आपणाकडे चोरदृष्टि फेकिन, सखीस उगाच कांहीं तरी सांगण्याचें मिष करून, पहात आहे, विलोकून इचें प्रेम आपणावर पूर्ण व शाश्वतीचें आहे जाणून त्यास महदानंद झाला, आणि जों जों तो तिजकडे टक लावून तिची मूर्ति हृदयांत उठवी तों तों त्यास आनंदलहरि अधिकाधिक उचंबळून तो विचारसागरांत गटांगळ्या खाऊन भ्रमिष्ट होऊन जाण्याचीच वेळ येऊन पडे. तिनें वारंवार वक्रदृष्टीनें त्याजकडे पाहवे, क्षणांत स्मित वदन करून दुःखचिन्हें दर्शवावीं, तितक्यांत आनंद झाल्यासारखें दाखवावें, पुनः गालांतले गालांत हसावें, तों तों त्यास आनंदभरते येऊन ' हे सिंहकटे चारुगात्रे तुजशीं दोन शब्द

घेऊन तुजसवें तुझ्या प्रियाकडे येण्यास मी आनंदी आहें; परंतु तसें केल्यानें जन मला मूर्ख, स्त्रीलंपट ह्मणून तुझे आप्तइष्ट मला अल्पबुद्धि लेखतील, याकरितां तसें करवत नाहीं, येथें माझा नाइलाज आहे !" असेंच जणुं त्याचे नेत्र खुणावीत आहेत असेंच दिसावेत. मग ती मानाविकासिनी जेव्हां तेथून हळुहळूं जाऊं लागली, त्या वेळेस त्याचा जीव थोडथोडा होण्यास लागून केव्हां तो उभयपक्षांस अभिनंदनीय होऊन मातापितरांस घोरचिंतेंतून पार पाडितो असें त्यास झालें. शेवटीं ती दृष्टिआड होतांच दुरावलेलें रत्न आपणास लाभणें दुरापास्त वाटून तो दिन त्यास केवळ उदास असा भासूं लागला.

कृशोदरीस तर हें दिनकररावाचें आगमन झालेल्या दुःखाग्नीवर घृताभिषेकवत् होऊन तें पीडक झालें. त्यावेळीं तीस त्यांचें अनायासें येणें झालें त्याचें वर्तमान आपल्या पित्यास परिश्रुत करवून जवळ येऊन ठेपलेल्या दुःखाचें झाल्यास निरोचन करावें असें वाटलें, तों दुसरा निराळाच विकल्प येऊन अशानें आपण लोकथट्टेस पात्र होऊं असें वाटून ती चिंताग्रस्त झाली. शहाणे, सुरते तशांत गर्भश्रीमंत ह्या दिनकरास, त्यांच्यापित्यादशीं, देण्याविषयींचा वाङ्निश्चय होऊन तिथि वगैरे ठरली असतांहि त्याचें विस्मरण पावूं देऊन तिच्या पित्याच्या नूतन प्रयोजित वराची मूर्ति डोळ्यांसमोर येऊन तीस तो मृत्यूच आपणाकडे टवकारून पहात आहे असें वाटलें. त्यासरसें तिचें तें टवटवीत असलेलें चंद्रवदन खरदिशीं निस्तेज व चिंतातुर झालें असें दिसून आलें. दिनकर योग्यायोग्य स्थळ जाणत असल्याकारणानें फारशी चुटपुट करीत न बसतां उद्योगांतीं आपल्या हरएक इच्छा सिद्धी न जातात असें जाणून त्यानें आपलें समाधान केलें; क्षणभरानें, शिवरामपंत आटवणीचे पुरे असून त्यांचेकडून हा विश्वासघात सहसा व्हावयाचा नाहीं वगैरे विचार येऊन त्याचे आनंदास पूर आला, व मुखास तेज चढून चंद्रोदयानें जसें चंद्रविकासिनी कमल प्रफुल्लित व तेजोयु-

क्त होऊन डुलण्यास लागतें तीच अवस्था आपल्या दिनकररावाची झाली नाहीं तों पुनः पित्तमहाराजांनीं कडावयाची उसाळी मारून त्यांस बेशुद्ध करून सोडिलें.

ही पित्तव्यथा दिवाकरास कळून न येतां प्रेमरूपशस्त्रच याजवर सुटून त्यानेंच यास बद्ध करून पिसें लावून सोडिलें कीं काय? आणि न जाणो दैवशात् तसें झाल्यास मग यास उपाय तो कोणता वगैरे संशय येऊन हा भ्रमविमुक्त आहे किंवा कसें हें जाणण्याकरितां व असल्यास स्वस्थळीं निघण्याची वेळ समीप आली, हें सुचविण्याकरितां दिवाकरानें "दिनकरा, काय हें! अरे, जनाची तरी लज्जा ठेव! स्वानुभव प्रगल्भ नसल्यानें आपलें कृत्य आपणास नामी दिसेल हें खरें; पण तेंच चार चौघां सुज्ञापुढें आल्यानें कदाचित् हास्योत्पादक होतें, ह्मणून हरएक प्रकरणीं चालणें तें आपण विचारपूर्वक चालविलें पाहिजे, हें तूं जाणत असतां काय हें आरंभिलें!" एवढेंच ह्मटलें. पण त्यावेळीं त्यास कसचें उत्तर देववतें! तेंव्हां प्रेमबंधनानें याचें मन मोहून टाकिलें, आणि त्यामुळेंच त्या तरंगांत निमग्न होऊन हा गुंगावला आहे, अशी दिवाकराची खात्री झाली. तितक्यांत दुसरे कांहीं संशय येऊन ह्मणतो.—पद

बारे सख्या मजशीं, कां रुसलाशी ॥
नाचरितां मी, तव अन्याया ॥ ध्रु०
मेळति सारे, जन या ठायां ॥
निंदति तुजला, तव देहा या ॥ बारे०
प्रवर्तले ते, कुटिलचि वाया ॥
गालिप्रदानें, ताडिति वायां ॥ बारे०
हे परमेशा, नमितों पाया ॥
अलक्ष्य नोदे, पुत्राशीं या ॥ बारे०

अर्धीच लोक तंटा बखेडा पाहण्यास तत्पर. त्यांत हा तेथें एका घटकेंत बनलेला प्रकार! मग काय पहावयाचें! त्यांची ती मौज पाहण्यासाठीं ही दाटी होऊन "कायहो काय झालें" असें चोहोंक-

डून शब्द उठूं लागले. ज्यांचा दिवाकरासारिखाच समज होऊन ज्यांस चौकशीअंतींही तसेंच करून आलें, त्यांस तर एकसारखें हसेंच लोटलें! कित्येक "वहावा! काय शोभा ही! आजचा दिवस कोणता! आणि ह्या पुरुषास वेड लागलें आहे कसचें! बरोबर कलियुगाचा प्रतापच आहे असा! तेव्हां यांचेकडे दोष कोणता! तरी तें नुकतेंच सुरू झालें आहे एवढ्यांत इतके चमत्कार! मग पुढें हा कलि राक्षस आह्मा गरिबांवर किती कहर करून कोणत्या प्रकारें छळील व संहार कशा रीतीनें होऊन लय कसा करील, तें भगवान् जाणे." या प्रमाणें व कित्येक "कायहो. लोक किती विलक्षण ते पहा! कांहीं ही होवो, कोणास वेड लागो, कोणी अविचारी निपजोत, कोणी नट नटांशीं संगें आणून वेडे चाळे करोत सर्वांस, कांहीं समजेनासें होऊन सारे गुंग झाली ह्मणजे "चुकला घाव हरणाचे माथ्यावर" याप्रमाणें "कलीचे हे प्रताप!" असें आपलें साफ उत्तर, आपण बोलतो काय, इकडे बिलकूल लक्ष न देतां, देऊन चुकवयाचें. मग त्यांच्या त्या एकाच मालिकेंत गोवण्यामध्यें तथ्यांश असो नसो, त्याजबद्दल विचार करतो कोण! तर्क बांधावयाचा तो तरी सयुक्तिक असावा, तर तसेंही नसून मन मानेल तसें भकण्यांत काय शहाणपण असेल तें असो. कलिकाळ लागल्यामुळें मनुष्यास बुद्धिभ्रंश होतो, तर अर्थात भ्रंशसूत्र मनुष्याचे हातीं नसून तो कळसूत्री बाहुल्याप्रमाणें राहून कलि तसें करवितो हें उघड समजलें पाहिजे, आणि असें असेल तर हा दोष मनुष्यास देण्यापेक्षां काळास देणें योग्य; परंतु हेंही ह्मणणें विपरित दिसणार आहे. आतां हे बुवा प्रीतिपाशांत सांपडून मानसिक व्यथेत पडलेले असोत किंवा ही पीडा प्राप्त होण्यास शारीरिक व्यथा कारण होवो, त्याविषयीं बोलवत नाहीं; कारण यांची गुरुचर्या हे इतके वेडगळ असतील असें दर्शवित नसून संभावित असावेत असें दिसून आणितें ह्मणून वेड्यासारखें यास दूषण देतां येत नाहीं. तरी लोकवार्तेवरून— ती (वार्ता) खरी किंवा खोटी हे माझ्यानें सांगवत नाहीं, परंतु हे मोहपाशबद्ध होऊन गुंगाव—

आहेत असें समजून तो समज क्षणएक सत्य कल्पिला, तथापि त्या-करितांच ज्ञान शून्योक्तीनें दहा पांचांत हांसणें आणि आपली शोभा करून दाखविणें निर्लज्जपणाचें काम असून अनुचित होय, हसणारेच उद्यां अशाच एकाद्या सपाऱ्यांत सांपडणार नाहींत कशावरून? आणि तसें झालें असतां मग दुसऱ्यांच्या हास्योत्पादक कृति त्यास सहन करवतील काय? निःसंशय करवणार नाहींत. अहो, रीतच आहे कीं, जो तो लोकांत किंवा घरीं देखील कांहीं सांगते समयीं स्वतांस नावाजून दुसऱ्यास दोष देतो. ते इतरांच्या डोळ्यांतील कुसळ काढितात, परंतु ढळढळीत दिसणारें आपल्या डोळ्यांमधील त्यांच्यानें काढवत नाहीं ही शरमेची गोष्ट. याकरितां प्रांजल अंतःकरणानें अगोदर आपण किती कडकडीत पुरुष असून, किती सोज्वल आचरणें आपणाकडून घडतात, इकडे लक्ष पोहोंचवून नंतर आपली वर्तणूक दुसऱ्यास आतां उदाहरणास योग्य असें पटल्यास, तसें करण्यास जाण्यांत मोठें हित आहे. नुसत्या तोंडानें भकण्यांत अर्थ नाहीं "बोल बोलता ते सोपे, कराणिकरितां टीरि कांपे" असें एका कवीनें ह्मटलें आहे; आणि खरोखर असें सुविचारी योजक जेव्हां आह्मांत निदान शेकड्यांत पांच निघतील, तेव्हांच तो सुदीन ह्मणावयाचा सारांश आपण स्वतः सुविचारांत अपक्व असतां तो पक्व समजून दुसऱ्यास हासणें हें अयोग्य. तसेंच कलि मातून तो सर्वांची बुद्धि भ्रष्ट करून टाकील, असें ज्या कवीनें ह्मटलें त्यांतील अर्थ खोल असून त्याबद्दल सारासार विचार न करतां त्या कलीस सपाऱ्यासरसें राक्षस रूप देऊन वेडें वांकडे बडबडल्यानें आपण सुज्ञ जनांत अविचारी मात्र ठरत आहों दुसरें कांहीं नाहीं. "स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः" यांतील 'स्व' या शब्दाचा अर्थ जसा गूढ, त्याच प्रकारें त्यांचे (कविवरांचे) अलंकारयुक्त भाषण असतें, त्याचा आपण नीट विचार केला पाहिजे. कलि ह्मणून कोणी व्यक्ति आहे, व ती आपली विवेकशक्ति हरण करते असें नव्हे; तर आपण व आपणास अविचारें हवें तसें बनूं दतों, आणि

त्यापासून घडणारा जो परिणाम तोच काले (अस्वास्थ्य। मग या देहास शांतता न देतां अस्थिरता उत्पन्न करतो, त्यामुळें आपली अतोनात हानि होते, असा आपण हा काव्यालंकार समजणें बरा. "मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयो:" ह्मणजे मन हेंच मनुष्याच्या, बंधास व मोक्षास कारणीभूत होतें, आणि असें आपण प्रत्यक्ष अनुभवांतीं पहात आहों, तर हा कलिकाळ आपणास अयोग्य आचरणाप्रत नेतो, हें भाषण केवळ अज्ञानपणाचें आहे. कारण तो कोणी देहधारी प्रबल शत्रु पशू किंवा मनमोहक वस्तुही नव्हे कीं तिकडेमनाचें आकर्षण होईल. फक्त, जशीं प्रत्येक संवत्सरास विभव शुक्ल, प्रमोद, राक्षस, दुर्मति, क्षय इत्यादिक कालप्रदर्शक हीं वेगवेगळालीं नांवें, तसें तें कालबोधक नाम दिलेलें आहे. प्रमोद संवत्सरास सर्वत्र आनंदघोष चालला होता, राक्षस संवत्सरीं घरोघरीं दुष्ट निपजले होते, दुर्मतींत सारे मतिमंद झाले आणि क्षय संवत्सर सुरू होतांच सर्वांचा लय झाला, असें कांहीं नाहीं. तथापि हा काळ आपणास दुर्मार्गास नेतो ह्मणावें तर ह्यांत कांहीं अचाट शक्ति आहे असा संशय उठतो; व हें ग्राह्य केल्यास जगन्नियंत्याकडेस त्या पक्षपाताचा दोष येतो हें कसें? कारण तो जर सर्वांचा पिता असून न्यायी व निष्पक्षपाती आहे, तर त्याजकडून अन्यायी व पक्षपाती कामें कधीं व्हावयाचीं नाहींत. दहा पांच किंवा अर्ध अधिक मनुष्यांस त्याच्या करणीप्रमाणें शिक्षा मिळण्याकरितां तो युगसूत्रच बदलवून ठेवील, आणि तशानें सर्वांस अल्पमति करून त्यांच्याकडून दुर्वर्तनें करवील, ही समजूत व्यर्थ आहे. युगसूत्रच जर बदलविलें आहे, तर ह्या कलींतच ज्ञानेश्वरादिकांसारखे अनेक सत्पुरुष विख्यात होऊन गेले व आज ही अनेक आहेत. यावरून ह्या काळानें, सर्वांस सर्व साधारणपणें अन्याय मार्गास न्यावें असें असतां तसें करण्यास त्यास शक्ति नाहीं, असें कोणीही ह्मणेल. मागील कृत, त्रेता आणि द्वापार हीं युगें अनीतीपासून केवळ दूर होतीं, आणि हें युग अनीतीचें केवळ माहेरघरच झालें आहे असें कोणाच्यानेंही ह्मणवणार नाहीं. पूर्व

युगें जशीं बन्या वाईटांनीं युक्त होतीं तसेंच हें आहे. किंबहुना जेवढीं अघोर कृत्यें त्या युगीं घडत होतीं तेवढीं आजहोत नाहींत ह्मटलें असतां चालेल. इतकें मात्र खरें आहे कीं, पूर्वीं जशीं रणधुरंधर, स्वदेशाभिमानी वगैरे मनुष्यें असत तशीं या काळीं नाहींत, तेवढ्या वरून हा काळ अधर्माचा झाला किंवा कसें याचा विचार ज्ञात्यांनीं करावा. जेथें गांव ह्मणून आहे, तेथें म्हारवडा असणारच. म्हारवडा असल्यामुळें गांव नाहीं असें समजणें योग्य होणार नाहीं. बोलाव-याचें इतकेंच कीं. "बाबावाक्यं प्रमाणं" असें समजून खोल विचार-तळीं न जातां व त्यायोगें ज्योतिषादि शास्त्रें एकीकडेस गुंडाळून ठेवून त्याफलज्योतिषानुरूप काळ आपणास पीडा करितात वगैरे अचाट तर्क भर रस्त्यांत काढणें कांहीं धोक्याचें आहे. याकरितां प्रत्येक सत्य विचारानें चालेल तरच त्याचा हरएक संबंधी विजय होऊन तो आप-ल्या बंधुवर्गांत इष्टचिंतक होईल" असें आणि कांहीं दुसऱ्या प्रकारें बोलून आपापल्या वाटेनें जाऊं लागले.

तितक्या अवकाशांत दिवाकराकडून दिनकरास पुष्कळ उपाय व यत्न ताळ्यावर आणण्याकरितां झाले; परंतु त्या उपाय औषधांनीं गुण न पडतां त्यास बळकट धरलेलें असतांही पित्त अधिकच खवळून वमन आल्यासारखें होऊन त्यानें त्या बेशुद्धींत स्वतांस असा कांहीं जोरानें झोंका दिला कीं, त्या योगें विश्वनाथरावाचे हातून त्या-चा हात निसटून तो तोल एका गरिबाचे अंगावर पडून त्या बि-चाऱ्याचें कोणी पागोटेंच, तो आपणास सावरित आहे तितक्यांत पसार केलें. असा हा एकच हलकल्लोळ उडाला असतां देवळा-मधील भटजी बाहेर येऊन त्यांनीं काय प्रकरण हें ?" ह्मणून बारीक स्वरानें एकास विचारिलें. तो मनुष्य तेथें नुकताच आलेला अ-सून सर्व हकीकत माहित नव्हती, तरीही लोकांचे उद्गाराव-रून त्यानें, आपला बांधलेला वेडा वांकडा तर्क, त्यास अ-शा कांहीं थाटानें सांगितला कीं, तो खोटा असें ह्मणवेना. त्यास हा त्या वयेचाच प्रताप असें वाटून ह्मणाले " शिकस्त

बुवा या मोहपाशाची ! कीं, ज्या पाशांत कोणी सांपडलें असतां त्याची दैना उडून जावयाची नाहीं असें सहसा व्हावयाचें नाहींच. शिवाय या योगानें तो प्राणी कोणत्या कुचेष्टेस पात्र होऊन पुढें काय काय चाळे करण्यास प्रवृत्त होईल याचें अनुमान सुद्धां होणें कठीण. इतकेंच नव्हे तर जखडून गेल्यामुळें तो कशी दुर्दशा करवून टाकील, हें सांगवत नाहीं. अशानें सर्व प्रकारें नुकसान होऊन धुळी-स मिळून जावें लागतें, आणि इतकें ही होऊन संपादन केलेली कीर्ति कीं होक्षणांत नाहींशी व्हावयाची! आणखी हा मोह रोगरूपी-काळ, या देहाचा कीं, ज्यास परमेश्वरास घडविण्यास महत्प्रयास पडून माता पितरांच्या उदरीं जन्मून ज्यांना दुखणें बाणें वगैरे अरिष्टें टा-ळण्याकरितां निद्रा व सुख यांचा त्याग करून अहोरात्र खपावें लागून अनेक संकटें भोगावीं लागलीं, त्यांची सेवा न घडतां व ई-श्वराचे उपकार न आठवतां, नाश करून थोड्याच काळांत यमाजी पंताकडेस हजिरी देण्यास पाठवून दुःसह यातनेंत पाडतो! अशा ह्या थोरल्या बुवास (हंसें येऊन) दुरूनच नमस्कार असो. मजवर ही प्रसंग येत होतो; परंतु शर्तीनेंच बचावलों समजतों, तेव्हां जो मान-व अशा अविचारांत शिरून आपल्या स्वतांस अविचारी ह्मणवितो, तो मानवी काया धरून व्यर्थ आपलें आयुष्य मात्र दवडितो असें ह्मणण्यास हरकत नाहीं. परंतु असें नहोण्याकडे जर त्यानें लक्ष पो-होंचविलें, तर तो स्तुतीस पात्र होईल. याकरितां मनुष्यांरे !

### शिखरिणी

उपाया घेई कीं, सदन कुजनाचे न बघवे ॥
विवेका ते नेती जिवन हरिती जेवि वणवे ॥
पशूपक्षी घेती वदानिं आपल्या रक्षक जरी ॥
ह्मणूनी व्यक्ति ह्या त्यजुन सुजनीं तूं मन धरी ॥ १ ॥

नंतर ते कांहींएक न बोलतां चालते झाले.

जसजसा दिवस चढूं लागून वेळ अधिकाधिक होऊं लागला

तों तों दिनकर पित्तव्यथेनें अधिक वेष्टित होऊन त्या वेदनेनें तो व्याकुळ होत चालला. दिवाकरानें नानातऱ्हा व उपचारही केले; परंतु तो कांहीं केल्या शुद्धीवर येईना. कानांत साधारणतः मोठ्यानें ओरडावें, अंगास गदगदां हालवावें; पण काय? सारें व्यर्थ. अशा समयीं जर का दिवाकर इतर मित्राप्रमाणें पाषाणहृदय करून, न कोणी आप्त, न कोणी मित्र अशा परदेशांत सोडून जाता, तर त्याचे हाल कुत्रेंही खातेना. कोणजाणे दुर्दशाही उडती! परंतु एकदां ज्या स्थलीं खरी प्रीति ह्मणून जडली, ती मग तेथून नाना उपायानें तरी नाहींशी व्हावयाची आहे काय? प्रेमभाव पाहिजे तो असाच! असा प्रेमभाव काय न करूं शकेल? जोंवर आपला स्वार्थ साधत आहे तोंवर तो साधून प्रसंगीं हळूच अंग काढून तोंड लपविणें हें तर मानवी प्राण्यास लज्जास्पद होय. असें झाल्यास श्वान आणि मानव यांत अंतर तें किती! श्वानास तुकडे मिळताहेत तों वरच तें भुभुःकार करीत राहून घरास घिरट्या मारीत पडेल; पण त्याचे एकदां वांदे पडल्यास जसें तें पळ काढितें, तशीं वर्तणूक उच्च, ज्ञानवान् मनुष्य प्राण्यांनीं, त्या ज्ञानाचा उपयोग न करतां, आचरावी हें किती निंद्य बरें? दिवाकरास तेथें मित्रत्वाच्या नात्यामुळें, लोक हंसे पाहून, पराकाष्ठेचें दुःख तर वाटलेंच, त्याहीपेक्षां अविचारी लोकांची थट्टा न साहतां त्यास त्यामुळें मरणापेक्षां मरण झालें. मित्रहो, सज्जनास एकवार मरण पत्करतें; परंतु जगांत राहून कीर्ति न संपादितां अपकीर्ति मिळवून नालस्ती त्यांस क्षणभर सुद्धां साहवणार नाहीं. हीच अवस्था आपल्या दिवाकराची झाली. आतां हा शुद्धीवर येत नाहीं आणि आणणें तर अवश्य आहे, या विचारांत दिवाकर असतां त्यास असें सुचलें कीं, एक गाडी पाहून तींत बसून येथून होईल तितक्या त्वरेनें बिऱ्हाड पकडावें ह्मणजे लवकर पोहोंचूं हें एक, व हीं मनुष्यें आपला पाठलाग करणार नाहींत हें दुसरें, अशी समयावच्छेदें दोन्हीं कार्यें साधतील. असें योजून त्यानें ज्याचे जवळ हारा असून भले लांब सुंभही होते, अशा एका गरीब मजुरदारास जवळ बोलावून

त्याला गाडी पाहून आणावयास सांगीतली.

इकडे पुनः ते पुजारीबोवा बाहेरील गोंधळाचें काय झालें हें जाणण्याच्या उद्देशानें नंदीजवळ येऊन पाहूं लागतात तों पूर्वीपेक्षां बरींच मनुष्यें जमून त्याच्या नाना चेष्टा चालल्या आहेत, उनाड पोरें केलस्यां प्रमाणें उड्या मारीत असून बीभत्सोच्चारणाचा गजर उडाला आहे असें दिसलें. त्यांत दूर उभे राहून अंग सांभाळून हळुच कळ लावणारे आपलीं डोकीं वारंवार वर उचलीत आहेत पाहून बोवास एका तऱ्हेनें वाईट वाटलें. तितक्यांत कोणा एकानें "कशी काय येथें मजा आहे भाऊ ?" असा त्याच्या मित्रास केले. ला प्रश्न त्यास ऐकूं येतांच " किती मूर्ख लोक हे ! कीं, दुःखद प्रसंग त्यांस आनंदोत्पादक दिसून यावा, आणि स्वतः थट्टेस उद्युक्त व्हावें ! तेव्हां किती हे शून्यमति ! हे आपले सारेच षंढ ना ? वः प्रतिकूळ काळ लोटला असतां तो बघावयास मात्र झुंड हो जमेल; पण नाहीं हो एकही कामास यावयाचा ! पहा आह्मी सर्व कसे बुळे झालों ते ! त्या बिचाऱ्यास नुसता हात तरी कोणी लावीत आहे काय ? खो, खो, खो, हंसताहेत बरीक. हाच प्रसंग एकाद्या पारशावर किंवा यवनधर्मी मनुष्यावर येऊन पडतां तर खरोखर मला खात्री आहे कीं एवढ्या दुःसह यातना त्यास काढाव्या लागत्याचना. अहो, काय त्या पारशांचा कट !! मुंबई शहरीं गुदस्तसालीं मुलास पोहोचाविण्यास गेलों होतों, तेव्हां एकादां कोणी बसला आहे रस्त्यांत आल्यागेल्यांचीं याचना करीत, असें दिसून आलें नाहीं हो ! केवढें हे त्याचें भाग्य ! आणि काय हा एकोपा !! नाहीं तर आह्मी धिक्कार असो आह्मांस ! आह्मा परस्परांत नर हें झोंबट, परवांच ह्या आमच्या शेजारच्या गांवांत मंत्रजागरांत आश्वलायन आणि हिरण्यकेशी या उभय शाखेंत, उपग्रंथाचे मंत्र ह्मणू नयेत ह्मणून जबरा तंटा होऊन व कैकदिवस निरनिराळे तटपडून त्यामुळें एकदाची सभा जमवून शेवटीं तें झोंबट मोडलें ! तेव्हां नुसते मंत्र ( श्लोक ) ह्मणण्यास कोणहा प्रतिबंध ! आणि कायहा अभिमान!!

यानेंचहो आह्मांस सर्वतोपरी नाडिलें, आणि अजूनही पुच्छ तो सोडित नाहीं ! ( उदासवृत्ति करून) पहावें काय होतें तें !! आणखी सगुण व निर्गुण याविषयीं वाद आहेच ! अशाठिकाणीं कोठून हा एकोपा घडावयाचा? कोणी ह्मणतात सगुण ह्मणजे ( बोठ सांब- पिंडीकडे करून ) असें. कोणी ह्मणतात चर्मचक्षूंस अदृश्य ह्मणून निर्गुण व ज्ञानचक्षूस दृश्य ह्मणून सगूण; ह्मणजे दृश्य अवयवाचा अभाव ह्मणून निर्गुण; परंतु त्या त्या अवयवांची शक्ति, अदृश्य तथापि त्यास आहे ह्मणून सगुण. यांतून दुसरें ह्मणणें जरी प्रस्तुत माझ्या आचरणाविरूद्ध आहे तरी तें सयुक्तिक असें कबूल केले पाहिजे; कारण सर्वमान्य वेदर्षि, उपनिषदकर्ते मुनि, पतंजलि, कणाद, गौतमादि ऋषि, शंकराचार्यादिक ब्रह्मवेत्ते सत्पुरुष, आणि तुकोबा, रामदास ज्ञानेश्वरादिक साधु व नारायणादिक संत हे बहुतांशीं जर त्यासच अनुसरताहेत तर आह्मांस दुसरा मार्गच नाहीं. असें आह्मांसारख्या दुसऱ्यास हें कोठून गोड लागावयाचें ? त्यांचा वर्तनक्रम आहे तो आहेच. लोकांचें तर राहूं द्या, मी ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी करितों मात्र हातून तसें आचरण झालें असेल तर परमात्म्याचीच शपथ. परंतु हें करणें अयोग्य व अति निंद्य हें खचीत. बोलण्याचें कारण इतकेंच कीं, जेथें असे प्रकार, तेथें तें ऐक्य ह्मणून दृष्टीस पडावयाचें नाहीं ! तेव्हां सहजच आह्मी असे दूर उभे राहून मौज पहात असणार ! आतां या बुवास मघांपासून ज्या ब्रह्मराक्षसानें झडपलें आहे असें मी समजतों, तो ह्या चालत असलेल्या पुळपुळीत उपायास दाद देईलसें वाटत नाहीं." असें गुणगुणत ते आपले नीट हातीं बिल्वांची परडी घेऊन, जवळील तळ्याचें कांठीं आले. तेथून वटवृक्षाखालीं असलेल्या बिल्वांच्या झाडांतून कांहीं पानें घेऊन परत येत असतां त्यास दिवाकरानें पाठविलेल्या हेलकऱ्याची अवचीत धक्की बसून बुवा धाडकन् जमिनीवर आदळले. आपल्या धांवत येण्यापासून घडलेला हा परिणाम पाहून त्या गरिबास पराकाष्ठेचें वाईट वाटलें. तो साशंकि-

त मुद्रेने त्याच्या समीप येऊन झालेल्या अपराधाचा क्षमा व्हावी असें सुचविण्याकरितां त्यानें त्यास मोठ्या अदबीनें प्रणाम केला. या त्याच्या सौम्यपणामुळें तो अपराधी असतांही त्यांस द्रव आला इतकेंच नव्हे, तर त्यानें त्याच्या सुजाणपणाची उलटी तेथल्या लोकांत वाहवा केली कीं, ज्यास शाळा ह्मणजे काय हे माहितही नसेल. ज्यास आपण व आपलें पोट हेंच कायतें माहित, नागर आणि बैल ही ज्याची संगत, जो सुज्ञांपासून दूर, व्यावहारिक ज्ञानही ज्याचें थोडें, अशा ह्या मनुष्यास जर एवढी समजूत तर जे मोठ मोठ्या पाठशाळांत शिकून हुशार झालेले, जगाशीं कर्तव्य कोणतें ह्मणून जाणणारे, उदीम व्यापार चालत असलेले ठिकाण ज्यांचें स्थान, चार चौघां शहाण्यांचा ज्यांस सहवास, अशांनीं केवळ्या मर्यादेनें, सहनशीलतेनें व विचारपूर्वक वागलें पाहिजे. असो; परंतु अशा ह्या गरिबास संस्कार, ज्ञान वगैरे प्राप्त होतें तर यास अज्ञ व जंगली ह्मण ण्याची कोणाची प्राज्ञा होती" इतकें ह्मणून ते निघून गेले.

तो गरीब बिचारा हेकलरी नंतर धन्याजवळ येऊन लीनपणें ह्मणाला, "दादा, ह्या गाडीचा खुपच तपास केला; दोनच्यार गल्याबी बगीतल्या. मंग येढोळ बगुनशान मनामंदी ह्मंगालों आनकीबी योकदा वाट पगावी; ह्मंगून हकड तकड पगीतल. पण दादा, काय ह्मंगू. हे पायच साक्षी बगा. गाडी कुट्टबी नाय, मला वाटटय ह्या शिरातर हाये, ह्मंगून शेनीतर त्या गवसत नसयाल्ना? ही हकीकत ऐकून घेऊन, लाल्च दाखविल्याशिवाय परिणाम नाहीं. कारण ' दाम करी काम ' पैसे मात्र जवळ पाहिजेत मग पाहिजे तें होऊं शकेल. असें जाणून त्यानें त्याचे मेहनतीबद्दल दोन एक पैसे देण्याकरितां त्यास जवळ बोलाविलें; परंतु तो कांहीं केल्या येईना. त्यास वाटलें कीं, या स्तब्ध राहिलेल्या बुवास पिशाच्यानें झडपलें असून तें, आपण सन्निध गेलों ह्मणजे त्याचें वरचें नाहींसें होऊन आपल्या बोकांडीस बसावें ह्या संकल्पानें हा बलावीत आहे दुसरें कांहीं नसावें. विश्वनाथरावानेंही त्याची बरीच समजूत केली-

तरीही त्याची खात्री होईना. मग थोडें थांबून त्यास "अरे मूर्खा, दोन पैसे कां जाऊं देतोस ? ते तरी कुठे आहेत ? पैसा किती म हाग होत चालला आहे हें तुला अडाण्याला काय माहित ! अरे चार पैसे हे एक वेळ तुझे पोट शांत तरी करतील. आणखी तूं देशावरचाच आहेस असें वाटतें. तेव्हां, तेथें अन्नपाण्यावांचून गतसालीं किती मनुष्यें मृत्यूच्या मुखांत पडलीं हें तूं प्रत्यक्ष बघितलें असशीलच. त्याचप्रमाणें सारा दिवस सक्त मेहनतीप्रमाणें उन्हांत तळमळत काम करून संध्याकाळीं केवढा मोठा रोजमुरा मिळे हेंही तुला माहीत असेल. भल्या माणसा, जा तीकडे जा " वगैरे ह्या प्रकारें दोन चांगल्या गोष्टी सांगितल्यावर त्यास वाईट वाटून त्याचे डोळे भरून आले, आणि त्या उकळींत तो मंगळवेढ्यानजीकच्या खेड्यांतला वतनदार असून दुष्काळप्रसंगीं त्याचे कसकसे हाल होऊन किती विपत्ति भोगावी लागली, आणि त्याप्रसंगीं सरकारानें कोणकोणतीं कामें सुरू करून गरिबांचे कोणत्या प्रकारे संरक्षण केलें. त्यांतच बाळीबा पाटलासारख्या दुष्ट पुरुषांनीं अन्नान्न करीत असलेल्या दीनाकडे दुर्लक्ष करून आपल्याच पोळीवर तूप ओढून शेवटीं कसकसे प्रकार झाले याविषयींचें संक्षिप्त निरूपण करून तो किंचित् स्तब्ध राहिला.

दिवाकर नंतर त्याचे समीप येऊन त्याचा हात धरून त्यास 'तूं' इतकें ह्मणून पुढें कांहीं सांगणार तो एका भल्यानें "अरे, सांभाळ ! मारील तो तुला. वेड्या पळ लौकर." अशी मोठ्यानें उगाच आपली ओरड केली. काय हें ! आणि काय ही गम्मत भर रस्त्यांत हितानहिताकडे लक्ष न देतां टवाळकी करणाऱ्यास कोण मूर्ख ह्मणणार नाहीं ! हा त्याचा एक खेळ झाला; पण त्या योगें दिवाकरास काय वाटलें असेल बरें ? तो हेलकरी तर ते भयप्रदर्शकशब्द ऐकतांच आपली पाटी सांवरून धापा टाकीत पळत सुटला तो मध्यें कोठें जवळ न खोळंबता बऱ्याच अंतरावर जाऊन तेथें कांपत उभा राहिला.

मित्रहो, अगोदर दुःखानें व्याप्त असून त्यांत आणखी हा पोरखेळ पाहून दिवाकरास कोठचा मी जिवंत राहिलों असें झालें. स्थळ व समय न पाहतां विनाकारण एकाद्यास त्रास देऊन त्यांत गौरव मानून घेणें या समजुतीस काय ह्मणावें हें त्यावेळीं त्यास कळेना. दिसण्यांत चांगले, सभ्य परंतु आचरणांतही तऱ्हा, अशा कुचीष्टांशीं बोलूं गेल्यास त्यास अब्रूची चाड नसल्यामुळें ते एकादे वेळीं याहीपेक्षां अधिक वेडेचाळेही करावयास चुकावयाचे नाहींत जाणून त्यास ती त्याची थट्टा कानावर घेववेना. तथापि अशांस त्यांच्या गैरवर्तनाबद्दल थोडें तरी बोलून पाहवें असें त्यास वाटे. शेवटीं, एकदांचा मनाचा धडा करून दिवाकर त्या कुचीष्ट मनुष्यास उद्देशून ह्मणाला "शहाण्या मनुष्यानें शहाणपण दूर फेंकून केवळ अडाणीपण स्वीकारणें हें त्यास लाजीरवाणें नव्हे काय? आणि संपादलेल्या शहाणपणाचा हाच उपयोगना? एकाद्यास विनाकारण पीडा देण्यांत हे काय भूषण मानीत असतील तें असो; परंतु हा अभ्यास यांस छीः थूः पर्यंत पोहोंचवील, याचा हे विचार करून उमजतील तर यांत यांचेंच कल्याण होणार आहे नाहीं तर प्रत्येक व्यक्ति आपापल्या बुद्ध्यनुसार निरनिराळे विचार करण्यास स्वतंत्र आहेच. फरक मिळून इतकाच कीं, जशी बुद्धि थोर तसे त्याचे विचारही थोर असावयाचे. अज्ञ पुरुष चौर्यास व अन्य दुराचरणासही प्रवर्तेल; परंतु सुज्ञ प्रौढ विचाराचें त्यास साह्य असल्यामुळें, त्यांसच अश्लाघ्य असें गणील. इतकें हें अंतर अज्ञ आणि सुज्ञ यांच्यांत असतें, आणि त्यामुळें ते प्रतिष्ठेस पात्र होतात ह्मणून तरी हे दुर्गुणप्रिय कुटिल आपलें कौटिल्य वर्ज करतील तर फार बरें होईल."

हें सयुक्तिक भाषण जे कोणी थोडे समजूतदार ह्मणून तेथें होते त्यांस रुचलें एवढेंच नव्हे तर त्यांनीं आपापल्या, असें नाहीं ह्मणून असमाधानवृत्तिही दाखविल्या.

इतक्या वेळांत तो भयानें पळालेला हेलकरी जमलेल्या मं-

डळींत येऊन उभा राहिला होता. त्याजकडेस दिवाकराची दृष्टि जाताच त्यास " वेड्यासारखें काय करतोस गाढव तर नाहींसना ? पण नाहीं. कान आंखूड आहेत. अरे तूं या विघ्नसंतोष्यांचें काय ऐकतोस " असें बोलून परत आणण्याचा बराच यत्न केला; तथापि डोक्यांत शिरलेलें भय त्यास फिरूं न देतां " मिळावयाचें असलें तर कुठेही मिळेल " असे शब्द उच्चारून तो बापुडा दीनवदनानें तेथून निघून गेला. ती त्याची निराशा झालेली पाहून गरिबाच्या पोटावर व्यर्थ पाय येऊन त्यास तळमळत जाणें भाग पडलें, हें दिवाकरास असंतोषकारक होऊन, असें होण्यास जो कारण झाला त्याच्या चमत्कृतीविषयीचें अति नवल वाटलें. आतां उपाय नाहीं. दुसरा कोणी एकादा पाहिलाच पाहिजे, आणि अशा चवाठ्यांत तिष्ठत राहणेंही प्रशस्त नव्हे, असें जाणून नंतर त्यानें तेथील एका गृहस्थास कृपा करून कोणी एक मनुष्य बलावून आणण्यास विनंती केली, पण काय! ती निष्फल झाली. तो तिरस्कारानें ह्मणाला, " सभ्यहो, माफ करा. तुमच्या नादीं कोणी लागावें. भला तर, तुमच्या थाऱ्यास ही उभा रहाणार नाहीं असें मला वाटतें. तुह्मीं येथें मरा किंवा पाहिजे तसें करानां. तुह्मां बरोबर आह्मांस काय करावयाचें आहे. अहो तुह्मी आमचे आप्तही नव्हेत किंवा कोणीही नव्हेत. आह्मी मजा आहे तोंपर्यंत उभे राहून ती पाहून नंतर चालते व्हावयाचे ह्या तपकरणाच्या नुवास तुह्मी पाहिजे तसें करा, आह्मांस तुमच्या ह्या धंद्यांत मुळींच पडावयाचें नाहीं. हेलकऱ्यास बोलवा रे, " त्यास इकडे आणारे इतकी धांवाधांव करण्यास सांगितलें आहे कोणीं ! येवढा खटाटोप करा कशाला ! "

हें कुत्सित व तारतम्य रहित भाषण ऐकून कित्येकांस आनंदभरतें आलें एवढेंच नव्हे तर कांहींकांनीं आपलीं आनंदप्रदर्शक चिन्हेंही दर्शविलीं. हा प्रकार दिवाकरास विलक्षण वाटून तो त्याजवर कांहीं बोलणार तों नूतन मित्रत्व जडलेले विश्वनाथ

राव ( ज्यांचें दुसरें नांव शास्त्रीबोवा ) पुढें होऊन किंचित् दीर्घ-स्वरानें ह्मणाले, " वहावाः काय मूर्खपणाचा बाजार हा ! आणि किती आपली ही स्वदेशबंधुप्रीति ! यामुळेंच हो आपली अशी दुर्दशा होऊन शेवटीं अन्नान्न करण्याची वेळ येऊन ठेपली आहे! कायहो, संकटांत पडलेल्या स्वदेशबांधवांस साह्य न करावें तर कोणास करावें ? ह्या स्वार्थबुद्धीनें पदोपदीं आपलीं किती अनहितें घडताहेत, हें तुला चिकित्सखोरास कोठून माहीत असणार ? अरे भरलोकांत वरील शब्दोच्चारण करण्यास तुला कांहीं तरी लज्जा वाटावयाची होती ! शहाण्या, तुझें मार्मिक भाषण या गृहस्थाचे जिव्हाळ्यास किती खोंचून याची काय अवस्था झाली असेल ! एकंदरींत तुझ्या चालचर्येवरून तूं पाषाणहृदयी असावास अशी माझी खात्री झाली, व इतकें हें ज्ञान शिकविणारा तुझा गुरु शतमूर्ख किंवा तुझ्या तुलाच तें महदायासें प्राप्त झालें असल्यास तूं शुद्ध अल्पमति प्राणी आहेस. आज तूं सुरक्षित येथें उभा होतास ह्मणून एवढी लटपट उडविलीस खरी; परंतु जरका तुजवर असाच प्रसंग कधींकाळीं आला, आणि तेव्हां, आह्मी तूं ह्मटलेंस तसें ह्मणालों असतों तर तें तुला सहन न होतां तूं दंडभेद करण्यासही मागें पुढें पहातासना, आणि त्यावेळीं संकटनाशनार्थ आह्मी न झटलों तर तेथें तुझ्या स्वतांच्यानें स्वतांस काय करवणार आहे.? मनुष्यारे, सांगतों हें उमज. या पंचभूतात्मक शरीराचा हस्तपादादिक अवयवांशीं जितका निकट संबंध आहे, तितकाच मनुष्याचा मनुष्यांशीं आहे. मुख ह्मणेल कीं, माझें अन्न सेवन करणें हे कर्तृत्व सिद्धीस न्यावयास हस्ताचें किंवा कोणाचेंही साह्य घेणें नलगे. माझ्या मला उचलण्याची, चावण्याची, पचविण्याची शक्ति आहे तर हें जसें अशक्य त्याचप्रमाणें एकटा मनुष्य हा कोणताही उद्योग करण्यास समर्थ नाहीं. त्यास साह्य ह्मणून घेतलें पाहिजेच, अर्थात् जन त्यास तें देतें. यावरून आप्त नव्हे त्यास तसें करूं नये हें ह्मणणें केवळ आज्ञानावस्थेंत गाढ निद्रिस्त आहेस

असे दर्शविते. विचार कर कीं, कांहीं, कारणांनीं तूं व्याथित झाल्यास, तत्क्षणीं औषधोपचार करण्यास धांवतोस, तर तेथें त्या वैद्यानें उपचार न केल्यास किंवा रोग परिहारार्थ कांहीं औषध न दिल्यास कसें होईल ? जेथें तूं राहतोस तें तुझें घर, पलंग, खुर्च्या, पाट, पेट्या, हडपे, मेज; तेथाल खिळे कोयते, चाकू, कातरी, सुऱ्या, किसण्या, खलबत्ते, हांडे, घागरी, पातेलीं, तपेलीं हीं स्वयंपाकाचीं भांडीं वगैरे निरनिराळ्या उपयुक्त जिन्नसाचे उत्पादक, तुझा हा विलक्षण ग्रह पाहून ते ते पदार्थ देण्यास नाकारिते, तर त्या विषयींचे तुझें बरेंच समाधान होतें. सारांश उपजिविकेकरितां अन्न, शरीराच्छादनार्थ वस्त्रप्रावर्ण, व मेघधारा सूर्यताप निवारणार्थ घरें दारें आयतीं स्वतांस साहाय्य असल्याविना मिळत नाहींत, याचें मनन करून आप्तासच मदत द्यावी ' हा जो तुझा दुर्बल, दांभिक पक्ष तो सोड, आणि सुबुद्धि धर. बाबा, या मनुष्यदेहानें परप्राण्या वर देखील होतील तितके उपकार करून सुकृत संपादून परलोकीं चिरकाळ सुख भोगावें, असें असतां पशुवत् बुद्धि कां बरें धरितोस ?

अष्टादशपुराणानि व्यासस्य वचनद्वयं ॥
परोपकाराय पुण्याय पापाय परपीडनं ॥ १ ॥

इतकें त्या बुवास सांगून शास्त्रीबोवा स्वतः धांवत जाऊन त्यांनीं रस्त्यावर नुकताच येऊन बसलेला एक हेलकरी पकडून आणिला.

हा शास्त्रीबावाचा निराभिमान व त्याची हित करण्याच्या कामीं बुद्धिपुरःसरतत्परता पाहून " मी आणि तूं " चा यांस स्पर्श नसून हे मोकळ्या मनाचे सद्गृहस्थ होते, असें या वेळीं दिवाकराच्या अंतःकरणांत पूर्णपणें ठसलें. व कांहीं शास्त्रीबावांसारखा दंभ यांस कसा नाहीं याचें त्यास विशेष आश्चर्य वाटलें. तेव्हां त्यानें असें ताडिलें कीं, उथळ पाण्यास जशी खळाळी फार तसेंच हें कांहीं अंशानें असावें. नंतर त्यानें त्या टोपलीवाल्यास

जवळ येण्याकरितां हातानें खुणाविलें. तो "जी महाराज" ह्मणून पटकन् एका पाउलानें जवळ येऊन उभा राहिला. त्याची तयारी पाहून दिवाकरानें "गड्या, असाच नाक्यावर जाऊन त्वरीत गाडी पहा, पण सांभाळहो, वेळ गमाऊं नकोस" इतकीच ताकीद त्यास दिली. त्याबरोबर तो तेथून असा कांहीं उडाला कीं, दोन हांकेचा टप्पा गांठण्यास त्यास पांच पळेंही लागलीं नसतील. तेथें येऊन पाहतो तों गाडी कोठेंही दिसेना. ह्मणून तो कांहींसा दूर गेला. पण त्या ठिकाणीं देखील तिचा थांग लागेना. आतां गाडी मिळणें कठीण आणि मिळाली तरी एव्हां मिळणें नाहीं, अशा विचारांत तो असतां समोरून एक शिग्राम हळुहळु आपणाकड येत आहे असें दिसलें. परंतु त्यांत मनुष्यें नसतीलशीं कशावरून, असा संशय उठून ती भाडोत्रीचशी असें कसें ओळखावें या गोंधळांत तो गडबडून गेला. तेवढ्यांत, गाडीवानानें त्यास आपल्या वाहनाचें अगत्य आहे असें ओळखून तो घोडा पळवीत त्याचे समीप येऊन कोठें जावयाचें व भाडें काय मिळेल, अशी चौकशी करीत करीत हेलकाऱ्याचे पाठोपाठ वरील स्थलीं आला. पुनः त्या गाडीवानानें "माझें भाडें ठरवून द्या मग तुह्मी आपल्या मसलती करा" असें अचूक दिवाकरास हटकिलें.

दिवा०—बाबा त्याविषयीं तूं तिळमात्र काळजी वाहूं नकोस. जो निरक असेल त्याप्रमाणें दिलें ह्मणजे तुझें कांहीं नाहींना ?

गाडी०—आपणास जायाचें कोठें!

दिवा० -ह्या पलिकडल्या रस्त्यावर मोरोपंत गोखले यांच्या वाड्याशेजारीं. कां अर्धकोश तरी आहे ?

गाडी०—बा:तात्या. वा आपण भले दिसतां. गोखल्यांचा वाडा येथून पक्का पाऊण कोश आहे.तें कांहींही नाहीं बारा आणे पडतील. मग आपली मर्जी.

भाडें ठरल्यावर दिवाकर आपल्या मित्रास हातीं धरून गाडीकडेस नेत आहे तों मनुष्याचा जमलेला थवा पाहून तेथें अकस्मात

शिपाईबुवाची स्वारी आली. येतांच त्यानें " अहो राव, रस्त्यामध्यें काय चालविलें आहे " असें चापून दटाविलें. हे शब्द आपल्या कांहीं ओळखीचे असावेत असें दिवाकरास वाटलें. ह्मणून तो त्या दटावणाऱ्याच्या मुखाकडे न्याहाळूं लागला. इकडे शिपाईबुवाची स्वारी हा काय करतो हें एकसारखें पहात होती. कांहीं वेळानें दिवाकरास हा कोणी तरी आपला परिचयांतला असावा किंवा यास निदान कोठें तरी पाहिलें असावें असें वाटलें- तों याचे हनुवटी-वरील तिळ पाहून हा भैरूच आहे असें ओळखून " कसें काय भैरू ? बरा आहेंसना ?" असा कुशळ प्रश्न केला. हा त्यास सहन न होऊन तो रागावून ह्मणाला " अहो, भैरू कोठचा ? आ-णि ह्मणतां कोणाला ! डोळ्यांवर शिवरात्र तर नाहींना आली ?"

हे शब्द दिवाकराचे काळजास लागले. मूर्खास टोणपा सुद्धां लागावयचा नाहीं; पण शहाण्यास एक शब्दच पुरे आहे. त्या योगें त्याचें मुख खरींदिशीं उतरून काळें ठिक्कर पडलें. तो मनांत ह्मणूं लागला "वः काय चमत्कार हा! शिपाईगिरी मिळाली ह्मणून इतकें उद्धट भाषण या भैरूस सुचलें काय? खरोखर, शिपाईबाणा-च असा आहे. ह्या भैरूस ह्याच्या चुलत्यानें हाकून लाविलें, त्यावेळीं त्यास आह्मांकडे राहिल्यास तुझें आह्मीं बरें करूं असें सांगून राहवि-लें, ह्मणूनच हा हे दिवस पहात आहे. असें असतां यानें बेमुर्वत रा-खावी हे याचें निमकहरामपण नव्हे काय! आज वर्षभर या भैरूस खाऊन पिऊन महिना तीन रुपये देऊन शिवाय चिरघुटपांघरूण हीं पुरवीत होतों याचें व हबशी सरकारांतही नोकरी देवविली याचें शेवटीं हेंच फळना? भैरू असा तापट होऊं नये मग मूळ स्वाभावांत इतका फेरफार कसा झाला असेल तो असो. पहाहो, हा उन्मत्त कितीं झाला आहे कीं, ओळख सुद्धां देत नाहीं. यावरून हा भलतें-च कांहीं उपस्थित करून आपल्या सपाट्यांत ओढणार नाहीं असा कोणीं विश्वास सांगावा? आतां काय करावें, आणि हा तर परगांव आहे. कांहीं भलताच आरोप येऊन येथील मूर्ख पाटील न्याया-

न्यायाकडे जितक्यास तितकेंच पाहून शिक्षा किंवा दंडही करावयास चुकावयाचे नाहींत. बरें इतकें होऊनही जगांतील छी: थू कोठून चुकावयाची? दुर्दैवें असे प्रकार घडून आले तर कोठच्या तोंडानें आह्मीं घरीं जावें? भाऊरावानीं तर महिन्यांत निघून यावें असें सांगितलें आहे, आणि न जाणों त्या मुदतीस अवधि लागल्यास घरीं मोठाच आकांत उडणार. वडिलांचाही मजसाठीं जीव थोडथोडा होईल. तेव्हां आतां करावें काय? विलक्षण प्रसंग येऊन बेतल्यास मुठदावणी तर केली पाहिजेच, आणि तशानें पैशाची खरांगोळी होणार, मिळून दोहींकडून संकट ओढवत आहे. यांतून ईश्वरच पार पाडणार समर्थ आहे. हे दयानिधे ! पद.

संकटिं पडिलों या ऐशा ॥ होतों कारण मी नाशा ॥ ध्रु०
दारुण उद्भवली चिंता ॥ जाळी दुःखानळ आतां ॥
उरला एकाचि तूं माता ॥ नाहीं तुजविण मज त्राता ॥
व्यथित झालों या पाशा ॥ होतों कारण मी नाशा ॥ १ ॥
काळिज करपुनिया गेलें ॥ वाटे जगणें हें सरलें ॥
दुःखावलंवित केलें ॥ मज त्रायानें त्याजियेलें ॥
उदास भासति ह्या दीशा ॥ होतों कारण मी नाशा ॥ २ ॥

असो होईल तसें होवो; आतां चिंता करीत बसण्यांत अर्थ नाहीं, व या शिपुरड्यास ही भिता कामा नये.

असा मनास धीर देऊन त्यानें पुनः "भैरू, मला तूं ओळखत नाहींस?" असें विचारलें. शिपाई ह्मणाला "अहो राव, ओळख काढून करता काय? ते–येथें चालावयाचें नाहीं. हे लोक काय ह्मणताहेत तें ऐकलेंत? चिंता नाहीं. हें खूप समजा कीं, मी भैरू असलों तरी या वेळस आपण सपाट्यांत आला आहां. कायहो येथें आपलें शहाणपण कोठें वाहवलें!"

हा डोळ्यांवर धूर आलेला भैरूच असून यानें आपली थोडी फटफजिती उडविली त्या अर्थी कोणजाणे हा आपली सरकार दरबारापर्यंतही मजल पोहोंचाविण्यास आळस करणार नाहीं जाणून,

त्यानें त्याशीं प्रीतिसंपादक युक्ति प्रयुक्ति व मधुर भाषणें सुरू करून क्षणांत त्याचा स्वभाव मृदु पाडिला, हें एक अर्थी उत्तम झालें. अशा संकटसमयीं दिवाकरा सारख्यानें, काळ व स्थळ न पाहतां, आपल्या-शोकांत मग्न राहून त्याशीं गोडी लावण्याचें सोडून देणें अनर्थावह होतें यांत काय संशय? त्या औषधानें शिपाईबावाचें पूर्व स्वरूप उडून त्यानें "भेरू तो मीच" हें कबूल करून उद्धट आचरणाबद्दल हात जोडून क्षमा मागितली, त्याचें रूपांतर तेथील जमलेल्या मंडळीस आश्चर्योत्पादक झालें भेरू नंतर दिवाकराचा हात धरून ह्मणाला, "आपणास खरें सांगतों, ह्या हबशी संस्थानांत आह्मांसच नव्हे—तर सर्वांस—पगार लहान असावयाचा, शेंत दहा पांचास मोठा असल्यास, मग त्यांचें तें भाग्यच. घरांत मनुष्यें पाहावीं, तर निदान पांच सात असणार, तेवढ्यांचा निर्वाह आह्मा सारख्यानें करणें तो समजलाच. अहो, अशा ठिकाणं ओळख देऊन आह्मीं करावें काय? इमानानें नोकरी केली, तरी थोडाच पगार मोठा होण्याचा संभव आहे. मग आडवा उभा हात कां मारूं नये? जातों आतां हवलदार साहेब येणार आहेत. असें बोलून व लवून मुजरा करून तो निघून गेला

दिनकरराव ही एवढे अविवेकी नव्हते कीं ते क्षुल्लक कार्या प्रीत्यर्थ इतके भ्रमक्रांत पडतील, याचें कारण निराळेंच झालें तें आमच्या वाचक या लक्षांत असेलच उन्हांतून चालून येऊन अमळ विसावा न घेतां बराच वेळ पावेतों भटकत राहून एकसारखें सूर्य किरणांत अनशापोटीं तळमळल्यानें विकृति होण्याचा पुष्कळ अंशानें संभव आहे अशीच अवस्था आपल्या दिनकररावांची झाली. तोंडांत कांहीं तरी टाकावें, तसें न करतां, ते अगोदरच फिरावयास निघाले. व्यायाम हा हितावह आहे खरा; परंतु कृतींत कांहीं उणें झालें ह्मणजे तोच काळ आहे. याकरितां या गोष्टीकडेस पूर्ण लक्ष देणें हें फायदेशीर कलम आहे. एक ग्रंथकार असें ह्मणतो कीं,——

१ "व्यायाम करतांना फुफुसाच्या क्रियेस कांहीं प्रतिबंध नसावा—ह्मणजे गळ्यावर अंगरख्याचे बंद वगैरे असल्यास ते सोडावे.

न अंगांत बंडी वगैरे असल्यास तीही फार सईल असावी किंवा मुळीं-च काढून टाकावी.

२ जे मनुष्य फार व्यायाम करतात त्यांस नायट्रोजिन व वसामय द्रव्यें हीं जास्त प्रमाणानें घ्यावीं लागतात.

३ ब्रांडी वगैरे मद्यांच्या सेवनानें कार्बनिक आसिड वायुबरोबर निघून जात नाहीं ह्मणून व्यायाम करणारांनीं दारूचें सेवन केल्यास तें अपकारक होतें, याकारणामुळेंच जे मनुष्य फार दारू पितात ते मोठे श्रम करण्यास असमर्थ असतात असें डा० पार्क ह्मणतात.

४ व्यायाम करतांना उच्छ्वास वायुबरोबर कर्बानिक आसिड वायु पुष्कळ प्रमाणानें बाहेर निघतो. आणि तो वातावरण वायूंत मिसळून सर्व वायूंस अशुद्ध करून टाकतो. यास्तव एकाच ठिकाणीं पुष्कळजण श्रम करीत असल्यास तेथें शुद्ध चांगला पुरवठा असणें अगदीं अवश्य होय.

व्यायाम करतांना हृदयाची क्रिया जास्त घडूं लागते आणि श्रम अति झाल्यास हृदयाची क्रिया फार जलद व अनियमित होते. व्यायाम केल्या नंतर बराच वेळपर्यंत ह्मणजे हृदयाची क्रिया शांत होईपर्यंत स्वस्थ राहिलें पाहिजे. व्यायाम करणें तो हृदयक्रिया अनियमित होईपर्यंत कधींही करूं नये, कारण असें केल्यानें हृदयास विकार होतात, हृदय फाटतें किंवा त्याची धडधडी सतत. जास्त झालेली राहते. कधीं कधीं हृदयास व क्वचित् हृदयाच्या व्हाल्व्हास नामक पडद्यासही विकार होतो. एका एकीं जबर व्यायाम केल्यानें किंवा फार वेळ तो चालू राखल्यानें रक्तवाहिन्यांसही इजा पोंहचते.

व्यायाम कमी घडल्यानेंही हृदयाच्या क्रियेचा जोर कमी होतो, आणि त्यामुळें व्यायाम कमी करणारे, हृदयप्रसारण आणि वसामयनिकृष्टीभवन या विकारांस पात्र होतात.

व्यायाम करण्याची संवय पाडतांना हृदयाच्या क्रियेकडे लक्ष द्यावें लागतें. पहिल्यानें व्यायाम थोडा थोडा करावा व तो

हळू हळू वाढवावा म्हणजे हृदयाची क्रिया हळूहळू वाढत जाऊन कांहीं विकार होत नाहीं.

व्यायाम केल्यानें स्नायु मोठे व कठीण होतात व त्यांत चापल्य उत्पन्न होतें. व्यायाम अति झाल्यानें स्नायूंची वृद्धि होणें एकीकडेस राहून स्नायु फार शिथिल होतात; म्हणून व्यायाम बेताचा करून पुष्कळ विसावा मध्यें घेतला पाहिजे."

यांतील ऱ्याच नियमांची दिनकररावानें हेळसांड केली. व्यायाम केल्यावर घरीं तरी थोडें यावें तसेंही त्यानें केलें नव्हतें. तेव्हां हा अनियमित व्यापार भोंवळ, मस्तकशूळ इत्यादिकांस उत्पादक कसा होणार नाहीं ? दिवाकरानें हें मुळींच जाणलें नव्हतें. त्यास कांहीं निराळेंच वाटलें, आणि त्याप्रमाणें वेळोवेळां त्यानें नाना उद्गारही काढिले, असो. भैरू निघून गेल्यावर दिवाकर " मित्रा ! काय हे ! लोकहशाकडे माझ्यानें आतां पहावत सुद्धां नाहीं ! गड्या, मोहनिद्रेंतून जागृत होत नाहींसना !" इतकेंच कंठ सद्गदीत होऊन म्हणत आहे तों भोंवळ नाहींशी होऊन दिवाकररावानें साफ नेत्र उघडिले, आणि अशी विलक्षण स्थिति प्राप्त कशानें झाली त्याविषयींचें मित्रास सर्व कांहीं सांगून बिऱ्हाड त्वरीत आटोपण्याची सूचना केली. " होय " म्हणून त्यानें हेलकऱ्यास जवळ बलाविलें, व त्याच्या मेहनतीचे चार पैसे त्याचे हातावर ठेविल्यावर मित्रास गाडींत बसवून शास्त्री बोवांस उद्यां परवां बिऱ्हाडीं येण्याविषयीं परमादरानें सांगून मागाहून आपणही गाडींत बसला. तरीही त्याचें चित्त दुःखानें व्याप्त असें होतें. आपण कधींही इतपत फिरावयास निघणारे नसून, उन्हांत तळतळल्यानें हा दुस्तर प्रसंग येऊन दिनकराचीही दुर्दशा झाली याची चुटपुट लागून तो भांबावून गेला होता. घडोघडीं, हा अव्यवस्थितपणा यास नडतो कीं काय ईश्वर जाणे " अशाविषयींचेही संशयांमागून संशय येऊन त्यास ते बेजार करीत होते.

दिनकर हेही अशाच घोटाळ्यांत पडलेले होते फरक मिळू-

न हाच होता कीं, याचे विचार एका इच्छेची अनुकूलता व दुसऱ्या हेतूची प्रतिकूलता अशा दोहों बाजूंस वळत, आणि दिवाकराचे फक्त त्याच्याच विषयींचे असत.

याप्रमाणें विचारास्त्रें आपआपल्या मनसेच्छित कामनेवर सुटत असतां गाडीवानानें गाडी त्यांच्या बिऱ्हाडाशीं आणून थांबविली. ती पाहून घरांतून चेतसिंग रखवालदार बाहेर येऊन त्यानें गाडीचा झट्‌कन् दरवाजा उघडून दिनकररावास " चलो महाराज " ह्मणून त्यानें त्याचा हात धरिला, आणि खोलींत नेऊन खुर्चीवर बसविलें. त्याच्या मागून दिवाकर येऊन त्यानें चेतसिंगाचे हातावर गाडीवानाचे पैसे टेविले ते घेऊन तो बाहेर आला व इकडे दिवाकरानें आचाऱ्यास पात्रें वाढण्याची आज्ञा करून तो मित्रांसह भोजनास गेला.

## प्रकरण चौथें.

सूर्यतापानें तप्त झालेल्या व दमून भागून आलेल्या मनुष्यास किंचित् आराम व शीतोपचार मिळाल्यास ते त्यास गुणावह होतात. आपले दिनकर स्वयंपाकखोलींत येतांच त्यास दिवाकरानें थंड गुलाबीसरबत प्यावयास देवविलें, व लगेच स्नान आटोपल्यावर भोजनास बसण्यास सांगून आपणही त्याचे समीप येऊन बसला. असे हे मित्रद्वय उदरशांति करीत असतां चाकरानें, कोणी एक गृहस्थ महाराजांच्या भेटीची अपेक्षा करीत आहे, असें चेतसिंगाकडून दिनकररावांस कळविलें. तेव्हां दिवाकरानें चेतसिंगास " येताहेत सांग जा " असा निरोप देऊन लगबगीनें मोठमोठाले घांस करून तो बाहेर आला. इतक्यांत दिनकररावही पुढील दारीं " कोण हो ? कोण आले आहेत ?" असें विचारीत बाहेर आले, आणि पाहतात तों कोणीही दिसेना. यामुळें कोण कशाकरितां आलें होतें, याचें अनुमान न होतां ते विचारांत पडले. परंतु जेव्हां चे-

नर्सिंगानें सर्व खाणाखुणा त्यानां निवेदन केल्या तेव्हां " ते शास्त्रीबोवाच आले होते " असें दिवाकरानें पक्कें ओळखलें. " कोणीही असोत, त्यांचें आपणाशीं कांहीं कर्तव्य असल्यास ते आज नाहीं उद्यां भेटतील; पण आतां आपण ह्या समोरील दिसणाऱ्या बागांत जाऊन थोडें बसूं तर मला येणेंकरून बरें पडेल असें वाटतें ' असें दिनकररावानें ह्मटलें. त्यास दिवाकराकडून रुकार मिळतांच ते इष्ट स्थळीं येऊन तो सुंदर बगीचा उत्सुकतेनें क्षणभर पहात उभे राहिले.

हा वेळ सुमारें अडीच एक वाजण्याचा झाला होता. प्रभाकराचें तेजस्वी किरण मंदरीतीनें पडण्यास व वायूच्या सुगंधमिश्रित झुळका वहाण्यास आरंभ होत होता. गुल्जार जन हातांत सुवासिक फुलांचे हार व गजरे घेऊन वृक्षच्छायेंतून उल्हासवृत्तीनें फिरत होते. गाणाऱ्या गवय्ये मंडळीचे थवे जागजागीं मधुर वाद्यें घेऊन त्यांचे स्वरावर ईश्वरगुणानुवाद आठवीत बसले होते.

हा बागामधील अनुपम देखावा पाहून दिनकररावांस समाधान वाटलें. फलपुष्पादिकांचीं क्रमानें असलेलीं लहान थोर झाडें, व्यवस्थेशीर राखलेल्या लहान पायवाटा, ठिकठिकाणीं बांधलेले रमणीय जलाशय वगैरे यांजवरून हा बाग कोणा थोर पुरुषानें मुद्दाम लोकोपयोगार्थ करविलेला असून येथें कोणी याचा उपभोक्ता असावा असा त्यानें तर्क बांधिला, व तो यथार्थ होता. शंभर एक पावलांवर, शिवरामपंतानीं एक बगीचा करविला होता ह्मणून मागें सांगितलें आहे तो हाच.

दिवाकराचें लक्ष यावेळेस कोणी एक आपल्या पहाण्यांतला मनुष्य आपणाकडे येत आहे इकडे लागलें होतें. त्याचें नांवगांव जरी त्यास पक्कें आठवेना; तथापि त्याशीं आपलें बरेंच संघट्टण होतें एवढें त्यानें पूर्णपणें जाणिलें. त्यासही असाच भ्रम पडून दिवाकर ते हेच असें अचूक ह्मणतां येईना. शेवटीं अगदीं समीप आल्यावर त्यानें ठेंच लागल्याचें मीष करून वाकून क्षणभर नीट त्यास

न्याहाळिलें. तो खुण पटली. तितक्यांत दिवाकराचीही चांगली नजरानजर होऊन आपला बालमित्र व्यंकट तो हा असें जाणून "का व्यंकटराव, ओळख आहेना !" असा सौम्य वृत्तीनें प्रश्न केला. त्याबरोबर हे दिनकर किंवा कोण असा संशय याचे मनांत होता तो नाहींसा होऊन ही फार दिवसाची भेट असल्याकारणानें त्यानें कडकडून भेट दिली, आणि कुशल विचारून कोंकणांत येणें कोणत्या उद्देशानें झालें ? असें विचारिलें.

" कांहीं देण्याघेण्याच्या संबंधानें लखमीचंद नामा व्यापाऱ्याचे घरीं जयगडास गेलों होतों, आणि तेथून फिरत फिरत येथें आलों आहों. असो; कोंकणपट्टी बहुतेक पाहिली, हा लाभच म्हटला पाहिजे." असें दिवाकरानें म्हटलें.

मित्र म्हणाला " खरोखरच हा लहान सहान कांहीं लाभ नव्हे. त्यांत आपला येण्याचा संभव तरी होता का ! कोठें महाबळेश्वर आणि कोठें हा समुद्रकिनारा ! येथील लोकाचार, रीतिभाति, तशीच स्थळमाहिती, आपणास पूर्वीं विदित असती, तर मला वाटतें कीं, आपणास जे त्रास यासंबद्दलचे सोसावे लागले असतील, ते मुळींच लागतेना. सारांश आपल्या देशाची, इलाख्याची किंवा निदान आपण राहतों त्या प्रांताची माहितगारी असणें सर्वांस अत्यंतोपयोगी होय 'जन्मदेश किंवा एकदेश सोडून माझें कोठेंही बाहेर जाणें व्हावयाचें नाहीं व मी जाणारही नाहीं' असें कोणींही समजू नये. आमचीच पहाना. आमचें जन्म पुण्यास, तेथून आपल्या (दिवाकराचा) गांव, आणि आतां हे तिसरें ठिकाण. त्याचप्रमाणें हवापाणी सहन करण्याचीही सवय असली पाहिजे. प्रसंग आहे, हरएक कारणाकरितां किंवा धंदाव्यापाराकरितां म्हणाना, आप्त इष्टमित्र घरदार सोडणें भाग पडतें असो, बिऱ्हाड वगैरेची सोय चांगली आहेना ? नसल्यास गरिबाची झोंपडी आहे. तेथें उतरण्यास कोणाची ना नाहीं.

दि०—छेः हो असें काय म्हणतां? ना कोण म्हणतो? कांहीं

नाहीं बिन्हाडाविषयीं सर्व ठीक आहे.

मि०—बरें तर, ह्या बागापलीकडील वाड्यांत, गणेशपंत खोता-च्या कन्येच्या विवाहासंबंधी तात्या साहेबांकडून पत्र आलें आहे, तें त्यांनीं मावशीस वाचून दाखविण्यास सांगितलें. ह्मणून जात आहों, आपण येत असल्यास चलावें. एकंदरींत वाडा पेशवाईंतला असल्या-मुळें बघण्यासारखा असून, यमनाबाई व मावशीबाई ह्या आपणास जाणतही असतील असें वाटतें; कारण गुदस्तसालीं कीं काय कोण जाणे, गणेशपंत आपल्या परिवारासह तिकडे गेल्याचें आह्मांस पक्कें स्मरतें. एकदां आपलें नांव आह्मी मावशीच्या तोंडातून निघालेलें-ही ऐकलें आहे.

दि०—असेल. पण कायहो तात्यासाहेब कोण ? ते तात्या उर्फ वामनराव बापट असतील तर आह्मी असें ऐकितों कीं, ते विलक्ष-ण स्वभावाचे पुरुष आहेत ! खरें काय असेल तें ( आकाशाकडे बोट करून ) तोच जाणे !

मित्र०—( डोकें हालवून ) हो, हो तेच. त्यांचे पराक्रम ए-कून आपणासही विदित अं. मूर्खपण नाकारते तर एवढा डंका हो-ता का? अहो, ज्या पुरुषानें आपली पहिली बस्ता बायको यमसद-नीं पाठविली, तो चमत्कारिक पुतळा आमच्या यमुनाताईस कसा निभवील हें आज सांगवत नाहीं ! अहो ती सुगुणी त्याची पहिली बायको टक्केटोणपे खाणारी होती ह्मणून तिनें पांच वर्षे तरी काढलीं. बाकी ती उर्मट नसून नम्र, आल्या गेल्याचा सत्कार करण्यांत कु शल, तशीच संसारिक खरी ! बिचारी दगादगींतून सुटली तेव्हां जीव थंड झाला ! अगोदर या बुवास यमनाताई द्यावयाचा खोतांचा विचार नव्हताच; पण तेथून " आठशें रुपये देऊं " हीं अक्षरें कानीं येतांच झाला बेत आणि काय ! मोठ्यांस आह्मीं काय सांगावें? असो उशीर होतो, येतों आतां; सदूनें मी आलों आहें ह्मणून के-व्हांच वर्दी श्रुत करविली असेल.

दिवाकरानें नंतर त्याजशीं दोन शब्द बोलून त्याच्या जाण्यास

प्रतिबंध झाल्याची क्षमा मागून व असाच लोभ ठेवण्यास सुचवून त्यास जाऊं दिलें. सदू अर्ध तास पुर्वीं येऊन कारकून आल्याची बातमी लावून आपण खालीं माजघरांत चिलीम ओढीत बसला होता. सदूनें पत्राविषयीं कांहीं एक न बोलतां सांगितलेलें काम बजावावें, तसें न करतां केवळ तुटक खबर दिल्यामुळें "पत्र कोणाचें ? आलें आहे कोठून" याविषयीं पूर्णार्थ न समजून मावशी त्यांची एकसारख्या वाट पहात होत्या. व्यंकटराव जिना चढून वर येतांच "इतका विलंब कां व्यंकटराव ? सदू तर मगांच येऊन पोहोंचला" असा त्यांनीं प्रथम प्रश्न केला.

व्यंकटरावानें घडलेला पूर्व वृत्तांत साद्यंत निवेदून दिवाकराच्या, त्यास माहित असलेल्या, चातुर्याची, शहाणपणाची व विद्वत्तेची बहवाः करून अशास सन्मानपूर्वक भेट देणें मजकडून आपणाकडे निकडीचें येणें होतें ह्मणून झालें नाहीं याचा खेद दर्शविला. त्यानें दिवाकराचें नांव गांव वगैरे सर्व घेतल्यामुळें त्याचें स्मरण होऊन असा सुंदर जावई गणेशपंतास दुरावला याचें मावशीस वाईट वाटलें. यावेळीं यमनाताई तें प्रिय नांव ऐकून आनुकूल्य किंवा प्रातिकूल्य दर्शविण्याचें स्वातंत्र्य प्रचारांत असतें, तर तिनें आपला इष्ट हेतु मावशीस कळवून चिंतामुक्तही होती. पण करील काय ! तसें आपणच होऊन केल्यानें आपणास जन वेडगळ, अविचारी ह्मणेल या भीतानें तिला निमुट राहणें भाग पडलें. नंतर तिचे पित्यास आलेलें पत्र मावशीस वाचून दाखविल्यावर व्यंकटराव आल्या मार्गानें मागें परतले.

चिंतादुःखानलांत एकदां पतन पावलें असतां त्यांतून मुक्त होऊन शरीर शांत होणें मोठें दुरापास्त होय. प्रियवाचकहो, आपल्या यमनाताईस, तात्या ऊर्फ वामन बापट हा आपणास दुर्दैवें पति मिळणार, हें ऐकून व त्यास बाबानें अनुमत दिलें हें आठवून, पराकाष्ठेचें दुःख झालें ! त्यामुळें तिचा कंठ दाटून मनांत ह्मणाली "धिक् स्त्रियांचें जिणें ! कीं ज्यांस स्वातंत्र्य ह्मणून जन्मांतही नाहीं ! बस-

च्या उठण्यांत, खाण्या पिण्यांत, हरएक कार्य करण्यांत परतंत्रता ही आहेच ! ( उच्छ्वास टाकून ) अहाहा ! काळीज चरचरां कापतें पण काय करूं ? आकाश कोसळून पडतें तरी इतकें संकट पडतें ना ! आई जगदंबे ! पुरे हे लग्नसोहाळे, आणि नको हा जन्म ! ' यमनीस चांगले ठिकाण पाहीन " ह्मणून बाबा ह्मणत तें हेंचना ? जाणुन बुजून त्या बिजवराशीं गांठ घालूं पहाणें ही काय नीति ! बाबास हृदयोद्देश कळवावा तेथून आणि न कळवावा तेथून ही अडचण ! देवा ! इकडे आड आणि तिकडे विहीर अशी अवस्था झाली आहे ! यांतून आनंदाचे दिवस दाखविणारा तूंच !"

व्यंकटरावानें सांगितलेला वृत्तांत दिवाकराचेंही हृदयास फार खोचला. त्यांत आपणास मिळत असलेली वधू सर्वगुणसंपन्न वाटत यास लाभत आहे पाहून तिजविषयींचा त्यास अतिशयच कळवळा येऊन वाईट वाटलें. व ही त्याची दीनमुद्रा, दिनकररावास त्याच्या मित्राचें मनोगत ओळखण्यास, साधनभूत होऊन, दोघेही समयावच्छेदें एकाच शोकसागरांत गटंकळ्या खाऊं लागले. याचें परस्परांस नवल वाटलें. यांचीं मनें अशीं गोंधळून गेलीं होतीं, तरी त्यांच्या वृत्ति उदास दिसत नव्हत्या. यावरून त्यांचे निजगुण उत्साहस्थानापन्न होऊन तडीस जातेंच असें जणूं काय त्यांनीं ओळखिलें, असें साहजिक दिसे. आरंभीं शौर्य धरणें, आणि अवसानाचे वेळीं तें दवडणें अर्थात् पर्यायानें पोबारा करणें. हे दोन गुण बहुतेकांत प्रकृतिस्वभावाच होऊन बसलेले असतात. त्यापासून हे फार दूर होते ह्मटल्यास बाध नाहीं. निश्चय ज्याचा मित्र, त्यास पाठबळ देवविण्याकडे कोणाही मनुष्याचें तोंड पाहण्याची गरज नसून तोच त्याचा साहाय्यक प्रसंगविशेषीं अशी अद्भुत उत्तेजकप्रेरणा पुढें सरसावेल कीं " मी करतों आहे काय व केलें काय ?" याचें त्यासच आश्चर्य व आनंद होईल. असें दृढनिश्चय कंकण ज्यानें ह्मणून एकदां हस्तीं चढविलें, त्यास त्याचें इष्ट सफल करण्यांत अपयश मिळेल, असें सहसा ह्मणवत नाहीं. सारांश

निश्चय, मनोगतरूपबीजास कोमलांकुरोद्भव करविण्यास साधनीभूत जीवन होय.

दिनकर आणि दिवाकर नंतर तेथील नूतनपल्लवसुशोभित गगन चुंबीत वृक्ष, बागडण्यास्तव केलेले मृगविहारस्थान, चित्तरंजक जलाशय, सुगंधी पुष्पताटवे, सुकुमार कुसुमालंकृत लतिका, वगैरे पूर्ण बाग पाहून पूर्वेकडील रस्त्यानें किंचित् वळसा घेऊन आपल्या बिऱ्हाडीं येत असतां नदीकांठावरील वाळवंटांत दोघे पुरुष एक वयानें सत्तावीस एक वर्षांचा व दुसरा तीस एक वर्षांचा, एकमेकांवर क्रोधाविष्ट होऊन ओरडत आहेत असें त्यांच्या पहाण्यांत आलें हें जाणण्यासाठीं तें जवळच, पण कांहीं पावलांवरील आम्रवृक्षाच्या छायेखालीं जाऊन तेथें त्यांचा होत असलेला संवाद ऐकत उभे राहिले. त्यांपैकीं एकजण ह्मणाला " मी आज तुला सोडणार नाहीं. ठकबाजीची तर तूं सीमाच केलीस. शाबास तुझी ! घरीं गेलों ह्मणजे तुझ्या बायकोनें तूं घरांत असतांही ' घरांत नाहींत हो, बाहेर कुठे गेले आहेत ' असें सांगावें. कीर्ति न वाढवितां आतां मनांतून द्यावयाचे असतील तर गोडीनें दे. नाहींतर तुझी कोडतांत धिंड काढून तुझ्या काकाजवळून घेतों. समजलास काय तूं ? अरे ठका, तुझी आज फार दिवसांनीं गांठ पडली. त्या गंध्याचे दुकानीं दोन महिन्यांपूर्वी भेट झाली होती त्यावर ही आज. तेथें तुझा मी हात पकडला तेव्हां तूं निमुटपणें " शिवरात्रीचे दिवशीं देईन " असें ह्मणालास तें आठवत नाहीं वाटतें. बरोबर, देणें गोड कसें वाटेल? घेणें मात्र आनंदानें घ्यावयाचें अं. अरे, आज तूं कोठून भेटावयाचा? माझ्या दैवयोगानें तूं सांपडलास ह्मणून सांपडलास. भल्या गृहस्था, त्यादिवसापासून तुझे घरीं कधींही गेलों नाहीं, ह्मणालों वारंवार जाऊन डोकें पिकविण्यांत अर्थ नाहीं. एकाच दिवशी जावें ह्मणजे झालें. खरें सांग तुझ्या मनांत द्यावयाचें आहे किंवा नाहीं. नसेल तर नाहीं तरी ह्मण मी तुला भिकारी समजून त्यावर पाणी सोडतों. ( ठोंशाकडे पाहून ) उगारलेला ठोंसा, मारूं ह्मणशील, पण सांभाळ

हो, विचारकर. मुसक्या तेव्हांच तंग होतील, आणि उलटा दंड मात्र भरावा लागेल हें ध्यानांत आण. मला तर असें दिसतें कीं, तुझे कपाळीं त्रिनभाड्याचीच कोठडी आहे. अरे पैसे मिळवितोस त्यांची वाट लावतोस तरी काय? मार उडवीत असशील, दुसरें कांहीं नाहीं. पन्नास रुपयांची काय विशाद ! तुला मिळतना ? धिक्कार तुझ्या कमाईला ! तमाशांत त्या नाच्या पोऱ्याकरवीं दौलतज्यादा करवशील, मित्रमंडळ जमवून डोंगरावर किंवा बागांत " प्लेझरा" मारण्यास जाशील; अंगांत बुट्टीदार ज्याकेट, वर फ्लानेलचा अंगरखा, गळ्यास उत्वदार लोंकरीचा विलायती पट्टा. खिशांत चिमुकलें लेडी वाच्य, हातांत त्याच तऱ्हेची सुंदर लहान छत्री, वितभर कांठाचें नेसावयास रेशमी धोतर, पायांत स्टार्कींग बूट चढवून डोक्यांत झुबकेदार जराचें लालभडक पागोटें, तोंडांत मसालेदार पट्टी, खिशांत छोटा शुभ्र रुमाल हा थाट उडवीशील; पण लोकांचें देणें देववत नाहीं एवढेंच वाईट. माझ्या पैशाविषयीं तुझें कसें मस्तक फिरलें तें फिरो ( गोडीनें ) गड्या, तूं असें करूं नकोस. तूंच पहा बरें कीं, मी तुझा हात धरावा, तुझ्या अंगावर ओरडावें, शिव्या द्याव्या किंवा मारामारीवर यावें, आणि ही मौज लोकांनीं पहात उभें राहवें हें तुला बरें दिसतें काय ?

हें त्याचें भाषण ऐकून जवळ असलेला तो दुसरा मनुष्य त्याचेकडे क्षणभर पाहून खों खों खों हसला, आणि मिशांस ताव देऊन ह्मणाला " तूं ह्मणतोस तें सर्व खरें; पण करूं काय ! जीव देऊं ? तुला पाहिजे ह्मणजे पैसे देऊं नयेतसेंच वाटतें. हा काय तुझ्यांत गुण असेल तो असो.

प०— वा: एकून थट्टाच समजतोस ना ! देऊन घेऊन उलटा मीच चोर. अरे मित्र होऊन इतका कृतघ्न होतोस ! ते पन्नास रुपये घशांत ओतल्यानें तूं धनिक होशील असेंही कांहीं नाहीं. असें असतां तुला काय आठवलें तें नकळे.

दु०— कांहीं ह्मण ( हात हालवून ) माझे हातून कालत्रयीं पै-

से सुटायाचे नाहींत. आणि इत:पर तूं माझें डोकें उठवूं नयेस हें बरें. परवांच एक्या नाटकाचा, त्यांत कवडीचें उत्पन्न न होतां गाठचें घालावें लागत असतांही, मित्रसमुदायाचे आग्रहावरून, मक्ता घेऊन सर्वस्वी बुडालों; तथापि मला कांहीं वाटलें नाहीं. आणि जरी तेच रुपये तुला देऊन कर्ज फिटलें असतें, तरी चित्त स्थिर रहातेंना. आतां मी अधिक बडबडून दोघांचें मस्तक तापविणें रास्त नव्हे, ह्मणून सध्यां इतकेंच चक्क सांगतों कीं, तुझें ऋण कधीं मी काढिलें नाहीं. फार तर काय तुला ओळखत सुद्धां नाहीं ( किंचित् बारीक आवाजानें ) जे रुपये तूं मला व्याजी दिले आहेस, ते चिटूपाखरासही माहीत नाहींत गपचुप एका कोंपऱ्यास नेऊन कोणास नकळत दिले आहेस, हें तुला आठवत असेलच, बरें त्यावेळेस तूं मजजवळून कागद करवून घेतला आहेस ? तर नाहीं. ( तर्कटावर उठून ) अरे तूं पैसे मला दिले आहेस किंवा मजसारख्या दुसऱ्याला हें तरी तुला आठवतें ? भलत्याच्याच गळां पडतोस हें ठीक नव्हे. जो कोणी याकाळांत पन्नास रुपये देईल तो कागदपत्र करवून घेतल्याशिवाय देईल असें वाटतें ? चलहो, चालता मारीन थप्पड. पैसे दिले आहेस कोणाला ? मी तुझा कांहीं लागत नाहीं.' अशा बेतावर येऊन त्या गृहस्थानें पैसे देणाराच्या छातींत जोरानें ठोसा मारला. तोही गृहस्थ दोन देणारा व तीन घेणारा असा असल्यामुळें घेतलेला बुक्का परत करून ह्मणाला "अरे विश्वासघातक्या ! पैसे घेऊन आतां नाकबूल जातोस ? तुझ्या मित्रत्वावर गेलों, नाहीं पेक्षां तुजकडून कागद लिहवून घेतलाच असता. तुला मी तो कोठें सोडणार होतों ? मला खात्री होती कीं, तूं असा मनुष्य नसावास; पण नाहीं फसविलेंस ! त्यावेळचें तुझें दीनवाणें तोंड आणि मैत्रि पाहून हा धंदा केला नाहींपेक्षां हा वस्तादरे तुला कोठून गांठावयाचा. अरे मित्राला असा धक्का देऊं नये ! दे ते माझे पैसे ! मी तुझ्या पाहिजे असेल तर पायां पडतों, शिव्या खातों; पण कसेंही करून तेवढे दे. घरांतील दाणागोटा संपतआल्यामुळें उपवाशी मरण्याची पाळी येई-

ल ह्मणून मी दांत विचकतों. आज तूं मला पंचवीस तरी दे. निदान पांचदहा तरी दे, पण दे. कृपाकर एवढी ( तोंड भलतीकडे फिरवलेलें पाहून ) मी बोलतों इकडे तुझें लक्ष नाहीं. वा: तुजपुढें हा कुत्रा भुंकतो आहे असें तुला वाटत असेल; पण तसें समजूं नकोस. ह्याचा ( छातीवर हात ठोकून ) स्वभाव फार विलक्षण तऱ्हेचा आहे. ह्याचें एकदां डोकें फिरल्यास हा सख्ख्या काकासही ओळखावयाचा नाहीं. एका पैशासाठीं दोन खर्च करीन; परंतु पाठ सोडणार नाहीं. ह्या नानास तूं पुरता ओळखत नाहीं आहेस. ज्याला हा मित्र ह्मणेल त्यास जीवश्चकंठश्च मानून प्रसंगोपात्त मानही कापून देईल, आणि ज्यास हा वैरी ह्मणेल त्याजजवळ वैर साधल्याशिवाय किंवा त्याला अनामत बुडविल्याशिवाय बहुश: स्वस्थ बसणारा नव्हे. आतां स्पष्ट सांग. मग पाहतों तुझी मजा कशी आहे ती ?

नानाची ही सर्व बडबड ऐकून घेऊन तो तर्कटी मनुष्य ह्मणाला ( डोळे चमकावून ) "प्रथम तुला मी काय सांगितलें आणि पुन तूं वटवट लाविली आहेस मूर्खासारखी ! ( ओरडून ) नान्या, कोणाकोरे पैसे दिले आहेस ? तोंड घेऊन बोलतोस उलटा. ओळख सुद्धां नाहीं. शुद्धीवर आहेस ? भंगडा ! भांग पिऊन चालला लोकांजवळ पैसे मागावयास. लज्जा वाटते तरी ? छान! शिवरात्र भली गाजविलीस. बुट, स्टाकींग, लफेदार पागोटें तूं देतो आहेस वाटतें ? डोळे फाडून घे पाहवत नाहीं तर भंगड कोठचा ! चालला वरळत ! बोलत नाहीं तंव. मिळाली असेल फुकटची मग तेथें कमी कां ? लोभ्याचे ऐवजीं दोन मारलेस सपाटे आणि काय ? भणंगभिकारी होण्याचें कारण कोणतें ? हेंच. डोळे पहा डोळे कसे तारवटले आहेत ते. तें शुभ्र आडवें गंध, डोकीचा फेटा, पीळदार मिशा ( हसून ) काय पुतळ्यास शोभताहेत पण. थू: तुझें शहाणपण ! कवडीची अक्कल सुद्धां नाहीं ! अरे भांगिष्टा, धरतो आहेस कोणाचा हात ! चालता हो. नाहीं तर क्षणांत भांग उतरवून बत्तीशी उखडून टाकीन. गाढवा, भांगेनें व्यर्थ तूं जीवास मुकशील.

आजपासून तरी लोकांच्या गळीं पडत जाऊं नकोस. तुझें बोलणें मी ह्मणून सहन केलें. दुसऱ्यानें लगेच गालांत भडकाविलें असतें कदाचित् शेंडी धरून कुथवावयासही लाविलें असतें माहित आहे? रत्नागिरीचें पाणी इथें चालावयाचें नाहीं हें खूप समज हा बापू नावाचा आहे. पळपुटा नाना नव्हे हा."

नंतर नानानें जो हात धरिला होता तो हिसक्यानें सुटेल जाणून दोहों हातांनीं घोतर गच्च पकडिलें, आणि आतां करावें कसें? यानें उलट मलाच मूर्ख केलें, आणि आपण शहाणा होऊन उलट्या गोष्टी शिकवितो आहे! व्यर्थ मी या शहाण्याशीं लागून व्यवहार केला! गळफांसांत हा आणील असें माहित असतें, तर स्टांप कागद तरी लिहून घेतों. समजलों कीं, कामदार आहे आज नाहीं उद्यां पैसे मिळतील. जातात कोठें? तशांत मित्रही आहे; पण काय? मित्रच हा मजवर उलटला! पैसे उपटते वेळीं काय शिताफी केली ह्मणून सांगूं! 'घरांत माणसें पुष्कळ असून गेल्यासालीं पाहुणीं आलीं, त्यायोगें तंगाई पडली कृपा करून विनंती मान्य कराल तर फार बरें होईल' असें दीनपणें दांत विचकून भीड घातली. खतांविषयीं बोलणें निघतांच 'लिहून देण्यास मी सिद्ध आहें; परंतु खरा शब्द ह्मणून जेथें आहे, तेथें त्याचें कारण नाहीं. सारींच मनुष्यें सारखीं असतात असें नाहीं' अशा मोठमोठ्या गोष्टी करून ईश्वराची तर शपथ घेतली आणि 'जगांतून आजच विश्वास उडाला कीं काय?' हें जो वाक्य तो ह्मणाला त्यास कालिमा नाहीं का आणिला? पैसे व्याजी दिलें खरे पण व्याज मित्रत्वाच्या नात्यानें पुढें यास जड जाऊं नये ह्मणून इतकें अल्प ठेविलें कीं, तें आहे नाहीं सारखेंच. तथापि यानें कावा साधला हें अयोग्य केलें. मारवाडीच अशा नादिष्टास योग्य! (कानचिमटी घेतो) आजपासून बुवा कोणावरही एकाएकीं विश्वास ठेवणें उपयोगाचें नाहीं. दयानिधे! अशीच जर स्थिति आह्मांमध्यें दिवसें दिवस वाढत जाऊं लागली तर मग आमची काय अवस्था! रसातळीं नेणारे गुण आह्मांमध्यें बरेच व्यक्त